**प्रकाशनयोग्य**

**(इंग्रजीत टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठी भाषेत अनुवाद)**

**भारताच्या सर्वोच्च न्यायालयात**

**मूळ फौजदारी अधिकारक्षेत्र**

**रिट याचिका (फौजदारी) क्रमांक ६८/२००८**

ललिता कुमारी ......................... याचिकाकर्ती (कर्ते)

- विरुद्ध -

उत्तरप्रदेश राज्य सरकार आणि इतर ................. उत्तरवादि

**सह**

**विशेष परवानगी याचिका क्रमांक ५९८६ /२००६**

**विशेष परवानगी याचिका क्रमांक ५२००/२००९**

**फौजदारी अपील क्र. १४१०/२०११**

**फौजदारी अपील क्र. १२६७/२००७**

**आणि**

**रिट याचिका (फौजदारी) क्रमांक ६८/२००८ अंतर्गत अवमान याचिका (सी) क्रमांक डी२६७२२/२००८**

**न्यायनिर्णय**

**पी. सथासिवम, भारताचे सरन्यायाधिश.**

१) संदर्भित प्रकरणात विचार करण्यासाठी उद्भवणारा महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १५४ (थोडक्यात 'संहिता') अंतर्गत दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित कोणतीही माहिती मिळाल्यावर पोलीस अधिकारी प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) नोंदवण्यास बांधील आहे का किंवा पोलीस अधिकाऱ्याला नोंदणी करण्यापूर्वी अश्या माहितीची सत्यता तपासण्यासाठी प्राथमिक चौकशी करण्याचा अधिकार आहे का?

२) संविधानाच्या अनुच्छेद ३२ अंतर्गत प्रस्तुत रिट याचिका ललिता कुमारी (अल्पवयीन) या व्यक्तीने तिचे वडील श्री. भोला कामात यांच्या माध्यमातून दाखल केली आहे. श्री. भोला कामत यांनी अपहरण झालेल्या त्यांच्या अल्पवयीन मुलीच्या संरक्षणासाठी उत्तरवादिंच्या विरोधात हेबियस कॉर्पसचे रिट किंवा समान स्वरूपाचे निर्देश जारी केल्याबद्दल

आहे. सदर रिट याचिकेतील तक्रार अशी आहे की वर याचिकाकर्त्याने संबंधित पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्यापुढे लेखी अहवाल सादर केला होता, ज्याने त्यावर कोणतीही कारवाई केली नाही. त्यानंतर पोलिस अधीक्षकांनी हालचाल केल्यानंतर एफ.आय.आर. नोंदवण्यात आला. याचिकाकर्त्याच्या म्हणण्यानुसार, त्यानंतरही आरोपीला पकडण्यासाठी किंवा अल्पवयीन मुलीची सुटका करण्यासाठी कोणतीही पावले उचलली गेली नाहीत.

३) या न्यायालयाचे द्वि सदस्यीय न्यायाधीशांचे खंडपीठाने, **ललिता कुमारी - विरुद्ध - उत्तर प्रदेश सरकार आणि इतर.** (२००८) ७ एससीसी १६४ ने देशभरातील प्रकरणांच्या आधारावर पोलिस अधिकाऱ्यांद्वारे प्रकरण परत्वे एफ.आय.आर. नोंदवण्यातील विषमता लक्षात घेऊन, युनियन ऑफ इंडिया, सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव आणि पोलिस महासंचालक/पोलिस आयुक्तांना नोटीस बजावली की जर त्वरित एफ.आय.आर. नोंदवण्यासाठी पावले उचलली गेली नाहीत, तर ते संबंधित दंडाधिकाऱ्यांकडे तक्रार याचिका दाखल करून पोलिसांना ताबडतोब तक्रार दाखल करून घेण्याकरिता आणि आरोपीला अटक करण्याकरिता उचित निर्देश देण्यात यावे व असे न केल्यास आणि त्याकरिता पुरेसे कारण न दाखविल्यास अश्या भ्रष्ट पोलीस अधिकाऱ्यांविरुद्ध अवमानाही कार्यवाई करणे आवश्यक ठरेल.

४) वरील निर्देशांनुसार, त्याच खंडपीठासमक्ष **ललिता कुमारी -विरुद्ध- उत्तर प्रदेश सरकार आणि इतर** (२००८) १४ एससीसी ३३३७ प्रकरणांमध्ये सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्याचे विद्वान ज्येष्ठ वकील श्री. एस. बी उपाध्याय यांनी त्यांचा दावा मांडला की, पोलीस ठाण्याचे प्रभारी असलेल्या पोलीस अधिकाऱ्याने दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करणारी माहिती मिळाल्यावर त्यांनी संहितेच्या कलम १५४ अन्वये गुन्हा दाखल करणे अनिवार्य आहे असे **हरियाणा राज्य -विरुद्ध- भजनलाल** १९९२ पुरवणी (१) एससीसी ३३५, **रमेश कुमारी -विरुद्ध - राज्य (एनसीटी ऑफ दिल्ली)** (२००६) २ एससीसी ६७७ आणि **प्रकाश सिंग बदल -विरुद्ध- पंजाब राज्य** (२००७) १ एससीसी १ या न्यायालयाच्या द्वि सदस्सीय न्यायाधीशांच्या खंडपीठाच्या न्यायनिर्णयांवर विसंबून राहून त्यांनी आपले मत मांडले. दुसरीकडे, महाराष्ट्र राज्याचे विद्वान वरिष्ठ वकील श्री. शेखर नाफाडे यांनी असे सादर केले की, पोलिस ठाण्याचा

प्रभारी अधिकारी, दखलपात्र गुन्ह्याची माहिती मिळाल्यावर, गुन्हा नोंदविण्यास कायद्यानुसार बांधील नाही. परंतु, उचित प्रकरणांमध्ये, अहवालात नमूद केलेल्या सत्यतेच्या किंवा अन्यथा आरोपांच्या संदर्भात काही प्रकारची प्राथमिक चौकशी करण्याचा विवेकाधिकार त्याच्याकडे आहे. आपल्या प्रस्तुतीकरणाच्या समर्थनार्थ, त्यांनी **पी. सिराजुद्दीन विरूद्ध - मद्रास राज्य** (१९७०) एससीसी ५९५, **सेवी विरुद्ध - तामिळनाडू राज्य** १९८१ पुरव एससीसी ४३, **शशिकांत विरूद्ध - सेंट्रल ब्युरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन** (२००७) १ एससीसी ६३० आणि **राजिंदर सिंग कटोच -विरुद्ध- चंदीगड प्रशासन** (२००७) १० एससीसी ६९ या न्यायनिर्णयांवर विश्वास ठेवला. सदर मुद्द्यावर या न्यायालयाचे परस्परविरोधी निर्णय लक्षात घेता, या खंडपीठाने दिनांक १६/०९/२००८ च्या आदेशाद्वारे तो मुद्दा मोठ्या खंडपीठाकडे सोपवला.

५) वरील निर्देशांचे पालन केल्यामुळे, ललिता कुमारीशी संबंधित प्रकरणाची सुनावणी त्री सदस्यीय न्यायाधीशांच्या खंडपीठाने **ललिता कुमारी - विरुद्ध - उत्तर प्रदेश सरकार आणि इतर** (२०१२) ४ एससीसी १ या मधे केली. ज्यात, या न्यायालयाने, युनिअन ऑफ इंडिया, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या विविध वकिलांचे म्हणणे ऐकल्यानंतर आणि सर्व परस्परविरोधी निर्णयांना व्यापकपणे प्रतिसाद दिल्यानंतर, हे प्रकरण खालीलप्रमाणे निष्कर्ष काढत घटनापीठाकडे पाठविण्यात आले -

> "९७. या न्यायालयाने गेल्या अनेक दशकांमध्ये दिलेल्या विविध निकालांचे आम्ही बारकाईने विश्लेषण केले आहे. आम्ही मुख्य मुद्द्यावर या न्यायालयाची भिन्न न्यायिक मते स्पष्टपणे ओळखतो : कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत, जेव्हा एखादा दखलपात्र गुन्हा घडतो तेव्हा पोलिस अधिकारी एफ.आय.आर नोंदविण्यास बांधील आहे किंवा एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी काही प्रकारची प्राथमिक चौकशी करण्याकरिता त्याच्याकडे (पोलिस अधिकाऱ्याकडे) पर्याय, विवेकाधिकार किंवा मुभा आहे.
>
> ९८.युनिअन ऑफ इंडिया आणि विविध राज्यांची बाजू मांडणाऱ्या विद्वान वकिलांनी या न्यायालयासमोरही पूर्णपणे भिन्न मते व्यक्त केली आहेत. या न्यायालयाने संतोष कुमार आणि सुरेश गुप्ता यांच्या उपरोक्त प्रकरणांमध्ये वैद्यकीय डॉक्टरांच्या प्रकरणात एक विशेष श्रेणी देखील तयार केली, जेथे एफ.आय.आर नोंदवण्यापूर्वी प्राथमिक चौकशीहि गृहीत धरली होती. काही वकिलांनी असेही सांगितले की एफ.आय.आर नोंदवण्यापूर्वी काही प्रकारच्या प्राथमिक चौकशी हे सीबीआय च्या नियमावलीत परिकल्पित आहे.

९९. या प्रकरणांमध्ये विचार करण्यासाठी जो मुद्दा उपस्थित झाला आहे, त्याला सार्वजनिक महत्त्व खूप आहे. या न्यायालयाने ठरवलेल्या अनेक प्रकरणांमधील भिन्न मते लक्षात घेता, न्यायालये, तपास संस्था आणि नागरिक या सर्व संबंधितांच्या फायद्यासाठी या न्यायालयाच्या मोठ्या खंडपीठाद्वारे कायद्याचे आणि निर्णयाचे स्पष्ट प्रतिपादन असणे अत्यंत महत्वाचे झाले आहे.

१००. परिणामी, आम्ही माननीय मुख्य न्यायाधीशांना विनंती करतो की हे प्रकरण अधिकृत निर्णयासाठी या न्यायालयाच्या किमान पाच सदस्यीय न्यायाधीशांच्या घटनापीठाकडे पाठवावे."

६) त्याकरिता, या घटनापीठासमोरील एकमेव प्रश्न संहितेच्या कलम १५४ चे निर्वाचन आणि त्याचबरोबर कलम १५६ आणि १५७ चा देखील विचार करणे आवश्यक हा आहे.

७) याचिकाकर्त्याचे ज्येष्ठ विद्वान वकील श्री. एस. बी. उपाध्याय, युनिअन ऑफ इंडियाचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्री के. व्ही. विश्वनाथन, छत्तीसगड राज्याचे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल श्री. सिद्धार्थ लुथरा, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेश राज्यांचे ज्येष्ठ विद्वान वकील श्री. शेखर नाफडे, श्री. आर. के. दाश, कु. विभा दत्ता मखीजा, अनुक्रमे आरोपींचे विद्वान वकील श्री. जी. सीवाबालामुरुगन, सीबीआय चे विद्वान वकील डॉ. अशोक धमिजा, पश्चिम बंगाल राज्याचे वरिष्ठ विद्वान वकील श्री. कल्याण बंदोपाध्याय, राजस्थान राज्याचे विद्वान अतिरिक्त ॲटोरनी जनरल डॉ. मनीष सिंघवी आणि श्री. सुदर्शन सिंग रावत यांचे म्हणणे ऐकले.

८) या खंडपीठासमोर मांडण्यात आलेल्या मुख्य प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी, संहितेच्या खालील कलमांचा संदर्भ घेणे उपयुक्त ठरेलः-

**"१५४. दखलपात्र प्रकरणांमध्ये माहिती -** (१) दखलपात्र गुन्ह्याच्या कृत्या संबंधित प्रत्येक माहिती, जर पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकाऱ्याला तोंडी दिली गेली, तर सदर माहिती तो स्वतः लेखी नोंदवून घेईल किंवा त्याच्या निर्देशानुसार नोंदविल्या जाईल आणि ती माहिती देणाऱ्याला वाचून दाखवली जाईल आणि अशी प्रत्येक माहिती मग ती लेखी दिली गेली असेल किंवा लिहून घेतली असेल त्यावर ती देणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी असेल आणि त्याचा सार किंवा सारांश राज्य सरकारने या संदर्भात

विहित केलेल्या बुकमध्ये तश्या स्वरूपात प्रविष्ट केला जाईल.
(२) उप-कलम (१) अंतर्गत नोंदवलेल्या माहितीची प्रत माहिती देणाऱ्याला त्वरित मोफत दिली जाईल.
(३) उप-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या माहितीची नोंद करण्यास पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकाऱ्याने नकार दिल्याने व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, अशा माहितीचे सार लेखी आणि टपालाने संबंधित पोलीस अधीक्षकाकडे पाठवू शकते, जर सदर माहिती एखाद्या दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करते असे त्यांना समाधान झाल्यास, ते एकतर या प्रकरणाचा स्वतः तपास करतील किंवा या संहितेत दिलेल्या पद्धतीने त्यांच्या अधीनस्थ असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून तपास करण्याचे निर्देश देतील आणि अशा अधिकाऱ्याला त्या गुन्ह्याचे सर्व अधिकार संबंधित पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकाऱ्याचे असतील.

**१५६. दखलपात्र प्रकरणाचा तपास करण्याचा पोलिस अधिकाऱ्याचा अधिकार.** (१) पोलीस ठाण्यात असलेला कोणताही प्रभारी अधिकारी, दंडाधिकाऱ्याच्या आदेशाशिवाय, अशा कोणत्याही दखलपात्र प्रकरणाचा तपास करू शकेल, ज्याची चौकशी करण्याचा किंवा XIII प्रकरणात दिलेल्या तरतुदींनुसार खटला चालवण्याचा अधिकार अशा ठाण्याच्या हद्दीतील स्थानिक अधिकारक्षेत्र असलेल्या न्यायालयाला असेल.
(२) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास कोणत्याही प्रकरणात तपासाच्या कोणत्याही टप्प्यावर त्या अधिकाऱ्याला या कलमांतर्गत सदर प्ररकरणाचा तपास करण्याचा अधिकार नव्हता या कारणावरून प्रश्न उपस्थित केला जाणार नाही.
(३) उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कोणतेही दंडाधिकारी कलम १९० अन्व्ये अश्या तपासाचे आदेश देऊ शकतात.

**१५७. तपास करण्याची प्रक्रिया.** (१) जर, प्राप्त झालेल्या माहितीवरून अन्यथा एखाद्या पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला कलम १५६ अन्वये तपास करण्याचा अधिकार असलेल्या गुन्ह्याचा संशय येत असेल, तर तो तत्काळ त्याचा अहवाल न्यायदंडाधिकाऱ्यांकडे पाठवेल ज्याला पोलिसांच्या अहवालावर अशा गुन्ह्याची दखल घेण्याचा अधिकार दिलेला आहे आणि तो वैयक्तिकरित्या पुढील कार्यवाही करण्यास समोर जाईल, किंवा पुढे जाण्यासाठी, राज्य सरकारने सामान्य किंवा विशेष आदेशाने या संदर्भात विहित केलेल्या दर्जाच्या खाली नसलेल्या त्याच्या अधीनस्थ अधिकाऱ्यांपैकी एक अधिकारी घटनास्थळी, प्रकरणातील तथ्य आणि परिस्थिती तपासण्यासाठी आणि आवश्यक असल्यास, गुन्हेगाराचा शोध आणि अटक करण्यास उपाययोजना करण्यासाठी नियुक्त करेल.

अशी तरतूद आहे की -

(ए) जेव्हा अशा कोणत्याही गुन्ह्याची माहिती कोणत्याही व्यक्तीचे नाव घेऊन दिली जाते आणि प्रकरण गंभीर स्वरूपाचे नसते, तेव्हा पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला प्रत्यक्ष पुढे जाण्याची किंवा घटनास्थळी तपास करण्यासाठी अधीनस्थ

अधिकाऱ्याची नेमणूक करण्याची आवश्यकता नसते.

(बी) जर एखाद्या पोलिस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला असे दिसून आले की तपास सुरु करण्यासाठी पुरेसे कारण नाही, तर त्याने त्या खटल्याचा तपास करू नये. पुढे असे नमूद केले आहे कि बलात्काराच्या गुन्ह्याच्या संबंधीत पीडितेचे निवेदन पीडितेच्या निवासस्थानी किंवा तिच्या पसंतीच्या ठिकाणी आणि व्यावहारिकदृष्ट्या शक्यतोवर महिला पोलिस अधिकाऱ्याद्वारे तिचे पालक किंवा पालनकरते किंवा परिसरातील जवळचे नातेवाईक किंवा सामाजिक कार्यकर्ता यांच्या उपस्थितीत नोंदविण्यात यावे.

(२) उप-कलम (१) च्या तरतुदीतील खंड (ए) आणि (बी) मध्ये नमूद केलेल्या प्रत्येक प्रकरणात, पोलिस स्टेशनचा प्रभारी अधिकारी त्याच्या अहवालात त्याचे पूर्णपणे पालन न करण्याची कारणे नमूद करून त्या उप-कलमच्या आवश्यकता आणि या तरतुदीच्या खंड (बी) मध्ये नमूद केलेल्या प्रकरणात, अधिकाऱ्याने माहिती देणाऱ्याला, जर असेल तर, राज्य सरकारने विहित केलेल्या पद्धतीने, तत्काळ वस्तुस्थिती सूचित करेल आणि तो या प्रकरणाची चौकशी करणार नाही किंवा त्याची चौकशी करू देणार नाही अशी माहिती देईल ."

**वाद** -

९) सर्वात पहिले, श्री. **एस.बी. उपाध्याय, ज्येष्ठ** विद्वान वकील, यांनी कलम १५४ मध्ये नमूद केलेल्या अटींबाबत स्पष्टीकरण देताना असे सादर केले की कलम १५४ (१) अनिवार्य आहे कारण 'शाल(shall)' हा शब्द विधानसभेच्या वैधानिक हेतूचे सूचक आहे. प्रथम खबरी अहवाल नोंदविण्याशिवाय पोलीस अधिकाऱ्याकडे कोणतेही विवेकाधिकार उरत नाही, असा युक्तिवादही त्यांनी केला. वरील प्रस्तावाच्या समर्थनार्थ त्यांनी खालील निर्णयांवर भर दिला, उदा. **बी. प्रेमानंद आणि इतर - विरुद्ध - मोहन कोइकल आणि इतर** (२०११) ४ एससीसी २६६, **मेसर्स हिरालाल रतनलाल इत्यादी - विरुद्ध - उत्तरप्रदेश राज्य आणि इतर** (१९७३) १ एससीसी २१६ आणि **गोविंदलाल छगनलाल पटेल -विरुद्ध- कृषी उत्पादन बाजार समिति गोध्रा आणि इतर.** (१९७५) २ एससीसी ४८२.

१०) श्री. उपाध्याय यांनी संहितेच्या कलम १५४(१) मध्ये वापरलेल्या भाषेकडे आमचे लक्ष वेधून पुढे प्रस्तुत केले कि 'वाजवी' किंवा 'विश्वासार्ह' शब्दांचा उपसर्ग न लावता सदर भाषा केवळ 'माहिती' चा उल्लेख करते.हा दावा सिद्ध करण्यासाठी त्यांनी खालील निर्णयांवर भर दिला, उदा. , **भजनलाल (उपरोल्लेखित), गणेश भवन पटेल आणि इतर - विरुद्ध - महाराष्ट्र**

**राज्य** (१९७८) ४ एससीसी. ३७१, **अलेक पदमसी आणि इतर - विरुद्ध - युनिअन ऑफ इंडिया आणि इतर** (२००७) ६ एससीसी १७१, **रमेश कुमारी (उपरोल्लेखित), रामलाल नारंग - विरुद्ध - राज्य (दिल्ली प्रशासन)** (१९७९) २ एससीसी ३२२ आणि **लल्लन चौधरी आणि इतर -विरुद्ध- बिहार राज्य आणि इतर (२००६)** १२ एससीसी २९९. याशिवाय, एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्यांना प्राथमिक चौकशी करण्याची परवानगी दिल्याचे विविध प्रतिकूल परिणामही त्यांनी प्रकाशात आणले.

११) युनिअन ऑफ इंडियाच्या वतीने हजर असलेले अतिरिक्त सॉलिसिटर जनरल **श्री. के. व्ही. विश्वनाथन** यांनी सांगितले की, ज्या सर्व प्रकरणांमध्ये संहितेच्या कलम १५४ अंतर्गत माहिती प्राप्त होते, त्या सर्व प्रकरणांमध्ये, जर ते दखल पात्र गुन्ह्याच्या कृत्याशी संबंधित असेल, तर पोलिसांनी त्या उद्देशासाठी ठेवलेल्या नोंदणीमध्ये सदर माहित त्वरित प्रविष्ट करणे अनिवार्य आहे.विद्वान अतिरिक्त सॉलिसिटर जनरल यांच्या मते, नोंदणी करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी अशा माहितीची सत्यता तपासण्यासाठी पोलिस अधिकाऱ्यांना कोणताही विवेक किंवा अधिकार नाही. त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की, संहितेच्या कलम १५६ आणि १५७ अंतर्गत, जो पोलिस अधिकारी, एकतर गुप्त माहिती किंवा स्त्रोत माहिती (क्रिप्टीक इन्फॉरमेशन) किंवा अफवा इत्यादीच्या आधारे घटनास्थळी जातो, तेव्हा त्याने दखलपात्र गुन्ह्या संबंधी माहित गोळा करताना, पोलिस स्टेशनला अहवाल (रुक्का) पाठवावा जेणेकरून त्याची एफ.आय.आर. म्हणून नोंद करता येईल. एफ.आय.आर. ची नोंदणी, अटक, आरोपींना दिलेले विविध संरक्षण आणि तपास बंद करण्याचा पोलिसांच्या अधिकाराशी संबंधित संहितेच्या योजनेवरही त्यांनी प्रकाश टाकला. आपल्या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ त्यांनी या न्यायालयाच्या विविध निर्णयांवर भर दिला जसे कि, **भजनलाल** (**उपरोल्लेखीत**), **रमेश कुमारी** (**उपरोल्लेखीत**) आणि **अलेक पदमसी** (**उपरोल्लेखीत**). अनिवार्य प्रस्तावाच्या विरोधात असलेल्या विशिष्ट निर्णयांवरही त्यांनी विचारविनिमय केला. उदा. **उत्तर प्रदेश राज्य - विरुद्ध- भगवंत किशोर जोशी** (१९६४) ३ एससीआर ७१, **पी. सिराजुद्दीन (उपरोल्लेखित), सेव्ही (उपरोल्लेखित), शशिकांत (उपरोल्लेखित), राजिंदर सिंग कटोच (उपरोल्लेखित), जेकब मॅथ्यू -विरुद्ध- पंजाब राज्य आणि इतर.** (२००५) ६ एससीसी १. संहितेच्या कलम १५४(१) च्या आवश्यकतांची पूर्तता करणाऱ्या पोलीस ठाण्याच्या प्रभारी

अधिकाऱ्यापुढे दखलपात्र गुन्हा उघड करणारी कोणतीही माहिती समोर आल्यास, त्या पोलीस अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात, म्हणजे अशा माहितीच्या आधारे गुन्हा दाखल करण्याखेरीज दुसरा पर्याय नाही, असे सांगून त्यांनी आपल्या युक्तिवादाचा समारोप केला. पुढे, त्यांनी खोटे प्रकरण दाखल करण्याविरुद्ध संहितेअंतर्गत प्रदान केलेल्या विविध सुरक्षा उपायांवर भर दिला.

१२) सीबीआय चे विद्वान **वकील डॉ. अशोक धमीजा** यांनी सादर केले की संहितेच्या कलम १५४ (१) अंतर्गत "शाल (shall)' या शब्दाचा वापर स्पष्टपणे अनिवार्य करतो की जर पोलिस अधिकाऱ्याला दिलेली माहिती दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित असेल तर त्याला गुन्हा नोंदवणे अनिवार्य आहे.विद्वान वकिलांच्या मते, अशा परिस्थितीत पोलिसांना कोणताही पर्याय किंवा विवेकाधिकार दिला जात नाही. त्यांनी पुढे असा युक्तिवाद केला की “शाल (shall)” हा शब्द स्पष्टपणे आदेश सूचित करतो आणि ते कायदेशीर हेतूचे निर्विवादपणे सूचक आहेत. त्याच्या मते, जे आवश्यक आहे ते फक्त पोलिसांना दिलेल्या माहितीद्वारे दखलपात्र गुन्ह्या झाल्याचा खुलासा असणे आवश्यक आहे.त्यांनी असा युक्तिवादही केला की संहितेच्या कलम १५४ मध्ये "माहिती" हा शब्द सरलतेसाठी वापरला आहे आणि त्यात "विश्वासार्ह माहिती" किंवा "वाजवी तक्रार" यासारखे पात्र शब्द वापरले जात नाहीत. अशा प्रकारे, संसदाचा हेतू वापरलेल्या भाषेवरून स्पष्टपणे स्पष्ट आहे की एफ.आय.आर. नोंदवण्यासाठी केवळ दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहिती पुरेशी आहे. या पुष्ट्यर्थ त्यांनी **भजनलाल (उपरोल्लेखित), रमेश कुमारी (उपरोल्लेखित), अलेक पदमसी (उपरोल्लेखित), लल्लन चौधरी (उपरोल्लेखित), पोलीस अधीक्षक, सीबीआय -विरुद्ध- तपन कुमार सिंग** (२००३) ६ एससीसी १७५, **मेसर्स हिरालाल रत्तनलाल (उपरोल्लेखित), बी. प्रेमानंद (उपरोल्लेखित), खुबचंद -विरुद्ध- राजस्थान राज्य** एआयआर १९६७ एससी १०७४, **पी. सिराजुद्दीन (उपरोल्लेखित), राजिंदर सिंग कटोच (उपरोल्लेखित), भगवंत किशोर जोशी (उपरोल्लेखित), पश्चिम बंगाल राज्य -विरुद्ध- लोकशाही हक्क संरक्षण समिती, पश्चिम बंगाल** (२०१०) ३ एससीसी ५७१ यावरही भर दिला. खोटे प्रकरण दाखल करण्याविरूद्ध संहितेत प्रदान केलेल्या विविध सुरक्षा उपायांकडेही त्यांनी लक्ष वेधले. शेवटी, जर माहिती एखाद्या दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करत असेल तर संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर.

नोंदवणे अनिवार्य आहे आणि अशा परिस्थितीत कोणतीही प्राथमिक चौकशी करण्यास परवानगी नसेल अश्याप्रकारे पुनरुच्चार करून त्यांनी निष्कर्ष काढला. पुढे, त्यांनी हे देखील स्पष्ट केले की सीबीआय ने काही विशिष्ट परिस्थितींमध्ये, सीबीआय गुन्हे नियमावली अंतर्गत प्रदान केल्याप्रमाणे केलेली प्राथमिक चौकशी, दिल्ली विशेष पोलीस आस्थापना कायदा, १९४६ मध्ये समाविष्ट असलेल्या सीबीआयशी संबंधित विशेष तरतुदींमुळे वेगळ्या आधारावर उभी आहे, जी संहितेच्या कलम ४ (२) आणि ५ अंतर्गत जतन केली गेली आहे.

१३) पश्चिम बंगाल राज्याच्यावतीने हजर असलेले ज्येष्ठ वकील **श्री.** कल्याण बंदोपाध्याय यांनी सांगितले की, जेव्हा केव्हा दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित कोणतीही माहिती प्राप्त होते, तेव्हा ती नोंदवणे हे पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे आणि अशा माहितीची प्रत, संहितेच्या कलम १५४ (२) अंतर्गत सदर माहिती देणाऱ्याला त्वरित व विनामूल्य दिल्या गेली पाहिजे. त्यांच्या मते, पोलीस अधिकाऱ्याकडे प्रथमतः दखलपात्र गुन्ह्यासंबंधी खबर नोंदवण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. एफ.आय.आर. नोंदवण्याच्या अनुषंगाने पोलीस अधिकाऱ्याद्वारे अनुसरण करण्यात येणाऱ्या विविध पैलुंवरही त्यांनी प्रकाश टाकला. संहितेच्या कलम १५४ च्या व्याप्तीबाबत ते **एच.एन. रिशबुद आणि इंदर सिंग -विरुद्ध- दिल्ली राज्य** एआयआर १९५५ एससी १९६, **भजन लाल (उपरोल्लेखित), एस.एन. शर्मा - विरूढ- बिपेन कुमार तिवारी** (१९७०) १ एससीसी ६५३, **युनियन ऑफ इंडिया -विरुद्ध - प्रकाश पी. हिंदुजा** (२००३) ६ एससीसी १९५, **शेख हसीब उर्फ तबरक - विरुद्ध - बिहार राज्य** (१९७२) ४ एससीसी ७७६, **शशिकांत (उपरोल्लेखित), अशोक कुमार तोडी -विरुद्ध - किश्वर जहाँ आणि इतर** (२०११) ३ एससीसी ७५८, **पद्मा सुंदरा राव (मृत) आणि इतर -विरुद्ध - तामिळनाडू राज्य आणि इतर** (२००२) ३ एससीसी ५३३, **पी. सिराजुद्दीन (उपरोल्लेखित), राजिंदर सिंग कटोच (उपरोल्लेखीत), भगवंत किशोर जोशी (उपरोल्लेखित) आणि मन्नालाल खाटीक - विरुद्ध - राज्य** एआयआर १९६७ कलकत्ता ४७८ याचा आधार घेतला.

१४) राजस्थान राज्याचे अतिरिक्त महाधिवक्ता **डॉ. मनीष सिंघवी** यांनी सादर केले की संहितेच्या कलम १५४(१) मध्ये एफ.आय.आर. ची नोंदणी अनिवार्य आहे. खोट्या

एफ.आय.आर. दाखल करण्याविरुद्ध संहितेत अंतर्भूत असलेल्या विविध सुरक्षा उपायांवरही त्यांनी प्रकाश टाकला. भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत उद्भवलेल्या खटल्यांशी संबंधित एकमेव अपवाद आहे, असे त्यांनी निदर्शनास आणून दिले, कारण अशा प्रकरणांमध्ये दंडाधिकाऱ्यांनी दखल घेण्यापूर्वी मंजुरी घेणे आवश्यक असते आणि सरकारी कर्मचाऱ्यांना काही प्रकारचे संरक्षण दिले जाते, जेणेकरून त्यांना त्रास देण्यासाठी खटले दाखल करता येणार नाहीत.

१५) फौ.अपील क्र. १४१० / २०११ मधील अपीलकर्त्याचे विद्वान अधिवक्ता **श्री. जी. सीवाबालामुरुगन** यांनी आधीच्या इतिहासाचा मागोवा घेतल्यानंतर, म्हणजे १८६१, १८७२, १८८२, आणि १८९८ च्या फौजदारी प्रक्रिया संहितेतील संबंधित तरतुदींनुसार एफ.आय. आर. करण्याविषयीच्या शिफारशी वरही त्यांनी प्रकाश टाकला. ४१ व्या विधी आयोगाच्या अहवाल आणि फौजदारी कायदा (दुरुस्ती) कायदा, २०१३ चे कलम १३ समाविष्ट करण्याविषयीच्या शिफारशीवरहि  त्यांनी प्रकाश टाकला.

१६)  उत्तर प्रदेश राज्याची बाजू मांडणारे विद्वान ज्येष्ठ वकील **श्री.** आर. के. दास यांनी सुरुवातीला, खोट्या तक्रारदारांच्या सांगण्यावरून निष्पाप व्यक्तींचा अनावश्यक छळ रोखण्यासाठी, एफ. आय.आर. नोंदविण्यापूर्वी आरोपांची प्राथमिक चौकशी करणे इष्ट आहे, परंतु त्यानंतर संहितेच्या ठळक वैशिष्ट्यांचा विचार केल्यानंतर, उत्तर प्रदेश पोलीस नियमांमधील प्रमुख तरतुदी कलम २ (४) (एच), १५६ (१),२०२ (१), १६४ यासारख्या विविध तरतुदी लक्षात घेऊन विद्वान ज्येष्ठ वकिलांनी असा युक्तिवाद केला की कोणत्याही प्रकरणात दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित एफ.आय.आर. च्या माहितीच्या सत्याची पडताळणी होईपर्यंत त्याची नोंदणी पुढे ढकलली जाऊ नये.याव्यतिरिक्त, त्यांनी या न्यायालयाच्या विविध निकालांवरही भर दिला, जसे की, **मोहिंद्रो -विरुद्ध- पंजाब राज्य** (२००१) ९ एससीसी ५८१, **रमेश कुमारी (उपरोल्लेखित), भजनलाल (उपरोल्लेखित), प्रकाश सिंग बादल (उपरोल्लेखित), मुन्ना लाल -विरुद्ध- हिमाचल प्रदेश राज्य** १९९२ क्रि.लॉ.ज. १५५८, **गिरिधारी लाल कनक -विरुद्ध- राज्य आणि** इतर २००२ क्रि.लॉ.ज २११३ **आणि कट्टेरी मोइदीन कुट्टी हाजी - विरुद्ध - केरळ राज्य** २००२ (२) क्राईम्स १४३.अखेरीस, त्यांनी असा निष्कर्ष काढला

की जेव्हा संहितेच्या XII प्रकरणात नमूद केल्याप्रमाणे वैधानिक तरतुदी स्पष्ट आणि असंदीग्ध असतील, तेव्हा कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी पोलिसांना आरोपांची प्राथमिक चौकशी करण्याची परवानगी देणे कायदेशीररित्या अनुज्ञेय राहणार नाही.

१७) छत्तीसगड राज्याची बाजू मांडणारे विद्वान तिरिक्त सॉलिसिटर जनरल **श्री. सिद्धार्थ लुथरा** यांनी घटनापीठासमोर संदर्भाच्या व्याप्तीवर जोर देऊन आपल्या युक्तिवादाला सुरवात केली.त्यानंतर, त्यांनी विविध निर्णयांची सविस्तर माहिती दिली ज्यात असे म्हटले होते की, तपास अधिकाऱ्याला, संहितेच्या कलम १५४ अंतर्गत दखलपात्र गुन्ह्याची माहिती मिळाल्यावर, एफ. आय. आर. नोंदवण्यापूर्वी प्राथमिक चौकशी करण्याचा अधिकार असतो उदा. **भगवंत किशोर जोशी (उपरोल्लेखित), पी. सिराजुद्दीन (उपरोल्लेखित), सेवी (उपरोल्लेखित) आणि राजिंदर सिंग कटोच (उपरोल्लेखित).** त्याच वेळी, त्यांनी पुढील निर्णयही आमच्या निदर्शनास आणून दिले उदा **भजनलाल (उपरोल्लेखित), रमेश कुमारी (उपरोल्लेखित), प्रकाश सिंग बादल (उपरोल्लेखित) आणि अलेक पदमसी (उपरोल्लेखित),** ज्यात असे म्हटले होते की पोलीस अधिकारी एफ.आय.आर. नोंदवण्यास कर्तव्यबद्ध आहे, दखलपात्र गुन्ह्याची माहिती मिळाल्यावर आणि कलम १५४ च्या आदेशानुसार प्राथमिक चौकशीचा अधिकार अस्तित्वात नाही. विद्वान अतिरिक्त सॉलीसिटर जनरल यांनी १८९८ आणि १९७३ च्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ चे तुलनात्मक विश्लेषण केले आहे. त्यांनी असेही अधोरेखित केले की [कलम २(एस)] पोलीस ठाण्यामध्ये घडणाऱ्या प्रत्येक कृतीची नोंद पोलीस ठाण्यामध्ये ठेवलेल्या डायरी मधे केली जाते ज्याला सर्वसाधारण डायरी, स्टेशन डायरी किंवा दैनंदिन डायरी म्हटले जाऊ शकते. **तपन कुमार सिंग (उपरोल्लेखित), रेः सुब्बारत्नम आणि इतर** एआयआर १९४९ मद्रास ६६३ यासारख्या विविध न्यायनिर्णयांचा देऊन त्यांनी सर्वसामान्य डायरीची प्रासंगिकता अधोरेखित केली. त्यांनी पुढे निदर्शनास आणून दिले की, सध्या देशभरात वैवाहिक, व्यावसायिक, वैद्यकीय निष्काळजीपणा आणि भ्रष्टाचाराशी संबंधित गुन्ह्यांमध्ये, संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. नोंदवल्याशिवाय/त्यापूर्वी पोलिसांकडून चौकशी किंवा प्राथमिक चौकशी करण्याच्या तरतुदी आहेत.एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी चौकशी करण्यासंदर्भातले पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, कोलकाता, मुंबई इत्यादी राज्यांमध्ये प्रचलित असलेले

विविध पोलिस नियमही त्यांनी आमच्या निदर्शनास आणून दिले. याव्यतिरिक्त, गुन्हा नोंदवण्यापूर्वी प्राथमिक चौकशी करणे हे कायद्याच्या दृष्टीने अनुज्ञेय आणि वैध आहे हे अधोरेखित करण्यासाठी त्यांनी सीबीआय (CBI) च्या गुन्हे नियमावलीतून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला.वरील युक्तिवादांना दुजोरा देत विनंती करून त्यांनी असा निष्कर्ष काढला की एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी प्राथमिक चौकशी अनुज्ञेय मानली जावी.पुढे, त्यांनी यावर जोर दिला की, एफ.आय.आर नोंदवण्यापूर्वी पोलिसांकडून चौकशी किंवा प्राथमिक चौकशी करण्याचा अधिकार प्रसंभाविक प्रक्रियेचा गैरवापर दूर करेल, कारण एफ.आय.आर. ची नोंदणी एखाद्या व्यक्तीविरुद्ध विविध महत्त्वाच्या कामांसाठी अडथळा ठरते जसे कि नोकरी किंवा पारपत्रासाठी अर्ज करणे. विद्वान अतिरिक्त सॉलिसीटर जनरल यांनी पुढे या न्यायालयाला काही विशिष्ट श्रेणीतील प्रकरणे ज्यामध्ये प्राथमिक चौकशी केली जावी या करीत मार्गदर्शक तत्त्वे तयार करावी अशी विनंती केली.

१८) **श्री शेखर नाफडे**, महाराष्ट्र राज्याच्या वतीने उपस्थित असलेले जेष्ठ विद्वान वकील यांनी सादर केले की सामान्यतः स्टेशन हाऊस ऑफिसर (एसएचओ) यांनी दखलपात्र गुन्ह्याचे घटक उघड करणारी तक्रार प्राप्त झाल्यावर एफ.आय.आर. नोंदवावा, परंतु काही विशिष्ट परिस्थितीत, माहितीच्या सत्यतेबद्दल किंवा विश्वासार्हतेबद्दल शंका असल्यास, त्याला प्राथमिक चौकशी करण्याचा विवेक असावा आणि त्यानंतर, तपासासाठी प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे त्याचे समाधान झाल्यास, एफ.आय.आर. नोंदवावा. एफ.आय.आर. नोंदवण्याचे अनिवार्य कर्तव्य त्याच्यावर लादले जाऊ नये. त्यांच्या मते, हा अर्थ लावल्याने दोन टोकाच्या भूमिकांमध्ये सुसंवाद साधता येईल जसे कि, ज्या क्षणी दखलपात्र गुन्ह्याचे घटक उघड करणारी तक्रार दाखल केली जाते, त्या क्षणी पोलीस अधिकाऱ्याने कोणत्याही छाननीशिवाय एफ.आय.आर.नोंदवला पाहिजे, हा एक टोकाचा प्रस्ताव आहे आणि भारतीय राज्यघटनेच्या कलम २१ च्या आदेशाच्या विरोधात आहे, त्याचप्रमाणे, दुसरा टोकाचा दृष्टिकोन असा आहे की एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी पोलीस अधिकाऱ्याने प्रकरणाचा मोठ्या प्रमाणात तपास केला पाहिजे. तसेच त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की हे दोन्ही मार्ग नाकरून मधला मार्ग निवडला गेला पाहिजे. त्यांनी पुढील निर्णयही सादर केले ते म्हणजे, **भजनलाल (उपरोल्लेखित), रमेश कुमारी (उपरोल्लेखित), प्रकाश सिंग बादल (उपरोल्लेखित) आणि**

**अलेक पदमसी (उपरोल्लेखित)** ज्यामध्ये असे म्हटले गेले आहे की जर पोलीस ठाण्यात दखलपात्र गुन्ह्याचा आरोप करणारी तक्रार प्राप्त झाली तर स्टेशन हाऊस ऑफिसर (एसएचओ) कडे संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. नोंदवण्याशिवाय दुसरा पर्याय नाही.ज्येष्ठ विद्वान वकिलांच्या मते, या निकालांवर पुनर्विचार करणे आवश्यक आहे कारण त्यांनी संहितेच्या इतर तरतुदींशिवाय कलम १५४ चा अर्थ लावला आहे आणि ज्यामुळे संहितेच्या कलम १५४ वर अनुच्छेद २१ चा प्रभाव विचारात घेण्यात अयशस्वी ठरले आहेत.

१९) सोबतच, त्यांनी खालील निर्णयांकडे लक्ष वेधले, म्हणजे, राजिंदर **सिंग कटोच (उपरोल्लेखीत), पी. सिराजुद्दीन (उपरोल्लेखीत), भगवंत किशोर जोशी (उपरोल्लेखीत) आणि सेव्ही (उपरोल्लेखीत), जे** असे मानतात की संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी, प्रथमदर्शनी दखलपात्र गुन्हा केल्याचे प्रकरण आहे की नाही हे शोधण्यासाठी प्राथमिक चौकशी करणे पोलिस अधिकाऱ्यासाठी खुले आहे.विद्वान ज्येष्ठ वकिलांच्या मते, संहितेचे कलम १५४ हे तपासाशी संबंधित वैधानिक तरतुदींच्या साखळीचा भाग आहे आणि म्हणूनच, कलम ४१, १५७, १६७, १६९, इत्यादींच्या तरतुदींच्या योजनेचा कलम १५४ च्या निर्वाचनाशी संबंध असणे आवश्यक आहे.याव्यतिरिक्त, त्यांनी यावर जोर दिला की शब्दशः अर्थ लावल्याने एफ.आय.आर. ची यांत्रिक नोंदणी कमी होईल.समांतरपणे, त्यांनी **मनेका गांधी -विरुद्ध- युनिअन ऑफ इंडिया** (१९७८) १ एससीसी २४८ चा संदर्भ देऊन संहितेच्या कलम १५४ वर अनुच्छेद २१ चा प्रभाव अधोरेखित केला, ज्यामध्ये या न्यायालयाने फौजदारी कायद्याशी संबंधित अनेक तरतुदींना अनुच्छेद २१ लागू केले आहे. या न्यायालयाने असेही नमूद केले आहे की अनुच्छेद २१ मध्ये समाविष्ट असलेला "law (कायदा)" हा शब्दप्रयोग वाजवी आहे आणि हि केवळ वैधानिक तरतुदी नसून त्याची तर्कसंगतता किंवा अन्यथा विचारात न घेता कायद्याचे पालन करते.विद्वान ज्येष्ठ वकिलांनी असा युक्तिवाद केला की अनुच्छेद २१ च्या संदर्भांत, संहितेच्या कलम १५४ च्या तरतुदींचा अभ्यास केला गेला पाहिजे म्हणजे एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी, तपासासाठी प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे पोलिस अधिकाऱ्याचे समाधान झाले पाहिजे. कलम १५४ मध्ये त्याला दिलेल्या माहितीच्या विश्वासार्हतेबद्दल प्रामाणिकपणे गंभीर शंका असल्यास प्राथमिक चौकशी करण्याचा पोलिस अधिकाऱ्याचा निहित अधिकार आहे यावरही त्याने भर दिला.फौजदारी

कायदा (दुरुस्ती) कायदा, २०१३, विशेषतः कलम १६६ए कडे लक्ष वेधून, श्री. नाफडे यांनी असा युक्तिवाद केला की इतर अदखलपात्र गुन्ह्यांचा विचार करता (कलम १६६ ए मध्ये नमूद केलेल्यांव्यतिरिक्त), माहितीच्या शाश्वततेबद्दल काही शंका असल्यास प्राथमिक चौकशी करण्याचा पोलिसांना विवेकाधिकार आहे.

२०) डॉक्टरांच्या वैद्यकीय निष्काळजीपणाशी संबंधित आरोपांच्या बाबतीत, या न्यायालयाच्या काही निर्णयांकडे आमचे लक्ष वेधून, **तपन कुमार सिंग (उपरोल्लेखीत), जेकब मॅथ्यू (उपरोल्लेखीत)** इत्यादी, निर्णयांच्या याबाबतीत असे नमूद करण्यात आले की कोणत्याही वैद्यकीय व्यावसायिकावर केवळ तक्रारीत केलेल्या आरोपांच्या आधारे खटला चालवला जाऊ नये. विविध निर्णयांकडे लक्ष वेधून, श्री. नाफडे यांनी यावर भर दिला की योग्य प्रकरणांमध्ये, एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला, दखलपात्र गुन्ह्याची तक्रार मिळाल्यावर, तक्रारीत आरोपींविरुद्ध किमान प्रथमदर्शनी केलेले आरोप विश्वासार्ह आहेत याचे समाधान करणे योग्य ठरेल.त्यांनी असा युक्तिवादही केला की कायद्याच्या कोणत्याही एका तरतुदीचे वेगळे वाचन आणि निर्वचन करता येत नाही, परंतु कायदा संपूर्णतः वाचला गेला पाहिजे. त्यानुसार, त्यांनी विनंती केली की संहितेच्या कलम ४१, ५७, १५६, १५७, १५९, १६७, १९०, २००, आणि २०२ च्या तरतुदींचे एकत्र वाचन केले गेले पाहिजे. त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की संहितेचे कलम १५४(३) कोणत्याही तक्रारदाराला ज्याची तक्रार पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याने एफ.आय.आर. म्हणून नोंदवली नाही, तर त्याला सदर कलम मध्ये दिलेली तरतूद एफ.आय.आर. म्हणून तक्रार नोंदवून घेण्याच्या उद्देशाने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याशी संपर्क साधण्यास सक्षम करते आणि अशा प्रकरणात, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याला एफ.आय.आर. नोंदवण्याचे आणि प्रकरणाचा तपास निर्देशित करण्याचे सर्व अधिकार आहेत.एखाद्या व्यथित व्यक्तीला वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याशी संपर्क साधण्यासाठी उपलब्ध असलेल्या उपायाव्यतिरिक्त, तो कलम १९० अंतर्गत तक्रार करून संबंधित दंडाधिकाऱ्यांकडेही जाऊ शकतो.त्यांनी यावरही भर दिला की, एफ.आय.आर. नोंदवण्यास नकार देण्याविरूद्ध आणि दखलपात्र गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी विधिमंडळाने पुरेसे उपाय प्रदान केले आहेत आणि ही वस्तुस्थितीनुसार, पोलीस अधिकाऱ्यांना केवळ तक्रारीच्या सत्यतेबद्दल शंका असल्यास, तक्रारीत दखलपात्र गुन्ह्याचे घटक उघड केले गेले आहेत म्हणून

एफ.आय.आर. नोंदवण्यास ते बांधील नाही हे या कायदेशीर हेतूचे सूचक आहे.त्यांनी असेही निदर्शनास आणून दिले की कायद्यात वापरल्या जाणाऱ्या "शाल (shall)" या शब्दाचा अर्थ नेहमीच या प्रकरणात कोणत्याही विवेकाधिकराचा अभाव असा होत नाही. या प्रस्तावासाठी, त्यांनी हे देखील अधोरेखित केले आहे की या न्यायालयाने शब्दशः निर्वाचनाच्या नियमापेक्षा उद्देशपूर्ण निर्वाचनाच्या नियमाला प्राधान्य दिले आहे, ज्यासाठी ते **चेयरमन बोर्ड ऑफ माइनिंग एक्सामिनेशन अँड चीफ इन्स्पेक्टर ऑफ माइन्स आणि इतर -विरुद्ध - रामजी** (१९७७) २ एससीसी २५६, **ललित मोहन पांडे - विरुद्ध - पूरन सिंग** (२००४) ६ एससीसी ६२६, **प्रतिभा बोस -विरुद्ध- कुमार रुपेंद्र देब रायकट** (१९६४) ४ एससीआर ६९ वर ते अवलंबून आहेत. त्यांनी पुढे निदर्शनास आणून दिले की संहितेच्या कलम १५४ च्या तरतुदी सरळसूत्रीसाच्यात ठेवणे अशक्य आहे. एफ.आय.आर. ची नोंदणी किंवा नोंदणी न करण्याबाबत काही मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याची विनंतीही त्यांनी केली. शेवटी, त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की प्रक्रिया निष्पक्ष आणि न्याय्य असावी अशी **अ**नुच्छेद २१ ची आवश्यकता आहे.त्यांच्या मते, जर पोलीस अधिकाऱ्याला या प्रकरणात शंका असेल तर त्याला या प्रकरणाची प्राथमिक चौकशी करण्याचा विवेकाधिकार असला पाहिजे.जर त्याला अशी प्राथमिक चौकशी करण्यापासून रोखले गेले, तर या प्रक्रियेला मनमानी आणि अवास्तवपणाचा फटका बसेल. अशा प्रकारे, संहितेच्या कलम १५४ चा अर्थ अनुच्छेद २१ च्या आधारे लावला जावा, अशी विनंती करून त्यांनी आपल्या युक्तिवादाचा समारोप केला.

२१) मध्य प्रदेश राज्याची बाजू मांडणाऱ्या ज्येष्ठ विद्वान  वकील **कु. विभा दत्ता मखीजा** यांनी सादर केले आहे कलम १५४ आणि संहितेच्या इतर तरतुदींचे साधे वाचन हे दर्शविते की ते अनिवार्य नसले तरी पोलिस अधिकाऱ्याने दखलपात्र गुन्ह्याची कोणतीही पावले उचलण्यापूर्वी किंवा तपास करण्यापूर्वी एफ.आय.आर. नोंदणी करणे पूर्णपणे बंधनकारक आहे. त्यांनी पुढे निदर्शनास आणून दिले की एखाद्या गुन्ह्याची प्रथम खबर मिळाल्यानंतर आणि राज्य सरकारच्या विविध नियमांनुसार पोलीस ठाण्यात ठेवलेल्या प्रथम माहिती बुक (तोंडी असो किंवा लेखी) या अहवालाची नोंदणी करण्यापूर्वी, केवळ काही प्राथमिक चौकशी किंवा तपासात्मक पावले संहितेच्या वैधानिक चौकटीखाली न्याय्य असलेल्या मर्यादेपर्यंत परवानगी अंतर्गत आहेत आणि दखलपात्र गुन्ह्याची नोंद झाली आहे की नाही हे

निश्चित करण्याच्या उद्देशाने काटेकोरपणे मंजूर केलेल्या वैधानिक विवेकबुद्धीच्या चौकटीमध्ये आहेत. त्यामुळे, कायद्याच्या कलम १७३ अंतर्गत अंतिम अहवालात रुपांतरीत होणाऱ्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ शकत नाही आणि तो रद्द केला जाऊ शकत नाही, कारण चौकशीचा एक भाग, तपास किंवा तपासादरम्यान उचललेली पावले ही प्रथम खबर मिळाल्यानंतर घेतली जातात, परंतु ती नोंद करण्यापूर्वी, जोपर्यंत  हा तपास अन्यायकारक, बेकायदेशीर, दुर्भावनापूर्ण असल्याचे आढळून येत नाही तोपर्यंत आरोपींच्या निष्पक्ष तपासाच्या अधिकारावर गंभीर पूर्वग्रह निर्माण झालेला असतो. वरील युक्तिवादांच्या समर्थनार्थ, त्यांनी संहितेच्या पूर्वीच्या तरतुदींचा आणि सध्याच्या वैधानिक चौकटीचा शोध लावला. या न्यायालयाच्या विविध निर्णयांच्या संदर्भात फौजदारी कायदा (दुरुस्ती) कायदा, २०१३.तिने असा निष्कर्ष काढला की संहितेच्या कलम १५४ मध्ये कोणत्याही संशयाचे क्षेत्र नाही की जेथे दखलपात्र गुन्हा उघड केला जातो, तेथे पोलिसांकडून उक्त माहिती नोंदवण्याचा किंवा न करण्याचा कोणताही विवेक नसतो, तथापि, ते प्रकरणानुसार भिन्न असू शकते असा युक्तिवादकरून त्यांनी समारोप केला.

२२) या न्यायालयाच्या घटनापीठासमोरचे मुद्दे चिंतेच्या दोन मुख्य परस्परविरोधी कारणांमुळे उद्भवतात, म्हणजे - --

(i) एफ.आय.आर. ची त्वरित नोंदणी न केल्याने पोलिसांकडून हेराफेरीला वाव मिळतो का? ज्यामुळे पीडित/तक्रारदाराच्या आरोपांची त्वरित चौकशी करण्याच्या अधिकारावर परिणाम होतो का? आणि

(ii) ज्या प्रकरणांमध्ये तक्रार/माहिती स्पष्टपणे दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करत नाही परंतु एफ.आय.आर. अनिवार्यपणे नोंदवला जातो अशा प्रकरणांमध्ये ते आरोपीच्या अधिकारांचे उल्लंघन करते का?

**चर्चाः**

२३) एफ.आय.आर. हा आपल्या देशाच्या फौजदारी कायद्याच्या प्रक्रियेत एक महत्वपूर्ण दस्ताऐवज आहे आणि माहितीदाराच्या दृष्टिकोनातून त्याचा मुख्य उद्देश फौजदारी कायदा लागू करणे आणि तपास अधिकाऱ्यांच्या दृष्टिकोनातून कथित गुन्हेगारी कृत्याची माहिती

मिळवणे हा आहे जेणेकरून दोषींचा शोध घेण्यासाठी आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यासाठी योग्य पावले उचलता येतील.

२४) कायदेशीरपणे एफ.आय.आर. ची नोंदणी न केल्याबद्दल पीडितेची/माहितीदाराची तसेच आरोपींची अनावश्यक छळवणुकीची आणि खोट्या आरोपांवर चौकशी केल्याची तक्रार योग्य असल्याचे दोन्ही बाजूंनी आढळल्याची प्रकरणे ऐतिहासिक अनुभवातून समोर आली आहेत.

२५) पहिल्या श्रेणीतील प्रकरणांचे उदाहरण **महाराष्ट्र राज्य -विरुद्ध- सारंगधरसिंग शिवदाससिंग चव्हाण आणि इतर** (२०११) १ एससीसी ५७७ या मधे आढळते, ज्यामध्ये जिल्हा सावकारी विरोधी समिती आणि जिल्हा सरकारी अभियोक्ताकडून मंजुरी न घेता श्री. गोकुलचंद सानंदा यांच्याविरुद्ध कोणताही गुन्हा नोंदवू नये असे बुलढाणा जिल्ह्यातील जिल्हाधिकारी यांनी दिलेल्या निर्देशाच्या आदेशाला आव्हान देणारी रिट याचिका दाखल करण्यात आली होती.नोंदींवरून असे उघड झाले की ७४ प्रकरणांपैकी केवळ सात प्रकरणांमध्ये बेकायदेशीरपणे पैसा दिल्याचा आरोप करत आरोपपत्रे दाखल करण्यात आले होते. मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निर्देशांवरून गरीब शेतकऱ्यांचे एफ.आय.आर. नोंदवले गेले नव्हते, असे या न्यायालयाला आढळून आले. अशा परिस्थितीत, या न्यायालयाने उक्त सूचना अधिकारबाह्य ठरवल्या आणि त्या रद्द केल्या. असा युक्तिवाद केला जातो की वरील प्रकरणे कलम १५४ चे अनिवार्यता दर्शवतात आणि जर ते अन्यथा ग्राह्य मानले गेले तर ते गंभीर अन्यायास कारणीभूत ठरेल.

२६) अलेक **पदमसी (उपरोल्लेखित)** प्रकरणात**,** आरोपींनी जातीय सलोखा बिघडवण्याची शक्यता असलेली भाषणे केल्याचा आरोप असलेली पोलिसांना एफ. आय. आर. नोंदवण्याचे निर्देश देणारे रिट जारी करणे न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात आहे की नाही हा मुद्दा हाताळताना, या न्यायालयाने असे म्हटले की, "जेव्हा जेव्हा त्यांच्या निदर्शनास आणलेली तथ्ये असे दर्शवतात की दखलपात्र गुन्हा घडला आहे, तेव्हा पोलीस अधिकाऱ्यांनी एफ.आय.आर. नोंदवला पाहिजे. जर पोलीस अधिकारी असे करण्यात अपयशी ठरले, तर स्वीकारल्या जाणाऱ्या पद्धती संहितेच्या कलम २०० सह लागू असलेल्या कलम १९० मध्ये

नमूद केल्या आहेत." अशा प्रकारे, संहिता स्वतःच संहितेच्या कलम १५४ अंतर्गत पोलिस अधिकाऱ्यांच्या नकारासाठी अनेक तपासण्या प्रदान करते.

२७) तथापि, दुसरीकडे, असे अनेक प्रकरणे आहेत जे असे दर्शवतात की एफ.आय.आर. नोंदविण्याच्या आणि त्याचा तपास सुरू करण्याच्या पोलिसांच्या अधिकाराचा गैरवापर केला जात असल्याची उदाहरणे आहेत जिथे तक्रारीच्या मजकुरातून दखलपात्र गुन्हा केला जात नाही.या संदर्भात एक महत्त्वपूर्ण प्रकरण म्हणजे **प्रीती गुप्ता -विरुद्ध- झारखंड राज्य** (२०१०) ७ एससीसी ६६७ ज्यामध्ये या न्यायालयाने भारतीय दंड संहिता, १८६० (थोडक्यात 'आय.पी.सी.') च्या कलम ४९८-ए च्या गैरवापराबद्दल चिंता व्यक्त केली आहे, ज्या संदर्भात मोठ्या संख्येने क्षुल्लक अहवाल दाखल करण्यात आले होते. कायद्यात आवश्यक बदल करण्यासाठी विधिमंडळाने माहितीपूर्ण जनमत आणि व्यावहारिक वास्तव लक्षात घेतले पाहिजे, अशी इच्छा या न्यायालयाने व्यक्त केली.

२८) वरील निकालामुळे भारतीय विधी आयोगाचा २४३ वा अहवाल ३० ऑगस्ट २०१२ रोजी सादर करण्यात आला. विधी आयोगाने आपल्या अहवालात असा निष्कर्ष काढला की जरी कलम ४९८-अ अंतर्गत गुन्हा हा आपसात मिटवता येण्याजोगा असू शकतो, तरी गैरवापराची व्याप्ती अनुभवजन्य आधारसामग्रीद्वारे स्थापित केली गेली नाही आणि त्यामुळे, ते कार्यक्षमतेच्या तरतुदीला नाकारण्याचा आधार असू शकत नाही. एफ.आय.आर. ची नोंद वाजवी वेळेसाठी पुढे ढकलली जाऊ शकते की नाही या प्रश्नावरील कायदा अनिश्चिततेच्या स्थितीत आहे आणि सध्याच्या वादाला विराम देऊन केवळ या न्यायालयातच स्पष्ट केला जाऊ शकतो, असेही विधी आयोगाने निरीक्षण नोंदवले.

२९) या मुद्द्यावर भिन्न मतांच्या आधारे एखाद्या निष्कर्षावर पोहोचण्यासाठी आणि वरील युक्तिवादांना उत्तर देण्यासाठी, या कलमाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि फौजदारी प्रक्रिया संहितेच्या मागील कायद्यांमध्ये अस्तित्वात असलेल्या संबंधित तरतुदींवर एक नजर टाकणे आवश्यक आहे.

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १८६१---**

"१३९. पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकाऱ्याला दिलेली प्रत्येक तक्रार किंवा माहिती लेखी स्वरूपात नोंदवली जाईल आणि त्याचा सार, स्थानिक शासनाने विहित केलेल्या प्रपत्रात, अशा अधिकाऱ्याने ठेवण्याच्या दिनचर्येत नोंदवले जाईल."

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १८७२**

"११२. पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्याकडे करण्यात आलेली प्रत्येक तक्रार ही लेखी स्वरूपात नोंदविण्यात येईल आणि त्यावर नोंद करणारा व्यक्ती स्वाक्षरी करेल, शिक्का किंवा चिन्ह मारेल; आणि त्यातील गोषवाऱ्याची नोंद सदर अधिकाऱ्याकडे स्थानिक सरकारने विहित केलेल्या नमुन्यानुसार ठेवल्या जाणाऱ्या बुक मध्ये (पुस्तकात) केली जाईल."

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १८८२**

"१५४. दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित प्रत्येक माहिती जर पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्याला तोंडी दिल्यास त्याच्याद्वारे किंवा त्याच्या निर्देशानुसार लिहून घेतली जाईल आणि माहिती देणाऱ्याला ती वाचून दाखवली जाईल; आणि अशी प्रत्येक माहिती, लिखित स्वरूपात दिलेली असेल किंवा वर नमूद केल्याप्रमाणे लिहून घेतली असेल, त्यावर ती देणाऱ्या व्यक्तीने स्वाक्षरी केली पाहिजे आणि त्यातील गोषवाऱ्याची नोंद सदर अधिकाऱ्याकडे सरकारने विहित केलेल्या नमुन्यानुसार ठेवल्या जाणाऱ्या बुक मध्ये (पुस्तकात) केली जाईल."

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८**

"१५४. दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित प्रत्येक माहिती जर पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्याला तोंडी स्वरूपात दिल्यास त्याच्याद्वारे किंवा त्याच्या निर्देशानुसार लिहून घेतली जाईल आणि माहिती देणाऱ्याला ती वाचून दाखवली जाईल; आणि अशी प्रत्येक माहिती, लिखित स्वरूपात दिलेली असेल किंवा वर नमूद केल्याप्रमाणे लिहून घेतली असेल, त्यावर ती देणाऱ्या व्यक्तीने स्वाक्षरी केली पाहिजे आणि त्यातील गोषवाऱ्याची नोंद सदर अधिकाऱ्याकडे सरकारने विहित केलेल्या नमुन्यानुसार ठेवल्या जाणाऱ्या बुक मध्ये (पुस्तकात) केली जाईल."

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३**

"१५४. दखलपात्र गुन्हा संबंधित माहिती : दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित प्रत्येक माहिती जर पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्याला तोंडी स्वरूपात दिल्यास त्याच्याद्वारे किंवा त्याच्या निर्देशानुसार लिहून घेतली जाईल आणि

माहिती देणाऱ्याला ती वाचून दाखवली जाईल; आणि अशी प्रत्येक माहिती, लिखित स्वरूपात दिलेली असेल किंवा वर नमूद केल्याप्रमाणे लिहून घेतली असेल, त्यावर ती देणाऱ्या व्यक्तीने स्वाक्षरी केली पाहिजे आणि त्यातील गोषवाऱ्याची नोंद सदर अधिकाऱ्याकडे राज्य सरकारने विहित केलेल्या नमुन्यानुसार ठेवल्या जाणाऱ्या बुक मध्ये (पुस्तकात) केली जाईल."

[परंतु, जर ही माहिती अश्या महिलेने दिली असेल जिच्यावर भारतीय दंड संहिता कलम ३२६ए, ३२६ बी, ३५४, ३५४ ए, ३५४ बी, ३५४ सी, ३५४डी, ३७६, ३७६ए, ३७६ बी, ३७६सी, ३७६डी, ३७६ई किंवा कलम ५०९ अन्वये गुन्हा करण्यात आला आहे किंवा प्रयत्न करण्यात आला आहे, तर अशी माहिती महिला पोलीस अधिकारी किंवा कोणत्याही महिला अधिकाऱ्याने नोंदवावीः-

परंतु पुढे असे नमूद केले आहे कीः

(अ) ज्या व्यक्तीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४, ३५४ ए, ३५४ बी, ३५४ सी, ३५४ डी, ३७६ ,३७६ ए, ३७६ बी, ३७६ सी, ३७६ डी, ३७६ ई किंवा कलम ५०९ अन्वये गुन्हा करण्यात आला असेल किंवा करण्याचा प्रयत्न करण्यात आला असेल, ती व्यक्ती जर तात्पुरती किंवा कायमस्वरूपी मानसिक किंवा शारीरिकदृष्ट्या अपंग असेल, तर अशी माहिती, पोलिस अधिकारी, अशा गुन्ह्याची तक्रार करू इच्छिणाऱ्या व्यक्तीच्या निवासस्थानी किंवा अशा व्यक्तीच्या पसंतीच्या सोयीस्कर ठिकाणी, परिस्थितीनुसार, दुभाष्याच्या किंवा विशेष शिक्षकाच्या उपस्थितीत नोंदवतील;

(ब ) अशा माहितीचे व्हिडिओग्राफी रेकॉर्डिंग केले जाईल;

(क) संबंधित पोलीस अधिकारी सदर व्यक्तीचे निवेदन शक्य तितक्या लवकर कलम १६४ च्या उपकलम (५ए) च्या खंड (ए) अन्वये न्याय दंडाधिकाऱ्यामार्फत नोंदवून घेईल.]

**('फौजदारी कायदा (सुधारणा) कायदा, २०१३ च्या कलम १३ द्वारे दि. ०३.०२.२०१३ पासून समाविष्ट केले आहे.)**

(२) उपकलम (१) अन्वये नोंदवलेल्या माहितीची प्रत माहिती देणाऱ्याला त्वरित मोफत दिली जाईल.
(३) उपकलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या माहितीची नोंद करण्यास ठाणा प्रभारी अधिकाऱ्याने नकार दिल्यास व्यथित झालेली कोणतीही व्यक्ती, अशा माहितीचा गोषवारा लेखी स्वरूपात आणि टपालाने संबंधित पोलीस अधीक्षकाकडे पाठवू शकते, ज्यांना अशी माहिती एखाद्या दखलपात्र गुन्ह्याचा

खुलासा करते असे समाधान झाल्यास, ते एकतर या प्रकरणाचा स्वतः तपास करतील किंवा या संहितेत दिलेल्या पद्धतीने त्यांच्या अधिनस्थ असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याकडून तपास करण्याचे निर्देश देतील आणि अशा अधिकाऱ्याला त्या गुन्ह्याच्या संबंधाने ठाणा प्रभारी अधिकाऱ्याचे सर्व अधिकार असतील.

वरील तरतुदींचा अभ्यास केल्यास कोणतीही प्राथमिक चौकशी न करता दखलपात्र गुन्ह्याच्या प्रकरणात एफ.आय.आर.ची अनिवार्य नोंदणी करण्याचे जुन्या संहिता आणि नवीन संहिता या दोन्हीमध्ये वैधानिक उद्देश दिसून येतो.

३०) १९७३ च्या सध्याच्या संहितेचे पूर्वचिन्ह म्हणजे १८९८ ची संहिता ज्यामध्ये तपास करण्याच्या पोलिसांच्या अधिकारांमध्ये आणि कार्यपद्धतीमध्ये लक्षणीय बदल करण्यात आले. पोलिसांच्या अधिकारांचा प्रारंभ बिंदू बदलून तो दंडाधिकाऱ्यांच्या आदेशाशिवाय दखलपात्र गुन्ह्याचा तपास करणाच्या पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्याच्या अधिकारावरून, दखलपात्र गुन्हा घडल्याबद्दलच्या प्रथम खबरी, मौखिक किंवा लिखित स्वरूपात असलेली, लिखित स्वरूपात नोंदविणे आणि प्रांतीय सरकारने अशी प्रथम खबरीची नोंद घेण्यासाठी स्वतंत्रपणे विहित केलेल्या पुस्तकात (बुक मध्ये) नोंदविणे, यात बदलण्यात आला.

३१) अशा प्रकारे, १८९८ च्या संहितेच्या माध्यमाने झालेला एक महत्त्वपूर्ण बदल म्हणजे कलम १५४ च्या प्लेसमेंटच्या संदर्भात होता म्हणजेच कलम १५६ च्या कार्यवाहीच्या आधी विशेष पुस्तकात (बुक मध्ये) दखलपात्र गुन्हा केल्याबद्दल प्रथम खबरीची नोंद घेणे आवश्यक असल्याबाबत तरतूद केली गेली होती. कलम १५६ म्हणजे दखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्याचा पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्याचा अधिकार. त्यामुळे, अशा तरतुदीचे प्लेसमेंटचे उद्दिष्ट स्पष्ट होते जे हे सुनिश्चित करण्यासाठी होते की प्रथम खबरीची नोंद हे पोलिसांच्या कोणत्याही तपासाचा प्रारंभ बिंदू असावे. तपास सुरू करण्यासाठी दंडाधिकाऱ्याकडून परवानगी घेण्याचे कोणतेही सुरक्षेचे संरक्षण नसल्यामुळे, तपासाच्या सोयीच्या हितासाठी, माहिती देणाऱ्याच्या स्वाक्षरी/शिक्कासह त्यांच्या पुस्तकात (बुक मध्ये) प्रथम खबरी नोंदवण्याची प्रक्रिया ही पोलिसांद्वारे तपास अधिकारांचा अतिवापर, *दुर्भावनापूर्ण* आणि

बेकायदेशीर वापर करण्यापासून "अत्यंत मौल्यवान संरक्षण" म्हणून कार्य करेल.

३२) संहितेच्या प्रकरण XII मध्ये असलेल्या तरतुदी पोलिसांना दिलेली माहिती आणि तपास करण्याच्या त्यांच्या अधिकारांशी संबंधित आहेत. या प्रकरणात तपासादरम्यान पाळावी लागणारी कार्यपद्धती नमूद केली आहे. या प्रकरणात विहित केलेल्या कार्यपद्धतीद्वारे साध्य केले जाणारे उद्दिष्ट म्हणजे फौजदारी कायदा कार्यान्वित करणे आणि सर्व प्रक्रियात्मक सुरक्षा उपायांची तरतूद करणे जेणेकरून तपास निष्पक्ष असेल आणि तो *दुर्भावनापूर्ण* नसेल आणि तपासादरम्यान गोळा केलेल्या पुराव्यांशी छेडछाड करण्यास वाव राहणार नाही.

३३) याच बरोबर, ज्येष्ठ वकील श्री. शेखर नाफडे यांनी असा युक्तिवाद केला की भा.दं.सं. (आय. पी. सी.) मध्ये कलम १६६ ए समाविष्ट करणे हे सूचित करते की एफ. आय. आर. नोंदवणे हे या कलमात निर्दिष्ट केलेल्या गुन्ह्यांव्यतिरिक्त इतर सर्व गुन्ह्यांसाठी अनिवार्य नाही. फौजदारी कायदा (सुधारणा) कायदा २०१३ द्वारे, भारतीय दंड संहितेत कलम १६६ ए समाविष्ट करण्यात आले जे खालीलप्रमाणे आहेः -

**"कलम १६६ ए -कोणीही, लोकसेवक म्हणून,**

(अ) एखाद्या गुन्ह्याच्या किंवा इतर कोणत्याही प्रकरणाच्या तपासाच्या उद्देशाने कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही ठिकाणी हजर राहण्यास भाग पाडण्यास त्याला मनाई करणाऱ्या कायद्याच्या कोणत्याही निर्देशाची जाणीवपूर्वक अवज्ञा करेल; किंवा

(ब) ज्या पद्धतीने तो असा तपास करेल त्याचे नियमन करणाऱ्या कायद्याच्या इतर कोणत्याही निर्देशाची, कोणत्याही व्यक्तीच्या पूर्वग्रहापोटी, जाणीवपूर्वक अवज्ञा करेल, किंवा

(क) कलम ३२६ ए, कलम ३२६बी, कलम ३५४, कलम ३५४ बी, कलम ३७०, ३७० ए, कलम ३७६, कलम ३७६ए, कलम ३७६बी, ३७६ सी, कलम ३७६ डी, कलम ३७६ ई, कलम ५०९ अन्वये दंडनीय दखलपात्र गुन्ह्याच्या संबंधात फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १५४ च्या उपकलम (१) अंतर्गत त्याला देण्यात आलेली कोणतीही माहिती नोंदविण्यात अपयशी ठरेल, त्याला सहा महिन्यांपेक्षा कमी नसणाऱ्या

परंतु दोन वर्षांपर्यंत वाढणाऱ्या कठोर कारावासाची शिक्षा दिली जाईल आणि तो दंडास सुद्धा पात्र राहील."

कलम १६६ ए (सी) असे नमूद करते की जर एखादा लोकसेवक (पोलिस अधिकारी) कलम ३२६ ए, ३२६ बी, ३५४, ३५४ बी, ३७० ,३७० ए, ३७६, ३७६ ए, ३७६ बी, ३७६ सी, ३७६ डी, ३७६ ई किंवा कलम ५०९ अन्वये दंडनीय दखलपात्र गुन्ह्यांच्या संबंधात संहितेच्या कलम १५४ (१) अंतर्गत त्याला दिलेली कोणतीही माहिती नोंदवण्यात अपयशी ठरला तर त्याला सहा महिन्यांपेक्षा कमी नसणाऱ्या परंतु दोन वर्षांपर्यंत वाढणाऱ्या कठोर कारावासाची शिक्षा होईल आणि तो दंडास सुद्धा पात्र राहील. अशाप्रकारे, विद्वान वकिलांची भूमिका आहे की ही तरतूद स्पष्टपणे सूचित करते की एफ.आय.आर.ची नोंदणी करणे अत्यावश्यक आहे आणि या कलमात निर्दिष्ट केलेल्या गुन्ह्यांच्या संदर्भात पोलीस अधिकाऱ्याला कोणताही विवेकाधिकार नाही. त्यामुळे, त्यांच्या मते, विधिमंडळ हे मान्य करते की इतर दखलपात्र गुन्ह्यांचा विचार करता, माहिती बरोबर असल्याबाबत शंका असल्यास प्राथमिक चौकशी करण्याचा पोलिसांना विवेकाधिकार आहे.

३४) जरी हा युक्तिवाद पटवून देणारा असला तरी, उक्त तरतुदीत वापरलेल्या स्पष्ट शब्दांच्या विरोधात असा अंदाज लावला जाऊ शकतो की नाही याबद्दल आम्हाला शंका आहे. म्हणून, फौजदारी कायदा (सुधारणा) कायदा २०१३ द्वारे भा.दं.सं.(आय.पी.सी.) मध्ये कलम १६६ ए च्या समाविष्टास तरतुदीशी सुसंगतपणे वाचले पाहिजे आणि त्याच्या विरोधात नाही. अलीकडेच, महिलांवरील गुन्ह्यांच्या दुर्दैवी घटनांच्या पार्श्वभूमीवर कलम १६६ ए चे समाविष्ट करण्यात आले आहे. ही दुरुस्ती मांडण्यामागे विधीमंडळाचा हेतू महिलांना वाढीव संरक्षण प्रदान करण्यासाठी आधीच अस्तित्वात असलेल्या तरतुदींना कडक करण्याचा होता. त्यामुळे आपल्या देशात महिलांवरील वाढत्या गुन्ह्यांची दखल घेतल्यानंतर, अश्या प्रकरणांमध्ये एफ.आय.आर. नोंदवण्यात अपयशी ठरल्याबद्दल पोलीस अधिकाऱ्यांना स्पष्टपणे शिक्षा करणे योग्य असल्याचे विधिमंडळाला वाटले. या व्यतिरिक्त इतर कोणताही अर्थ ते समाविष्ट करण्यासाठी दिला जाऊ शकत नाही.

३५) या पार्श्वभूमीवर, संदर्भित प्रकरणाच्या बाजूने आणि विरुद्ध अशा विविध निर्णयांच्या

प्रकाशात आपण सबमिशनवर चर्चा करू या.

**कलम १५४ चा अर्थः**

३६) या संदर्भात असे नमूद केले जाऊ शकते की प्रत्येक व्याख्यानाच्या प्रणालीमध्ये कायद्याच्या व्याख्येचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे तत्त्व म्हणजे व्याख्येचा शब्दशः नियम. ही तरतूद काय म्हणते हे आपल्याला अगदी सुरुवातीला पाहायचे आहे. परिणामी, कलम १५४ मध्ये वापरलेली भाषा ही विधायी हेतूचा निर्णायक घटक आहे. संहितेच्या कलम १५४ (१) च्या साध्या वाचनात अशी तरतूद आहे की दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित कोणतीही माहिती जर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला तोंडी स्वरूपात दिली गेली असेल तर ती त्याने स्वतः किंवा त्याच्या निर्देशानुसार लेखी स्वरूपात नोंदवून घ्यावी. संहितेच्या कलम १५४ (१) च्या भाषेत कोणतीही संदिग्धता नाही.

३७) या टप्प्यावर, **मेसर्स हिरालाल रतनलाल (उपरोल्लेखित)** प्रकरणात या न्यायालयाच्या खालील निरीक्षणांचा संदर्भ घेणे योग्य आहे जे खालीलप्रमाणे आहे:

> "२२....वैधानिक तरतुदीचा अर्थ लावताना, अर्थ लावण्याचा पहिला आणि सर्वात महत्त्वाचा नियम म्हणजे साहित्यिक अर्थ. ही तरतूद काय म्हणते हे आपल्याला अगदी सुरुवातीला पाहायचे आहे. जर तरतूद स्पष्ट असेल आणि त्या तरतुदीतून विधिमंडळाचा हेतू स्पष्ट होत असेल, तर आपल्याला कायद्यांच्या रचनेच्या इतर नियमांची मदत घेण्याची गरज नाही. कायद्यांच्या रचनेच्या इतर नियमांची मदत तेव्हाच घेतली जाते जेव्हा विधिमंडळाचा हेतू स्पष्ट नसतो..."

वरील निर्णयाचे पालन या न्यायालयाने **बी. प्रेमानंद (उपरोल्लेखित)** मध्ये केले आणि **हिरालाल रतनलाल (उपरोल्लेखित)** प्रकरणात वरील निरिक्षणांचा संदर्भ दिल्यानंतर, या न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण केले.

> "**९.** या संदर्भात असे नमूद केले जाऊ शकते की प्रत्येक व्याख्यानाच्या प्रणालीमध्ये कायद्याच्या व्याख्येचे पहिले आणि सर्वात महत्त्वाचे तत्त्व म्हणजे व्याख्येचा शब्दशः नियम. अर्थ लावण्याचे इतर नियम म्हणजे मिसचीफ रुल, हेतुपूर्ण अर्थ लावणे इ. जेव्हा एखाद्या कायद्याचे साधे शब्द संदिग्ध असतात किंवा त्यातून कोणताही समजण्याजोगा परिणाम येत नाही किंवा शब्दशः वाचल्यास कायद्याचा उद्देशच रद्द होतो तेव्हाच त्यांच्यावर

अवलंब केले जाऊ शकते. जेथे कायद्याचे शब्द पूर्णपणे स्पष्ट आणि असंदिग्ध आहेत, तेथे *स्वीडिश मॅच ए.बी. -वि.- एस.ई.बी.आय.* (२००४) ११ एस. सी. सी. ६४१ अनुसार शाब्दिक नियमांव्यतिरिक्त इतर व्याख्येच्या तत्त्वांचा अवलंब केला जाऊ शकत नाही.

त्यामुळे कलम १५४ (१) ची भाषा शब्दशः अर्थाव्यतिरिक्त इतर कोणतेही अर्थ प्रस्तुत करत नाही.

३८) कलम १५४ चा वैधानिक उद्देश **भजन लाल (उपरोल्लेखित)** मध्ये स्पष्टपणे व्यक्त केला आहे जो खालीलप्रमाणे आहेः -

"**३०.** कलम १५४ (१) मध्ये नमूद केलेला कायदेशीर आदेश असा आहे की 'दखलपात्र गुन्हा' (संहितेच्या कलम २ (सी) च्या अर्थानुसार) बाबतची प्रत्येक माहिती जर तोंडी स्वरूपात (अशा परिस्थितीत ती लेखी स्वरूपात नोंदवून घ्यावी) किंवा लेखी स्वरूपात 'ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला' (संहितेच्या कलम २ (ओ) च्या अर्थानुसार) दिली गेली असेल आणि त्यावर माहिती देणाऱ्याची स्वाक्षरी असेल तर अधिकाऱ्याने अश्या माहितीची नोंद राज्य सरकारने विहित केलेल्या नमुन्यात केली पाहिजे ज्याला सामान्यतः 'प्रथम खबरी अहवाल' म्हणून संबोधण्यात येते आणि त्या नमुन्यामध्ये माहिती भरण्याच्या कृतीला गुन्हा किंवा प्रकरण दाखल करणे असे म्हंटले जाते.

**३१.** संहितेच्या कलम १५४ (१) च्या आदेशानुसार दखलपात्र गुन्हा उघड करणाऱ्या माहितीच्या आधारे गुन्हा किंवा प्रकरण दाखल करण्याच्या टप्प्यावर, संबंधित पोलिस अधिकारी माहितीदाराने दिलेली माहिती विश्वासार्ह आणि खरी आहे की नाही याची चौकशी सुरू करू शकत नाही आणि माहिती विश्वासार्ह किंवा खरी नाही या आधारावर प्रकरण दाखल करण्यास नकार देऊ शकत नाही. दुसरीकडे, पोलीस ठाणा प्रभारी अधिकारी कायदेशीररीत्या प्रकरण दाखल करण्यास बांधील आहे आणि जर त्याला एखादा गुन्हा घडल्याचा संशय असेल तर तपास सुरू करण्यास बांधील आहे, ज्याचा तपास करण्यासाठी त्याला संहितेच्या कलम १५६ अंतर्गत अधिकार आहे, जो कलम १५७ च्या तरतुदीच्या अधीन आहे. (या निकालाच्या पुढील भागात आम्ही संहितेच्या कलम १५६ आणि १५७ अन्वये दखलपात्र गुन्ह्याचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्याच्या अधिकाराबद्दल तपशीलवार चर्चा करण्याचा विचार केला आहे, त्यामुळे सध्याच्या संदर्भात त्या कलमांबद्दल सखोल विचार व्यक्त करण्याचा आमचा विचार नाही.) जर पोलीस ठाणा प्रभारी अधिकारी त्याच्याकडे असलेल्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्यास नकार देत असेल आणि नोंदवलेल्या दखलपात्र गुन्ह्याच्या माहितीवर प्रकरण दाखल करण्यास नकार देत असेल आणि त्यामुळे त्याच्यावर लादलेल्या वैधानिक कर्तव्याचे

उल्लंघन होत असेल, तर अशा नकारामुळे व्यथित झालेली व्यक्ती संबंधित पोलीस अधीक्षकांना लेखी आणि टपालाद्वारे माहितीचा गोषवारा पाठवू शकते, आणि जर त्यांना अशी पाठवलेली माहिती दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करते असे समाधान झाल्यास, त्यांनी एकतर या प्रकरणाचा स्वतः तपास करावा किंवा संहितेच्या कलम १५४ च्या उपकलम (३) च्या पद्धतीने त्यांच्या अधिनस्थ असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून तपास करण्याचे निर्देश द्यावेत.

**३२.** हे लक्षात घेतले पाहिजे की विधिमंडळाने आपल्या सामूहिक विवेकबुद्धीने कलम १५४ (१) मध्ये "इन्फॉरमेशन" (माहिती) या शब्दप्रयोगाचा काळजीपूर्वक आणि सावधगिरीने वापर केला आहे आणि त्याला कलम ४१(१) (ए) किंवा (जी) प्रमाणे ज्या मध्ये "वाजवी तक्रार" आणि "विश्वासार्ह माहिती" हे शब्दप्रयोग वापरले गेले आहे, तसे वर्णन केलेले नाही. स्पष्टपणे, संहितेच्या कलम ४१ (१) (ए) आणि (जी) च्या उलट कलम १५४ (१) मधील "इन्फॉरमेशन" (माहिती) या शब्दाचे वर्णन न करण्यामागे हे कारण असू शकते की अधिकाऱ्याने दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहितीच्या तर्कसंगततेवर किंवा विश्वासार्हतेवर तो समाधानी नाही या कारणावरून माहिती नोंदविण्यास नकार देऊ नये आणि प्रकरण दाखल करण्यास मनाई करू नये. दुसऱ्या शब्दांत, उक्त माहितीची 'तर्कसंगतता' किंवा 'विश्वासार्हता' हे प्रकरण दाखल करण्यासाठीची पूर्वअट नाही. सध्याच्या कलम १५४ चे आधीच्या संहितांशी तुलना केल्यास असे लक्षात येते की विधिमंडळाने केवळ "इन्फॉरमेशन" (माहिती) हा शब्द त्याचे वर्णन न करता, वापरणे हेतुपुरस्सर योग्य मानले होते. भारतीय विधान परिषदेने पारित केलेल्या १८६१ च्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १३९ (१८६१ चा ऍक्ट २५) मध्ये असे म्हटले आहे की, ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला दिलेली 'प्रत्येक तक्रार किंवा माहिती' लेखी स्वरूपात नोंदवली गेली पाहिजे, ज्या तरतुदीत नंतर १८७२ च्या संहितेच्या कलम ११२ (१८७२ चा ऍक्ट १०) द्वारे सुधारणा करण्यात आली, ज्यामध्ये त्यानंतर असे म्हटले गेले की ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला दिलेली 'प्रत्येक तक्रार' लेखी स्वरूपात नोंदवली गेली पाहिजे. आधीच्या म्हणजेच १८६१ आणि १८७२ च्या दोन संहितांमध्ये आलेला 'कम्प्लेंट' (तक्रार) हा शब्द काढून टाकण्यात आला आणि त्या ठिकाणी १८८२ आणि १८९८ च्या संहितांमध्ये 'इन्फॉरमेशन' (माहिती) हा शब्द वापरला गेला जो आता १९७३ च्या सध्याच्या संहितेच्या (१९७४ चा ऍक्ट २) कलम १५४, १५५, १५७ आणि १९० (सी) मध्ये वापरला जातो. सर्व संहितांचे एकूण वाचन केल्यावर हे स्पष्ट होते की प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यासाठी जी अट अनिवार्य आहे ती म्हणजे माहिती असायला हवी आणि ती माहिती दखलपात्र गुन्हा उघड करणारी हवी.

> **३३.** त्यामुळे, हे स्पष्ट आहे की जर दखलपात्र गुन्हा उघड करणारी कोणतीही माहिती जी संहितेच्या कलम १५४ (१) च्या आवश्यकतांची पूर्तता करते अशी माहिती जर ठाणा प्रभारी अधिकाऱ्यापुढे ठेवली गेली, तर त्या अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अशा माहितीचा गोषवारा नोंदवण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, म्हणजेच अशा माहितीच्या आधारे प्रकरण दाखल करावे लागणार."

३९) परिणामी, संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. नोंदविण्यासाठी अनिवार्य अट अशी आहे ती म्हणजे माहिती असायला हवी आणि ती माहिती दखलपात्र गुन्हा उघड करणारी हवी. दखलपात्र गुन्हा उघड करणारी कोणतीही माहिती जी संहितेच्या कलम १५४ (१) च्या आवश्यकतांची पूर्तता करते, अशी माहिती जर ठाणा प्रभारी अधिकाऱ्यापुढे ठेवली गेली, तर त्या अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अशा माहितीचा गोषवारा नोंदवण्याशिवाय दुसरा पर्याय नाही, म्हणजेच अशा माहितीच्या आधारे प्रकरण दाखल करावे लागणार. संहितेच्या कलम १५४ ची तरतूद अनिवार्य आहे आणि दखलपात्र गुन्हा उघड करणाऱ्या माहितीच्या आधारे गुन्हा दाखल करणे हे संबंधित अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. त्यामुळे संहितेच्या कलम १५४ (१) च्या साध्या शब्दांना शब्दशः अर्थ द्यावा लागेल.

'**शाल**' ( 'Shall')

४०) संहितेच्या कलम १५४ (१) मध्ये '**शाल**' या शब्दाचा वापर स्पष्टपणे दर्शवितो की पोलिसांना दिलेल्या माहितीमध्ये दखलपात्र गुन्ह्याची माहिती उघड झाल्यास एफ. आय. आर. नोंदवणे अनिवार्य आहे.

४१) **खुब चंद (उपरोल्लेखित)** मध्ये, या न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवलेः

> "७... "शाल" हा शब्द त्याच्या सामान्य अर्थाने अनिवार्य आहे आणि न्यायालय सामान्यतः त्या शब्दाचा असा अर्थ लावेल जोपर्यंत असा अर्थ लावण्यामुळे काही हास्यास्पद किंवा गैरसोयीचे परिणाम होत नाहीत किंवा कायद्याच्या इतर भागांमधून गोळा केल्या जाणाऱ्या विधिमंडळाच्या हेतूशी भिन्न होत नाहीत. उक्त शब्दप्रयोगाची रचना, विशिष्ट कायद्याच्या तरतुदींवर, शब्दप्रयोग कोणत्या मांडणीत दिसते, ज्या उद्देशासाठी निर्देश दिला जातो, निर्देशांच्या उल्लंघनामुळे होणारे परिणाम आणि अशा इतर बाबींवर अवलंबून असते....."

४२) हे नमूद करणे प्रासंगिक आहे की संहितेच्या कलम १५४ (१) च्या संदर्भात 'शाल' हा शब्द वापरण्याचा उद्देश हे सुनिश्चित करणे आहे की सर्व दखलपात्र गुन्ह्यांशी संबंधित सर्व माहिती पोलिसांद्वारे त्वरित नोंदवली जावी आणि कायद्याच्या तरतुदींनुसार तपास केला जावा.

४३) गुन्ह्यांचा तपास करणे आणि गुन्हेगारांवर खटला चालवणे ही राज्याची कर्तव्ये आहेत. "दखलपात्र गुन्ह्यांसाठी", कायद्याच्या कलम १५७ अंतर्गत विशेषतः परवानगी दिल्याखेरीज, एफ.आय.आर. नोंदवणे आणि तपास करणे हे पोलिसांवर कर्तव्य सोपवण्यात आले आहे. एफ.आय.आर. नोंदविण्याच्या बाबतीत पोलिसांना विवेकाधिकार, पर्याय किंवा मर्यादा दिल्यास, त्याचे सार्वजनिक सुव्यवस्थे वर गंभीर परिणाम होऊ शकते आणि पीडितांच्या हक्कांचे ज्यात समानतेचा मूलभूत अधिकार सामील आहे, यांचे उल्लंघन होऊ शकते.

४४) म्हणून, ज्या संदर्भात संहितेच्या कलम १५४ (१) मध्ये 'शाल' हा शब्द आढळतो, ज्या उद्देशासाठी तो वापरला गेला आहे आणि एफ.आय.आर. नोंदवण्याच्या निर्देशांच्या उल्लंघनामुळे होणारे परिणाम, हे सर्व घटक स्पष्टपणे दर्शवतात की कलम १५४ (१) मध्ये वापरलेला 'शाल' या शब्दला 'अनिवार्य' असा त्याचा सामान्य अर्थ देणे आवश्यक आहे. वैधानिक योजने अंतर्गत वाचलेल्या संहितेच्या कलम १५४ (१) च्या तरतुदी, एफ.आय.आर. नोंदवण्यापूर्वी प्राथमिक चौकशी सुरू करण्यासाठी ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला कोणताही विवेकाधिकार प्रदान करणे मान्य करत नाहीत. जर तरतूद स्पष्ट असेल आणि विधिमंडळाचा हेतू स्पष्ट असेल, तर न्यायालयाला त्यात इतर कोणतेही नियम समाविष्ट करण्याची गरज नाही, ही कायद्याची निश्चित स्थिती आहे.

४५) वरील बाबी लक्षात घेता, कायद्याच्या योजनेत 'शाल ' या शब्दाचा वापर केल्याने असा निष्कर्ष निघतो की जर एखाद्या दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहिती दिली गेली तर ती पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकाऱ्याने अनिवार्यपणे नोंदवणे असे विधिमंडळाचे हेतू होते. काही वकिलांनी युक्तिवाद केल्याप्रमाणे 'शाल' (Shall) यास 'मे' (May) असे वाचणे हे संहितेच्या योजनेच्या विरोधात असेल. संहितेच्या कलम १५४ चा काटेकोरपणे अर्थ लावला गेला पाहिजे आणि 'शाल' या शब्दाला त्याचा नैसर्गिक अर्थ दिला गेला पाहिजे. व्याख्येचा

सुवर्ण नियम केवळ अशा प्रकरणांमध्ये लागू केला जाऊ शकतो जेथे कलमाची भाषा संदिग्ध आहे आणि/किंवा विसंगतीकडे नेणारी आहे.

४६) वरील बाबी लक्षात घेता, आम्ही समाधानी आहोत की संहितेच्या कलम १५४ (१) मध्ये या संदर्भात कोणतीही संदिग्धता नाही आणि ते स्पष्ट शब्दात आहे. इथे हे नमूद करणे प्रासंगिक आहे की संहितेच्या कलम ३९ अनुसार प्रत्येक व्यक्तीवर भा.दं.सं.(आय.पी.सी.) च्या कलम १२१ ते १२६, ३०२, ६४-ए, ३८२, ३९२ इत्यादी अंतर्गत येणाऱ्या काही गुन्ह्यांची माहिती देणे हे वैधानिक कर्तव्य आहे. जरी एखाद्या गुन्ह्याची माहिती देणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असले, तरी पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला अहवाल नोंदवणे बंधनकारक नाही असे म्हणणे विसंगत ठरेल. संहितेच्या कलम ३९ मध्ये येणाऱ्या 'शाल' या शब्दाला संहितेच्या कलम १५४ (१) मध्ये येणाऱ्या 'शाल' या शब्दासारखाच अर्थ दिला गेला पाहिजे.

**'बुक'/'डायरी'**

४७) छत्तीसगड राज्याची बाजू मांडणाऱ्या विद्वान ए.एस.जी. यांनी असे प्रतिपादित केले आहे की कलम १५४ अन्वये 'बुक' मध्ये (पुस्तकात) प्रथम माहिती नोंदविणे ही बाब पोलीस ठाण्यात ठेवलेल्या सर्वसाधारण डायरी/स्टेशन डायरी/दैनिक डायरीमधील नोंदणी केल्या नंतर येते. म्हणून, विद्वान ए.एस.जी. च्या मते, प्रथम माहिती ही सर्वसाधारण डायरीतील सगळ्यात आधीचे एक दस्तऐवज आहे आणि त्यानंतर जर कोणत्याही प्राथमिक चौकशीची आवश्यकता असेल तर पोलीस अधिकारी तशी चौकशी करू शकतात आणि त्यानंतर माहिती एफ. आय. आर. म्हणून नोंदवली जाईल.

४८) हा अर्थ पूर्णपणे निराधार आहे. प्रथम खबरी अहवाल ही प्रत्यक्षात सर्वात प्रथम प्राप्त होणारी "माहिती" आहे, जी एकतर लेखी स्वरूपात दिली जाते किंवा लेखी स्वरूपात नोंदविली जाते. हा त्याचा 'गोषवारा' नाही, जो राज्य सरकारने विहित केलेल्या डायरीत नोंदवायचा आहे. 'जनरल डायरी' (सर्वसाधारण डायरी) हा शब्द (काही राज्यांमध्ये 'स्टेशन डायरी' किंवा 'डेली डायरी' म्हणूनही ओळखला जातो) संहितेच्या कलम १५४ अंतर्गत नाही

तर पोलिस कायदा, १८६१ च्या कलम ४४ च्या तरतुदींनुसार ज्या राज्यांत तो लागू होतो त्या राज्यांमध्ये किंवा एखाद्या राज्याला लागू असलेल्या पोलिस कायद्याच्या (कायद्यांच्या) संबंधित तरतुदींनुसार किंवा, राज्याच्या पोलिस नियमावली अंतर्गत मांडण्यात येतो. पोलीस कायदा, १८६१ चे कलम ४४ ची खालीलप्रमाणे पुनरुत्पादित केले आहेः-

> "**४४. पोलीस-अधिकाऱ्यांनी डायरी ठेवावी -** प्रत्येक ठाणा प्रभारी अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल की, त्याने राज्य सरकारने वेळोवेळी विहित केलेल्या स्वरूपात एक सर्वसाधारण डायरी ठेवावी आणि त्यात सर्व तक्रारी आणि आरोपपात्र, अटक केलेल्या सर्व व्यक्तींची नावे, तक्रारदारांची नावे, त्यांच्याविरुद्ध दाखल केलेले गुन्हे, त्यांच्या ताब्यातून किंवा अन्यथा घेतलेली शस्त्रे किंवा मालमत्ता आणि ज्या साक्षीदारांची चौकशी झाली असेल त्यांची नावे नोंदवावी. जिल्ह्याच्या दंडाधिकाऱ्यांना अशा डायरीची चौकशी करण्याचे स्वातंत्र्य असेल. "

४९) हे लक्षात घेणे योग्य आहे की १८६१ साली, जेव्हा उपरोक्त पोलिस कायदा, १८६१ पारित करण्यात आला, तेव्हा फौजदारी प्रक्रिया संहिता, १८६१ देखील पारित करण्यात आला होता. त्या संहितेतील कलम १३९ हे एफ.आय.आर. नोंदविण्याशी संबंधित आहे आणि या कलमाला 'डायरी' या शब्दाचाही संदर्भ देण्यात आला आहे, जो या कलमाच्या भाषेतून खाली पुनरुत्पादित केल्याप्रमाणे स्पष्ट होईल :

> "१३९.... ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला दिलेली प्रत्येक तक्रार किंवा माहिती लेखी स्वरूपात नोंदविण्यात येईल आणि त्याचा गोषवारा, स्थानिक शासनाने विहित केलेल्या नमुन्यानूसार अधिकाऱ्याने ठेवलेल्या **डायरीत** नोंदवले जाईल."

अशा प्रकारे, पोलीस कायदा, १८६१ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १८६१, जे दोन्ही एकाच वर्षी पारित करण्यात आले होते, त्या मध्ये 'डायरी' हा एकच शब्द वापरला आहे.

५०) तथापि, १८७२ साली, एक नवीन संहिता पारित करण्यात आली, ज्याला फौजदारी प्रक्रिया संहिता, १८७२ असे नाव देण्यात आले. संहितेतील कलम ११२ एफ.आय.आर. नोंदवण्याच्या मुद्याशी संबंधित आहे आणि ते खालीलप्रमाणे पुनरुत्पादित केले आहेः -

"११२. पोलिस स्टेशन प्रभारी अधिकाऱ्याकडे करण्यात आलेली प्रत्येक तक्रार ही लेखी स्वरूपात नोंदविण्यात येईल आणि त्यावर नोंद करणारा व्यक्ती स्वाक्षरी करेल, शिक्का किंवा चिन्ह मारेल; आणि त्यातील गोषवाऱ्याची नोंद सदर अधिकाऱ्याकडे स्थानिक सरकारने विहित केलेल्या नमुन्यानुसार ठेवल्या जाणाऱ्या **बुक** मध्ये (पुस्तकात) केली जाईल."

५१) अशा प्रकारे, हे स्पष्ट आहे की फौजदारी प्रक्रिया संहिता, १८७२ मध्ये, एक बदल केला गेला आणि 'डायरी' च्या जागी 'बुक' हा शब्द वापरला गेला. 'बुक' हा शब्द स्पष्टपणे एफ.आय.आर. नोंदविण्यासाठी संहितेअंतर्गत राखल्या जाणाऱ्या एफ.आय.आर. बुक (पुस्तक) च्या संबंधित होता.

५२) एफ.आय.आर. ची नोंद एफ.आय.आर. बुक मध्ये (पुस्तकात) करायची की सर्वसाधारण डायरीत करायची हा प्रश्न आता रेस इंटेग्रा (अनिर्णित विषय) राहिलेला नाही. या न्यायालयाने हा मुद्दा आधीच अधिकृतपणे निकाली काढला आहे.

५३) ***मधु बाला - विरुद्ध - सुरेश कुमार*** (१९९७) ८ एस.सी.सी. ४७६ या प्रकरणात, या न्यायालयाने असे म्हटले आहे की एफ.आय.आर., हे एफ.आय.आर. रजिस्टर मध्ये जे की २०० पानांचे बुक (पुस्तक) असेल, त्यात नोंदविणे आवश्यक आहे. हे खरे आहे की माहितीचा गोषवारा दैनंदिनी डायरीत (किंवा सर्वसाधारण डायरीत) देखील नमूद केला पाहिजे. परंतु, एफ.आय.आर. हे एफ.आय.आर. बुक (पुस्तक) किंवा रजिस्टर मध्ये नोंदविणे ही प्राथमिक आवश्यकता आहे. **भजन लाल** (**उपरोल्लेखित**) मध्येही, या न्यायालयाने असे म्हटले आहे की एफ.आय.आर. अशा एका बुक मध्ये (पुस्तकात) नोंदवावी ज्याला सामान्यतः प्रथम खबरी अहवाल म्हणतात.

५४) त्यामुळे हे स्पष्ट आहे की एफ.आय.आर. ची नोंद एफ.आय.आर. बुक (पुस्तक) किंवा एफ.आय.आर. रजिस्टर नावाच्या बुक मध्ये (पुस्तकात) करावी लागते. अर्थात, याव्यतिरिक्त, एफ.आय.आर. चा सारांश किंवा एफ.आय.आर. चा गोषवारा, संबंधित पोलीस कायदा किंवा नियमांमध्ये अनिवार्य केल्याप्रमाणे, सर्वसाधारण डायरीत, संबंधित राज्य तरतुदींनुसार, एकाच वेळी नमूद केले जाऊ शकते.

५५) सर्वसाधारण डायरी ही पोलीस ठाण्यामध्ये होणाऱ्या सर्व महत्त्वाच्या व्यवहारांचे/घटनांचे अभिलेख आहे ज्यात पोलीस कर्मचारीवर्गाचे प्रस्थान आणि आगमन, पदभार सुपूर्द करणे किंवा स्वीकारणे, एखाद्या व्यक्तीला अटक करणे, कायदा आणि सुव्यवस्थेच्या कर्तव्यांचा तपशील, वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट इत्यादींचा समावेश असतो. याच संदर्भात पोलीस ठाण्यात नोंदवल्या जाणाऱ्या प्रत्येक एफ.आय.आर. चा सारांश किंवा गोषवारा देखील सर्वसाधारण डायरीत नमूद केले जाते, कारण पोलीस ठाण्यात एफ.आय.आर. नोंदविणे हा देखील एक अतिशय महत्त्वाचा मुद्दा असतो. सर्वसाधारण डायरी हे एक अभिलेख असून जी कालक्रमानुसार दैनंदिन आधारावर ठेवली जाते (प्रत्येक दिवशी, नवीन क्रमांक १ पासून सुरू होते) म्हणून सर्वसाधारण डायरी नोंदीचा संदर्भ एफ.आय.आर. बुक मध्ये (पुस्तकात) देखील एकाच वेळी नमूद केला जातो, आणि एफ.आय.आर. क्रमांक हे सर्वसाधारण डायरीत नमूद केला जातो कारण हे दोन्ही एकाच वेळी तयार केले जातात.

५६) इथे हे सांगणे प्रासंगिक राहील की वार्षिक आधारावर दिलेल्या संख्येसह एफ.आय.आर. बुक (पुस्तक) राखले जाते. याचा अर्थ असा की प्रत्येक एफ.आय.आर. ला एक विशिष्ट वार्षिक क्रमांक दिला जातो. हे न्यायालयांमध्ये प्रकरणांना दिलेल्या संख्ये समान आहे. या कारणास्तव, जेथे आवश्यक असेल तेथे पर्यवेक्षी पोलिस अधिकारी आणि न्यायालयांद्वारे एफ.आय.आर. नोंदवण्यावर कडक नियंत्रण ठेवणे आणि त्याचा मागोवा घेणे शक्य आहे. प्रत्येक एफ.आय.आर. ची प्रत वरिष्ठ अधिकाऱ्यांना आणि संबंधित न्याय दंडाधिकाऱ्यांना पाठवली जाते.

५७) दुसरीकडे, सर्वसाधारण डायरीत प्रत्येक दिवशी घडणारे इतर अनेक तपशीलांचे उल्लेख असतात. सर्वसाधारण डायरीची प्रत ठाण्याचे अधिकारक्षेत्र असलेल्या न्याय दंडाधिकाऱ्यांकडे न पाठवता त्याची प्रत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याकडे पाठवली जाते. अशा प्रकारे, सर्वसाधारण डायरीत नमूद केलेल्या इतर तपशीलांचे प्रचंड प्रमाण आणि दररोज बदलणाऱ्या संख्येमुळे, वरिष्ठ पोलिस अधिकारी आणि/किंवा न्यायालयाद्वारे त्यात नोंदवलेल्या प्रत्येक एफ. आय. आर. वर कडक नियंत्रण ठेवणे शक्य नाही.

५८)  जेव्हा पोलिस स्टेशनला तक्रार दिली जाते तेव्हा तक्रारकर्त्याची स्वाक्षरी एफ.आय.आर. बुकमध्ये घेतली जाते. दुसरीकडे, सर्वसाधारण डायरीत तक्रारकर्त्याची स्वाक्षरी घेण्याची अशी कोणतीही आवश्यकता नसते. शिवाय, काही वेळा, दिलेल्या तक्रारीमध्ये जास्त संख्येची पाने असू शकतात, अशा परिस्थितीत संपूर्ण तक्रार न नोंदविता केवळ तक्रारीचा सारांश सर्वसाधारण डायरीत नोंदवायचे असते. सर्वसाधारण डायरीमध्ये जे नोंदवले आहे ते एफ.आय.आर. नोंदविण्याचा कलम १५४ च्या आवश्यकतेची पूर्तता/पालन मानले पाहिजे या सूचनेशी जुळत नाही. खरे तर, एफ.आय.आर. बुक मध्ये (पुस्तकात) संपूर्ण तक्रार नोंदविणे (किंवा ती एफ.आय.आर. फॉर्मसोबत जोडणे) आणि सर्वसाधारण डायरीत केवळ एक किंवा दोन परिच्छेद (माहितीचा सारांश) नोंदविणे ही नेहमीची प्रथा आहे.

५९)  वरील बाबी लक्षात घेता, हे निदर्शनास आणून देणे उपयुक्त ठरेल की ही संहिता संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील समवर्ती सूचीतील नोंद २ अंतर्गत अधिनियमित करण्यात आली होती, जी खालीलप्रमाणे पुनरुत्पादित केली आहे, -

> "२. या संविधानाच्या प्रारंभी फौजदारी प्रक्रिया संहितेत समाविष्ट असलेल्या सर्व बाबींसह फौजदारी प्रक्रिया. "

दुसरीकडे, पोलीस कायदा, १८६१ (किंवा संबंधित राज्यांमधील इतर तत्सम कायदे) संविधानाच्या सातव्या अनुसूचीतील राज्य सूचीच्या नोंद २ अंतर्गत अधिनियमित करण्यात आले होते, जे खालील प्रमाणे पुनरुत्पादित केले आहेः -

> "२. पोलीस (रेल्वे आणि ग्राम पोलिसांसह) सूची I च्या नोंद २अ तरतुदींच्या अधीन आहेत."

६०)  आता, या टप्प्यावर, संविधानाच्या अनुच्छेद  २५४ (१) चा संदर्भ देणे योग्य आहे, ज्यामध्ये संसद आणि राज्य विधिमंडळांनी बनवलेल्या कायद्यांमधील विसंगतींशी संबंधित तरतुदी नमूद केल्या आहेत. अनुच्छेद  २५४ (१) खालीलप्रमाणे पुनरुत्पादित केले आहेः -

**"२५४. संसदेने केलेले कायदे आणि राज्यांच्या विधिमंडळांनी केलेले कायदे यांच्यातील विसंगती**

> (१) संसदेने अधिनियमित करण्यास सक्षम असलेल्या संसदेने केलेल्या कायद्याच्या कोणत्याही तरतुदीच्या किंवा समवर्ती सूचीत नमूद केलेल्या बाबींपैकी एकाच्या संदर्भात वर्तमान कायद्याच्या कोणत्याही तरतुदीच्या विरुद्ध एखाद्या राज्याच्या विधानमंडळाने केलेल्या कायद्याची कोणतीही तरतूद असल्यास, खंड (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, संसदेने केलेला कायदा, मग तो अशा राज्याच्या विधानमंडळाने केलेल्या कायद्याच्या आधी किंवा नंतर पारित झाला असेल, किंवा, परिस्थितीनुसार, वर्तमान कायदा, प्रभावी ठरेल आणि राज्याच्या विधानमंडळाने केलेला कायदा, विरोधाभासाच्या मर्यादेपर्यंत, रद्द होईल. "

अशा प्रकारे संविधानाच्या अनुच्छेद २५४ (१) च्या आदेशावरून हे स्पष्ट आहे की संहिता आणि पोलिस कायदा, १८६१ च्या तरतुदींमध्ये काही विसंगती असल्यास, संहितेच्या तरतुदी कायम राहतील आणि पोलिस कायद्याच्या तरतुदी विरोधाभासाच्या मर्यादेपर्यंत रद्द होतील.

६१) जर एफ.आय.आर. बुक मध्ये (पुस्तकात) किंवा सर्वसाधारण डायरीत एफ.आय.आर. नोंदवायचा आहे की नाही या बाबत संहितेचे कलम १५४ आणि पोलिस कायदा, १८६१ चे कलम ४४ मधील तरतुदींमध्ये काही विसंगती असेल, तर संहितेचे कलम १५४ च्या तरतुदी कायम राहतील आणि पोलिस कायदा, १८६१ चे कलम ४४ च्या तरतुदी (किंवा संबंधित तत्सम पोलिस कायदाच्या तरतुदी किंवा इतर संबंधित राज्यांमधील नियम) विरोधाभासाच्या मर्यादेपर्यंत रद्द होतील. अशा प्रकारे, संहितेच्या कलम १५४ अंतर्गत अनिवार्य केल्याप्रमाणे एफ.आय.आर. बुक मध्ये (पुस्तकात), एफ.आय.आर. नोंदवला जावा आणि हे म्हणणे की माहिती प्रथम सर्वसाधारण डायरीत नोंदवली जाईल आणि प्राथमिक चौकशीनंतरच, आवश्यक असल्यास, माहिती एफ.आय.आर. म्हणून नोंदवली जाईल हे योग्य नाही.

६२) तथापि, या न्यायालयाने **तपन कुमार सिंग (उपरोल्लेखित)** प्रकरणात असे म्हटले आहे की योग्य प्रकरणात जी. डी. नोंद प्रथम माहिती म्हणून मानली जाऊ शकते, जिथे ती

दखलपात्र गुन्ह्याची माहिती उघड करते. हे खालीलप्रमाणे मांडण्यात आले :

"**१५.** या निष्कर्षाची अचूकता याचिकाकर्त्यांनी आमच्यासमोर मांडलेली आहे. ते असे प्रतिपादित करतात आहे की जी. डी. नोंदीत नोंदवलेली माहिती दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करते. त्यांचे असे म्हणणे आहे की जी. डी. नोंद केल्यानंतर केवळ प्राथमिक चौकशी करण्यात आली असा त्यांचा युक्तिवाद जरी स्वीकारला गेला नसला, तरीही जी. डी. नोंद ही प्रथम खबरी अहवाल म्हणून मानले जाऊ शकते या आधारावर तपासाची कायदेशीरता टिकवून ठेवण्याचा त्यांना अधिकार आहे, कारण त्यात दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा झाला आहे.

**१६.** जी. डी. नोंद ला जिथे ते दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करते, योग्य प्रकरणात, प्रथम खबरी अहवाल मानले जाऊ शकते या कायदेशीर स्थितीबाबत आमच्यासमोर असलेल्या पक्षांनी वाद घातला नाही. अपीलकर्त्यांचा युक्तिवाद मानल्यास, उच्च न्यायालयाचा आदेश बाजूला ठेवला पाहिजे कारण जर कायद्यात एखाद्या दखलपात्र गुन्ह्याची माहिती देणारा प्रथम खबरी अहवाल असता तर पोलिसांना तपास करण्याचा आणि तपास प्रक्रियेत शोध आणि जप्ती करण्याचा अधिकार आणि अधिकारक्षेत्र होता. त्यामुळे प्राथमिक चौकशीची वैधता आणि शोध आणि जप्तीची वैधता या प्रश्नावर बारला उद्धृत केलेल्या अधिकाराचा विचार करणे आमच्यासाठी आवश्यक नाही.

xxx xxxx

**१९.** पोलिसांना मिळालेली माहिती ही प्रथम खबरी अहवाल म्हणून गणली जाऊ शकत नाही कारण आरोप अस्पष्ट होता कारण कोणाकडून एक लाख रुपयांची रक्कम मागितली आणि स्वीकारली गेली हे नमूद केलेले नव्हते, असा विचार करताना उच्च न्यायालयची चुक झाली. कोणतीही अधिकृत कृती करणे किंवा करण्यास नकार देणे, किंवा कोणत्याही व्यक्तीला त्याचे अधिकृत कार्य, अनुकूलता किंवा नापसंती दर्शविणे किंवा दाखवणे, किंवा कोणत्याही व्यक्तीला कोणतीही सेवा किंवा हानी पोहोचवण्याचा प्रयत्न करणे, यासाठी हेतू किंवा बक्षीस म्हणून अशी मागणी किंवा स्वीकृती केली गेली होती असे देखील म्हटले गेले नाही. अशा प्रकारे पोलीस अधिकाऱ्याला एखादा गुन्हा घडल्याचा संशय घेण्यास कोणताही आधार नव्हता, ज्याचा तपास करण्यासाठी त्याला संहितेच्या कलम १५६ अंतर्गत अधिकार देण्यात आला होता. "

६३) अशा प्रकारे हे निःसंदिग्धपणे स्पष्ट आहे की एफ. आय. आर. नोंदविणे हे अनिवार्य

आहे आणि प्रत्येक एफ. आय. आर. ला एक विशिष्ट वार्षिक क्रमांक देऊन एफ.आय.आर. बुक मध्ये (पुस्तकात) नोंदविणे आवश्यक आहे, जेणेकरून वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यास तसेच सक्षम न्यायालयास ज्यांच्याकडे प्रत्येक एफ. आय. आर. च्या प्रती पाठवणे आवश्यक आहे, प्रत्येक नोंदवलेल्या एफ. आय. आर. चा काटेकोरपणे मागोवा घेता येईल.

**'इन्फॉरमेशन - माहिती'**

६४) विधिमंडळाने संहितेच्या कलम १५४ (१) मध्ये 'इन्फॉरमेशन' (माहिती) हा शब्दप्रयोग जाणीवपूर्वक वापरलेला आहे, तर कलम ४१ (१) (ए) आणि (जी) मध्ये वॉरंटशिवाय एखाद्या व्यक्तीला अटक करण्यासाठी वापरलेले शब्दप्रयोग 'वाजवी तक्रार' किंवा 'विश्वासार्ह माहिती' आहे. संहितेच्या कलम १५४ (१) अंतर्गतच्या शब्दप्रयोगास "वाजवी" किंवा "विश्वासार्ह" असे उपसर्गांनी वर्णन केले गेले नाही. संहितेच्या कलम ४१ (१) (ए) आणि (जी) च्या उलट कलम १५४ (१) मधील 'इन्फॉरमेशन' (माहिती) या शब्दाचे वर्णन केले गेले नाही याचे कारण आहे की अधिकाऱ्याने माहितीच्या तर्कसंगततेवर किंवा विश्वासार्हतेवर समाधानी नसल्याच्या कारणावरून दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित कोणतीही माहिती नोंदवण्यास नकार देऊ नये. दुसऱ्या शब्दांत, उक्त माहितीची तर्कसंगतता किंवा विश्वासार्हता हे प्रकरण दाखल करण्यासाठीची पूर्वअट नाही.

६५) या न्यायालयाने **भजन लाल (उपरोल्लेखित)** प्रकरणात वरील मत व्यक्त केले आहे जे खालीलप्रमाणे आहेः -

> "**३२**....... विधिमंडळाने आपल्या सामूहिक विवेकबुद्धीने कलम १५४ (१) मध्ये 'इन्फॉरमेशन' (माहिती) या शब्दाचा काळजीपूर्वक आणि सावधगिरीने वापर केला आहे आणि त्याला कलम ४१(१) (ए) किंवा (जी) प्रमाणे ज्या मध्ये 'वाजवी तक्रार' आणि 'विश्वासार्ह माहिती' हे शब्दप्रयोग वापरले गेले आहे, तसे वर्णन केलेले नाही. स्पष्टपणे, संहितेच्या कलम ४१ (१) (ए) आणि (जी) च्या उलट कलम १५४ (१) मधील 'इन्फॉरमेशन' (माहिती) या शब्दाचे वर्णन न करण्यामागे हे कारण असू शकते की अधिकाऱ्याने दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहितीच्या तर्कसंगततेवर किंवा विश्वासार्हतेवर तो समाधानी नाही या कारणावरून माहिती नोंदवण्यास नकार देऊ नये आणि प्रकरण दाखल करण्यास मनाई करू नये. दुसऱ्या शब्दांत, उक्त माहितीची 'तर्कसंगतता' किंवा 'विश्वासार्हता' हे प्रकरण दाखल

करण्यासाठीची पूर्वअट नाही. सध्याच्या कलम १५४ चे आधीच्या संहितांशी तुलना केल्यास असे लक्षात येते की विधिमंडळाने केवळ 'इन्फॉरमेशन' (माहिती) हा शब्द त्याचे वर्णन न करता वापरणे हेतुपुरस्सर योग्य मानले होते."

६६) **प्रकाश सिंग बादल (उपरोल्लेखीत)** प्रकरणात, या न्यायालयाने खालीलप्रमाणे निकाल दिलाः -

**"६५.** कलम १५४ (१) मध्ये नमूद केलेला कायदेशीर आदेश असा आहे की 'दखलपात्र गुन्हा' (संहितेच्या कलम २ (सी) च्या अर्थानुसार) बाबतची प्रत्येक माहिती जर तोंडी स्वरूपात (अशा परिस्थितीत ती लेखी स्वरूपात नोंदवून घ्यावी) किंवा लेखी स्वरूपात 'ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला' (संहितेच्या कलम २ (ओ) च्या अर्थानुसार) दिली गेली असेल आणि त्यावर माहिती देणाऱ्याची स्वाक्षरी असेल तर अधिकाऱ्याने अश्या माहितीची नोंद राज्य सरकारने विहित केलेल्या नमुन्यात केली पाहिजे ज्याला सामान्यतः 'प्रथम खबरी अहवाल' म्हणून संबोधतात आणि त्या नमुन्यामध्ये माहिती भरण्याच्या कृतीला गुन्हा किंवा प्रकरण दाखल करणे असे म्हंटले जाते.

**६६.** संहितेच्या कलम १५४ (१) च्या आदेशानुसार दखलपात्र गुन्हा उघड करणाऱ्या माहितीच्या आधारे गुन्हा किंवा प्रकरण दाखल करण्याच्या टप्प्यावर, संबंधित पोलिस अधिकारी माहितीदाराने दिलेली माहिती विश्वासार्ह आणि खरी आहे की नाही याची चौकशी सुरू करू शकत नाही आणि माहिती विश्वासार्ह किंवा खरी नाही या आधारावर प्रकरण दाखल करण्यास नकार देऊ शकत नाही. दुसरीकडे, पोलीस ठाणा प्रभारी अधिकारी कायदेशीररीत्या प्रकरण दाखल करण्यास बांधील आहे आणि जर त्याला एखादा गुन्हा घडल्याचा संशय असेल तर तपास सुरू करण्यास बांधील आहे, ज्याचा तपास करण्यासाठी त्याला संहितेच्या कलम १५६ अंतर्गत अधिकार आहे, जो कलम १५७ च्या तरतुदीच्या अधीन आहे. जर पोलीस ठाणा प्रभारी अधिकारी त्याच्याकडे असलेल्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्यास नकार देत असेल आणि नोंदवलेल्या दखलपात्र गुन्ह्याच्या माहितीवर प्रकरण दाखल करण्यास नकार देत असेल आणि त्यामुळे त्याच्यावर लादलेल्या वैधानिक कर्तव्याचे उल्लंघन होत असेल, तर अशा नकारामुळे व्यथित झालेली व्यक्ती संबंधित पोलीस अधीक्षकांना लेखी आणि टपालाद्वारे माहितीचा गोषवारा पाठवू शकते, आणि जर त्यांना अशी पाठवलेली माहिती दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करते असे समाधान झाल्यास, त्यांनी एकतर या प्रकरणाचा स्वतः तपास करावा किंवा संहितेच्या कलम १५४ च्या उपकलम (३) च्या पद्धतीने त्यांच्या अधिनस्थ असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून तपास करण्याचे निर्देश द्यावेत.

**६७.** हे लक्षात घेतले पाहिजे की विधिमंडळाने आपल्या सामूहिक विवेकबुद्धीने कलम १५४ (१) मध्ये 'इन्फॉरमेशन' (माहिती) या शब्दाचा काळजीपूर्वक आणि सावधगिरीने वापर केला आहे आणि त्याला कलम ४१(१) (ए) किंवा (जी) प्रमाणे ज्या मध्ये 'वाजवी तक्रार' आणि 'विश्वासार्ह माहिती' हे शब्दप्रयोग वापरले गेले आहे, तसे वर्णन केलेले नाही. स्पष्टपणे, संहितेच्या कलम ४१ (१) (ए) आणि (जी) च्या उलट कलम १५४ (१) मधील 'इन्फॉरमेशन' (माहिती) या शब्दाचे वर्णन न करण्यामागे हे कारण असू शकते की अधिकाऱ्याने दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहितीच्या तर्कसंगततेवर किंवा विश्वासार्हतेवर तो समाधानी नाही या कारणावरून माहिती नोंदवण्यास नकार देऊ नये आणि प्रकरण दाखल करण्यास मनाई करू नये. दुसऱ्या शब्दांत, उक्त माहितीची 'तर्कसंगतता' किंवा 'विश्वासार्हता' हे प्रकरण दाखल करण्यासाठीची पूर्वअट नाही. सध्याच्या कलम १५४ चे आधीच्या संहितांशी तुलना केल्यास असे लक्षात येते की विधिमंडळाने केवळ 'इन्फॉरमेशन' (माहिती) हा शब्द त्याचे वर्णन न करता, वापरणे हेतुपुरस्सर योग्य मानले होते. भारतीय विधान परिषदेने पारित केलेल्या १८६१ च्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १३९ (१८६१ चा ऍक्ट २५) मध्ये असे म्हटले आहे की, ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला दिलेली 'प्रत्येक तक्रार किंवा माहिती' लेखी स्वरूपात नोंदविली गेली पाहिजे, ज्या तरतुदीत नंतर १८७२ च्या संहितेच्या कलम ११२ (१८७२ चा ऍक्ट १०) द्वारे सुधारणा करण्यात आली, ज्यामध्ये त्यानंतर असे म्हटले गेले की ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला दिलेली 'प्रत्येक तक्रार' लेखी स्वरूपात नोंदवली गेली पाहिजे. आधीच्या म्हणजेच १८६१ आणि १८७२ च्या दोन संहितांमध्ये आलेला 'तक्रार' हा शब्द काढून टाकण्यात आला आणि त्या ठिकाणी १८८२ आणि १८९८ च्या संहितांमध्ये 'माहिती' हा शब्द वापरला गेला जो आता संहितेचे कलम १५४, १५५, १५७ आणि १९० (सी) मध्ये वापरला जातो. सर्व संहितांचे एकूण वाचन केल्यावर हे स्पष्ट होते की प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यासाठी जी अट अनिवार्य आहे ती म्हणजे माहिती असायला हवी आणि ती माहिती दखलपात्र गुन्हा उघड करणारी हवी.

**६८.** त्यामुळे, हे स्पष्ट आहे की जर दखलपात्र गुन्हा उघड करणारी कोणतीही माहिती जी संहितेच्या कलम १५४ (१) च्या आवश्यकतांची पूर्तता करते, अशी माहिती जर ठाणा प्रभारी अधिकाऱ्यापुढे ठेवली गेली, तर त्या अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अशा माहितीचा गोषवारा नोंदवण्याशिवाय दुसरा पर्याय नाही म्हणजेच अशा माहितीच्या आधारे प्रकरण दाखल करावा लागणार."

६७) **रमेश कुमारी (उपरोल्लेखित)** या प्रकरणात, या न्यायालयाने खालीलप्रमाणे असे म्हटले आहे की :-

**४.** कायद्याच्या कलम १५४ अंतर्गत नागरिकाने केलेल्या दखलपात्र गुन्ह्याच्या तक्रारीवर पोलिस अधिकारी अनिवार्यपणे प्रकरण दाखल करतो हे आता रेस इंटेग्रा (अनिर्णित विषय) राहिलेले नाही. या न्यायालयाने *हरियाणा राज्य - विरुद्ध - भजनलाल* या प्रकरणात या कायद्याच्या मुद्दावर निर्णय दिला आहे. संहितेच्या कलम १५४ च्या अनिवार्य स्वरूपाची संपूर्ण व्याप्ती आणि गुंतागुंत तपासल्यानंतर हे न्यायालय निकालाच्या परिच्छेद ३१ आणि ३२ मधील निष्कर्षावर खालीलप्रमाणे पोहोचले आहेः

"३१. संहितेच्या कलम १५४ (१) च्या आदेशानुसार दखलपात्र गुन्हा उघड करणाऱ्या माहितीच्या आधारे गुन्हा किंवा प्रकरण दाखल करण्याच्या टप्प्यावर, संबंधित पोलिस अधिकारी माहितीदाराने दिलेली माहिती विश्वासार्ह आणि खरी आहे की नाही याची चौकशी सुरू करू शकत नाही आणि माहिती विश्वासार्ह किंवा खरी नाही या आधारावर प्रकरण दाखल करण्यास नकार देऊ शकत नाही. दुसरीकडे, पोलीस ठाणा प्रभारी अधिकारी कायदेशीररीत्या प्रकरण दाखल करण्यास बांधील आहे आणि जर त्याला एखाद्या गुन्हा घडल्याचा संशय असेल तर तपास सुरू करण्यास बांधील आहे, ज्याचा तपास करण्यासाठी त्याला संहितेच्या कलम १५६ अंतर्गत अधिकार आहे, जे कलम १५७ च्या तरतुदीच्या अधीन आहे. (या निकालाच्या पुढील भागात आम्ही संहितेच्या कलम १५६ आणि १५७ अन्वये दखलपात्र गुन्ह्याचा तपास करणाऱ्या अधिकाऱ्याच्या अधिकाराबद्दल तपशीलवार चर्चा करण्याचा विचार केला आहे, त्यामुळे सध्याच्या संदर्भात त्या कलामांबद्दल सखोल विचार व्यक्त करण्याचा आमचा विचार नाही.) जर पोलीस ठाणा प्रभारी अधिकारी त्याच्याकडे असलेल्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्यास नकार देत असेल आणि नोंदवलेल्या दखलपात्र गुन्ह्याच्या माहितीवर प्रकरण दाखल करण्यास नकार देत असेल आणि त्यामुळे त्याच्यावर लादलेल्या वैधानिक कर्तव्याचे उल्लंघन होत असेल, तर अशा नकारामुळे व्यथित झालेली व्यक्ती संबंधित पोलीस अधीक्षकांना लेखी आणि टपालाद्वारे माहितीचे सार पाठवू शकते, आणि जर त्यांना अशी पाठवलेली माहिती दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करते असे समाधान झाल्यास, त्यांनी एकतर या प्रकरणाचा स्वतः तपास करावा किंवा संहितेच्या कलम १५४ च्या उपकलम (३) च्या पद्धतीने त्यांच्या अधिनस्थ असलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून तपास करण्याचे निर्देश द्यावेत.

**३२.** हे लक्षात घेतले पाहिजे की विधिमंडळाने आपल्या सामूहिक विवेकबुद्धीने कलम १५४ (१) मध्ये 'इन्फॉरमेशन' (माहिती) या शब्दाचा काळजीपूर्वक आणि सावधगिरीने वापर केला आहे आणि त्याला कलम ४१(१) (ए) किंवा (जी) प्रमाणे ज्या मध्ये 'वाजवी तक्रार' आणि 'विश्वासार्ह माहिती' हे शब्दप्रयोग वापरले गेले आहे, तसे वर्णन केलेले नाही. स्पष्टपणे, संहितेच्या कलम ४१ (१) (ए) आणि (जी) च्या उलट कलम १५४ (१) मधील 'इन्फॉरमेशन ' (माहिती) या शब्दाचे वर्णन न करण्यामागे हे कारण

असू शकते की अधिकाऱ्याने दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहितीच्या तर्कसंगततेवर किंवा विश्वासार्हतेवर तो समाधानी नाही या कारणावरून माहिती नोंदविण्यास नकार देऊ नये आणि प्रकरण दाखल करण्यास मनाई करू नये. दुसऱ्या शब्दांत, उक्त माहितीची 'तर्कसंगतता' किंवा 'विश्वासार्हता' हे प्रकरण दाखल करण्यासाठी पूर्वअट नाही. सध्याच्या कलम १५४ ची आधीच्या संहितांशी तुलना केल्यास असे लक्षात येते की विधिमंडळाने केवळ 'इन्फॉरमेशन' (माहिती) हा शब्द त्याचे वर्णन न करता, वापरणे हेतुपुरस्सर योग्य मानले होते. भारतीय विधान परिषदेने पारित केलेल्या १८६१ च्या फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १३९ (१८६१ चा ऍक्ट २५) मध्ये असे म्हटले आहे की, ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला दिलेली 'प्रत्येक तक्रार किंवा माहिती' लेखी स्वरूपात नोंदवली गेली पाहिजे, ज्या तरतुदीत नंतर १८७२ च्या संहितेच्या कलम ११२ (१८७२ चा ऍक्ट १०) द्वारे सुधारणा करण्यात आली, ज्यामध्ये त्यानंतर असे म्हटले गेले की ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला दिलेली 'प्रत्येक तक्रार' लेखी स्वरूपात नोंदवली गेली पाहिजे. आधीच्या म्हणजेच १८६१ आणि १८७२ च्या दोन संहितांमध्ये आलेला 'तक्रार' हा शब्द काढून टाकण्यात आला आणि त्या ठिकाणी १८८२ आणि १८९८ च्या संहितांमध्ये 'इन्फॉरमेशन' (माहिती) हा शब्द वापरला गेला जो आता १९७३ च्या सध्याच्या संहितेच्या (१९७४ चा ऍक्ट २) कलम १५४, १५५, १५७ आणि १९० (सी) मध्ये वापरला जातो. सर्व संहितांचे एकूण वाचन केल्यावर हे स्पष्ट होते की प्रथम खबरी अहवाल नोंदविण्यासाठी जी अट अनिवार्य आहे ती म्हणजे माहिती असायला हवी आणि ती माहिती दखलपात्र गुन्हा उघड करणारी हवी.

(मूळ मध्ये जोर)

शेवटी, या न्यायालयाने परिच्छेद ३३ मध्ये म्हटलेः

"३३. त्यामुळे, हे स्पष्ट आहे की जर दखलपात्र गुन्हा उघड करणारी कोणतीही माहिती जी संहितेच्या कलम १५४ (१) च्या आवश्यकतांची पूर्तता करते, अशी माहिती जर ठाणा प्रभारी अधिकाऱ्यापुढे ठेवली गेली, तर त्या अधिकाऱ्याकडे विहित नमुन्यात अशा माहितीचा गोषवारा नोंदवण्याशिवाय दुसरा पर्याय नाही म्हणजेच अशा माहितीच्या आधारे प्रकरण दाखल करावा लागणार."

**५.** या न्यायालयाने परिच्छेद ३१, ३२ आणि ३३ मध्ये व्यक्त केलेली उपरोक्त मतांनुसार, संहितेच्या कलम १५४ ची तरतूद अनिवार्य असल्याबाबत कोणतीच शंका उरत नाही आणि दखलपात्र गुन्हा उघड करणाऱ्या अशा माहितीच्या आधारे प्रकरण दाखल करणे हे संबंधित अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. "

६८) **राम लाल नारंग (उपरोल्लिखित)** प्रकरणात, या न्यायालयाने खालीलप्रमाणे म्हंटले

आहे की :-

"**१४.** १८९८ च्या फौ.प्र. सं. अन्वये, जेव्हा जेव्हा ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला एखाद्या दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहिती मिळाली, तेव्हा त्याला त्या माहितीचा गोषवारा त्यासाठी ठेवलेले विशिष्ट बुक मध्ये (पुस्तकात) विहित नमुन्यात नोंदवणे आवश्यक होते. (कलम १५४ फौ.प्र.सं.) फौ.प्र.सं. च्या कलम १५६ ने न्यायालयाच्या आदेशाशिवाय दखलपात्र गुन्ह्यांचा तपास करण्याचा अधिकार पोलिसांना दिला. प्राप्त झालेल्या माहितीवरून किंवा अन्यथा, ठाणा प्रभारी अधिकाऱ्याला दखलपात्र गुन्हा झाल्याचा संशय आल्यास, त्याला पोलिस अहवालावर अशा गुन्ह्याची दखल घेण्याचे अधिकार असलेल्या दंडाधिकाऱ्याला त्याचा अहवाल त्वरित पाठवणे आवश्यक होते आणि नंतर स्वतः कार्यवाही करून किंवा त्याच्या अधिनस्थ अधिकाऱ्यांपैकी एकाला घटनास्थळी पाठवून, प्रकरणाची तथ्ये आणि परिस्थितीचे तपास करणे आणि गुन्हेगाराला शोधून काढण्यासाठी आणि अटक करण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक होते (कलम १५७ फौ.प्र.सं). त्याला अनावश्यक विलंब न करता तपास पूर्ण करणे आवश्यक होते आणि ते पूर्ण होताच, पोलिस अहवालावर गुन्ह्याची दखल घेण्याचे अधिकार असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे, पक्षांची नावे, माहितीचे स्वरूप आणि प्रकरणाच्या परिस्थितीशी परिचित असलेल्या व्यक्तींची नावे विहित नमुन्यातील अहवालात नमूद करून  पाठवणे आवश्यक होते. [कलम १७३(१) फौ.प्र.सं.] आरोपीला कोठडीत पाठवण्यात आले होते की जामिनावर सोडण्यात आले होते हे देखील त्याला सांगणे आवश्यक होते. कलम १७३ (१) फौ.प्र.सं. अन्वये ठाणा प्रभारी अधिकाऱ्याने सादर केलेला अहवाल प्राप्त झाल्यानंतर, पोलीस अहवालावर गुन्ह्याची दखल घेण्याचे अधिकार असलेले दंडाधिकारी गुन्ह्याची दखल घेऊ शकतात [कलम १९० (१)(बी) फौ.प्र.सं.].त्यानंतर, जर गुन्ह्याची दखल घेणारे दंडाधिकाऱ्यांच्या मते, कारवाईसाठी पुरेसा आधार असल्यास, दंडाधिकाऱ्यांनी आरोपीची उपस्थिती सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक आदेशिका जारी करणे आवश्यक होते (कलम २०४ फौ.प्र .सं.). अशा प्रकारे संहितेची योजना अशी होती की एफ.आय.आर. नंतर तपास केला गेला, तपासामुळे दंडाधिकाऱ्यांना अहवाल सादर केला गेला, दंडाधिकाऱ्यांनी पोलिस अहवाल मिळाल्यावर गुन्ह्याची दखल घेतली आणि शेवटी, दंडाधिकाऱ्यांनी दखल घेऊन आरोपींवर आदेशिका जारी केली.

**१५.** अशाप्रकारे दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित प्रत्येक माहितीची “नोंद” घेणे हे सांविधिक अधिकार आणि कर्तव्य पोलिसांना होते. दखलपात्र गुन्हा घडल्याचा संशय असलेल्या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती तपासण्याचा आणि पोलिसांच्या अहवालावर गुन्ह्याची दखल घेण्याचे अधिकार असलेल्या दंडाधिकाऱ्याकडे अशा तपासाचा अहवाल सादर करण्याचे सांविधिक अधिकार आणि कर्तव्य पोलिसांना होते. पोलिसांचे हे सांविधिक अधिकार आणि कर्तव्ये दंडाधिकाऱ्यांच्या देखरेखीच्या किंवा हस्तक्षेपाच्या कोणत्याही अधिकाराने मर्यादित नव्हते; किंवा पोलिसांना दखलपात्र गुन्ह्याचा तपास करण्याचे अधिकार

देण्यासाठी दंडाधिकाऱ्यांकडून कोणत्याही मंजुरीची आवश्यकता नव्हती. कायद्यातील हे मत अगदी स्पष्ट होते. किंग एम्परर - वि. - ख्वाजा नाझीर अहमद मध्ये प्रिवी कौन्सिलने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदवलेः

"ज्याप्रमाणे गुन्ह्याचा आरोप असलेल्या प्रत्येक आरोपीला न्यायालयात जाण्याची खुली मुभा असणे आवश्यक आहे जेणेकरून त्याच्यावर ज्या गुन्ह्याचा आरोप आहे त्या गुन्ह्यात तो दोषी आढळला नाही तर त्याची निर्दोष मुक्तता होऊ शकेल, त्याचप्रमाणे अशा प्रकरणांमध्ये जे पोलिसांच्या कार्यक्षेत्रात आहे आणि ज्यात कायदा त्यांच्यावर चौकशीचे कर्तव्य लादतो अश्या प्रकरणात न्यायव्यवस्थेने हस्तक्षेप करू नये हे अत्यंत महत्वाचे आहे. भारतात, दर्शविल्याप्रमाणे, न्यायालयीन अधिकाऱ्यांकडून कोणत्याही परवानगीची आवश्यकता न ठेवता कथित दखलपात्र गुन्ह्याच्या परिस्थितीचा तपास करण्याचा पोलिसांचा सांविधिक अधिकार आहे आणि न्यायालयाच्या अंतर्निहित अधिकारक्षेत्राचा वापर करून त्या वैधानिक नियमांमध्ये हस्तक्षेप करणे जर शक्य असल्याचे मानले गेले तर, जसे माननीय न्यायधीशांचे मत आहे, ते एक दुर्दैवी परिणाम असेल. न्यायपालिका आणि पोलिसांची कार्ये परस्पर पूरक आहेत, परस्परव्यापी नाहीत आणि कायदा आणि सुव्यवस्थेचे योग्य पालन करून वैयक्तिक स्वातंत्र्याचे संयोजन केवळ प्रत्येकाला स्वतःचे कार्य करण्याची मुभा दिल्यास प्राप्त केले जाऊ शकते, अर्थात, हेबियस कॉर्पस स्वरूपाचे निर्देश देण्यासाठी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४९१ अंतर्गत न्यायालयात गेल्यास, योग्य प्रकरणात, न्यायालयांच्या हस्तक्षेप करण्याच्या अधिकाराच्या अधीन राहून. तथापि, सध्याच्या प्रकरणात, न्यायालयाचे काम तेव्हा सुरू होते जेव्हा न्यायालयापुढे आरोप केला जातो आणि तोपर्यंत नाही..... सध्याच्या प्रकरणात, पोलिसांना फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम १५४ आणि १५६ अन्वये, न्यायालयाच्या मंजुरी शिवाय गुन्ह्याचा तपास करण्याचा सांविधिक अधिकार आहे...."

साधारणपणे, कलम १७३ (१) फौ. प्र .सं. अन्वये अहवाल सादर केल्यानंतर पोलिसांचे अधिकार आणि कर्तव्य संपुष्टात येते, आणि असा अहवाल प्राप्त झाल्यानंतर गुन्ह्याची दखल घेणे किंवा न घेणे हे दंडाधिकाऱ्यांवर अवलंबून असते. १८९८ च्या संहितेत कलम १७३ (१) फौ.प्र.सं. अन्वये अहवाल सादर केल्यानंतर आणि दंडाधिकाऱ्यांनी गुन्ह्याची दखल घेतल्यानंतर जर नवीन तथ्ये समोर आली, ज्यासाठी पुढील तपासाची आवश्यकता होती, अश्या प्रकरणात पोलिसांनी पाळल्या जाणाऱ्या प्रक्रियेबाबत कोणतीही तरतूद नव्हती. कलम १७३(१) अन्वये अहवाल सादर केल्यानंतर किंवा दंडाधिकाऱ्यांनी गुन्ह्याची दखल घेतल्यानंतर समोर येणाऱ्या नवीन तथ्यांचा तपास सुरु करण्यास पोलिसांना प्रतिबंधित करणारी कोणतीही स्पष्ट तरतूद नक्कीच नव्हती. आम्ही सध्या नमूद केल्याप्रमाणे, अनेक उच्च न्यायालयांनी सामान्यतः असा विचार केला होता की, जरी काहींना शंका होती, की जरी कलम १७३ (१) अन्वये अहवाल आधीच सादर करण्यात आला होता आणि

दंडाधिकाऱ्यांनी आधीच गुन्ह्याची दखल घेतली होती तरीही या परिस्थितीमुळे पोलिसांना पुढील तपासापासून रोखले गेले नव्हते. विधी आयोगाने आपल्या ४१ व्या अहवालात ही स्थिती मान्य केली आणि पुढील तपास करण्याच्या पोलिसांच्या अधिकाराला वैधानिकदृष्ट्या पुष्टी दिली जावी अशी शिफारस केली. विधी आयोगाने म्हटलेः

> "१४.२३. कलम १७३ अंतर्गत अहवाल हा सामान्यतः तपासाचा शेवट असतो. तथापि, कधीकधी, कलम १७३ अंतर्गत अहवाल सादर केल्यानंतर पोलिस अधिकाऱ्यास आरोपीचा दोष किंवा निर्दोषता दर्शविणारा पुरावा मिळतो. आम्ही विचार करायला हवा होता की पोलीस अधिकारी सदर पुरावा गोळा करून संबंधित दंडाधिकाऱ्यांकडे पाठवू शकतात. तथापि, असे दिसते की न्यायालयांनी कधीकधी संकुचित दृष्टिकोन बाळगला आहे की एकदा काय कलम १७३ अन्वये अंतिम अहवाल सादर करण्यात आला तर पोलीस या प्रकरणाला पुन्हा हाताळू शकत नाहीत आणि तपास पुन्हा सुरू करू शकत नाहीत. हा दृष्टिकोन तपास संस्थेच्या मार्गात अडथळा आणतो, जो अभियोग पक्षावर आणि त्या बाबतीत अगदी आरोपीवरही अन्यायकारक ठरू शकतो. कलम १७३ मध्ये हे स्पष्ट केले पाहिजे की सक्षम पोलिस अधिकारी अशा पुराव्याची तपासणी करू शकतात आणि दंडाधिकाऱ्यांना अहवाल पाठवू शकतात. नवीन माहितीच्या दस्तऐवजांच्या प्रती अर्थातच आरोपीला पुरविल्या पाहिजेत."

त्यानुसार, १९७३ च्या फौ.प्र.सं. मध्ये, कलम १७३ (८) ही एक नवीन तरतूद सामील करण्यात आली आणि त्यात असे म्हटले आहेः

> "उपकलम (२) अन्वये अहवाल दंडाधिकाऱ्यांकडे पाठवल्यानंतर या कलमातील कोणतीही बाब गुन्ह्याच्या पुढील तपासाचे अवरोधन करते असे समजण्यात येणार नाही आणि अशा तपासानंतर जर पोलीस ठाणा प्रभारी अधिकारी आणखी पुरावा, तोंडी किंवा लेखी, प्राप्त करेल तर तो दंडाधिकाऱ्यांकडे विहित नमुन्यात अशा पुराव्यांसंबंधी पुढील अहवाल पाठवेल; आणि उपकलम (२) ते (६) च्या तरतुदी, शक्यतोपर्यंत, जसे उपकलम (२) अन्वये पाठवलेल्या अहवालास लागू होतात तश्या याही अहवालास लागू होतील."

६९) **लल्लन चौधरी (उपरोल्लेखित)** प्रकरणात, या न्यायालयाने खालीलप्रमाणे मान्य केले आहे की:

"**८.** अशा प्रकारे संहितेच्या कलम १५४ प्रमाणे, तक्रारीत उघड केल्याप्रमाणे गुन्हा नोंदविणे आणि त्याप्रमाणे तपास सुरू करणे, हे, पोलिस अधिकाऱ्याचे वैधानिक कर्तव्य असल्याचे म्हंटले आहे. कलम १५४ चा महादेश स्पष्ट आहे की जर, दखलपात्र गुन्हा उघड

करणारी माहिती पोलीस स्टेशनच्या अधिकाऱ्यासमोर ठेवली गेली तर, त्या अधिकाऱ्यापुढे अश्या माहितीच्या आधारे गुन्हा दाखल करण्या व्यतिरिक्त कुठलाही दुसरा पर्याय नाही.

**९.** *रमेश कुमारी - विरुद्ध - स्टेट (एन.सी.टी. ऑफ दिल्ली (NCT of Delhi))* या प्रकरणात या न्यायालयाने असे म्हटले आहे की कलम १५४ ची तरतूद अनिवार्य आहे. त्यामुळे, दखलपात्र गुन्ह्याची माहिती मिळाल्यावर गुन्हा नोंदविणे हे संबंधित पोलीस अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे. माहितीची सत्यता किंवा विश्वासार्हता ही गुन्हा दाखल करण्यासाठीची पूर्वअट नाही. गुन्हा दाखल केल्या नंतरच त्याचा विचार केला जाऊ शकतो.

**१०.** संहितेच्या कलम १५४ चा महादेश असा आहे की दखलपात्र गुन्हा उघड करणाऱ्या माहितीच्या आधारे गुन्ह्याची/खटल्याची नोंद करण्याच्या टप्प्यावर, संबंधित पोलिस अधिकारी माहिती देणाऱ्या व्यक्तीने दिलेली माहिती विश्वासार्ह आणि खरी आहे की नाही याची चौकशी करू शकत नाही आणि माहिती संबद्ध नाही किंवा विश्वासार्ह नाही या आधारावर गुन्हा दाखल करण्यास नकार देऊ शकत नाही. दुसऱ्या शब्दांत, माहितीची विश्वासाहर्ता, खरेपणा आणि खात्रीलायकपणा ह्या संहितेच्या कलम १५४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यासाठीच्या पूर्वअटी नाहीत."

वरील संदर्भातील निर्णयांच्या अवलोकनाने हे स्पष्ट होते की माहितीची तर्कसंगतता किंवा विश्वासार्हता ही गुन्हा दाखल करण्यासाठीची पूर्वअट नाही.

**प्राथमिक चौकशी**

७०) श्री. नाफडे यांनी त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ खालील निर्णयांवर म्हणजे, **ई. पी. रोयप्पा** - विरुद्ध - **स्टेट ऑफ तामिळनाडू** (१९७४)४ एस.सी.सी.(SCC)३, **मनेका गांधी (उपरोल्लेखित)**, **एस.एम.डी. किरण पाशा -** विरुद्ध **- गव्हर्नमेंट ऑफ आंध्र प्रदेश** (१९९०) १ एस.सी.सी. ३२८, **डी.के.बासु -** विरुद्ध **- स्टेट ऑफ डब्लू. बी.** (१९९७)१ एस. सी. सी. ४१६, **उमा शंकर सितानी -** विरुद्ध **- पोलिस आयुक्त, दिल्ली आणि इतर.** (१९९६) ११ एस.सी.सी.७१४, **प्रिती गुप्ता (उपरोल्लेखित), फ्रान्सिस कोरली मुल्लिन -** विरुद्ध **- प्रशासक, युनिअन टेरीटरी ऑफ दिल्ली** १९८१(१) एस.सी.सी. ६०८, **कॉमन कॉज, ए रजिस्टर्ड सोसायटी -** विरुद्ध - **युनियन ऑफ इंडिया** १९९९(६) एस.सी.सी. ६६७**, डिस्ट्रीक्ट रेजिस्ट्रार अँड कलेक्टर, हैदराबाद** - विरुद्ध - **कॅनरा बँक** (२००५)१ एस.सी.सी. ४९६ आणि **रणजितसिंग ब्रह्मजीतसिंग शर्मा -** विरुद्ध **- स्टेट ऑफ महाराष्ट्र** (२००५)५ एस.सी.सी.२९४, वर भर दिला ज्यामध्ये म्हंटले आहे की जर पोलिस अधिकाऱ्याला आरोपांच्या सत्यतेबद्दल

शंका असेल तर त्याला प्राथमिक चौकशी करावी लागेल.

७१) राज्य सरकारचे ज्येष्ठ अधिवक्ता पुढे ठामपणे म्हणतात की, योग्य प्रकरणांमध्ये, एखाद्या पोलिस अधिकाऱ्याने दखलपात्र गुन्ह्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर प्रथमदर्शनी तक्रारीतील आरोपींवर केलेले आरोप विश्वासार्ह आहेत, असे समाधान करून घेणे योग्य ठरेल. या संदर्भात श्री.नाफडे यांनी खालील निर्णयांचा उल्लेख केला: **तपन कुमार सिंग (उपरोल्लेखित)**, **भगवंत किशोर जोशी(उपरोल्लेखित)**, **पी. सिराजुद्दीन(उपरोल्लेखित)**, **सेव्ही(उपरोल्लेखित)**, **शशीकांत(उपरोल्लेखित)**, **राजिंदर सिंग कटोच(उपरोल्लेखित)**, **विनीत नारायण** – विरुद्ध - **युनिअन ऑफ इंडिया** (१९९८) १ एस.सी.सी. २२६, **एलुमलाई** - विरुद्ध - **स्टेट ऑफ तामिळनाडू** १९८३ एल.डब्ल्यू. (सी.आर.एल.)१२१, **ए. लक्ष्मणराव** - विरुद्ध - **ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट, पार्वतीपुरम** ए.आय.आर.१९७१ एस.सी. १८६, **स्टेट ऑफ उत्तर प्रदेश** - विरुद्ध - **राम सागर यादव आणि इतर** १९८५(१) एस.सी.सी. ५५२, **मोना पनवर** - विरुद्ध - **अलाहाबाद उच्च न्यायालय** (२०११) ३ एस.सी.सी. ४९६, **अप्रेन जोसेफ** -विरुद्ध - **स्टेट ऑफ केरला** (१९७३) ३ एस.सी.सी. ११४, **किंग एम्परर** - विरुद्ध - **ख्वाजा नझीर अहमद** ए.आय.आर. १९४५ पी.सी. १८ आणि **सारंगधरसिंग शिवदाससिंग चौहान (उपरोल्लेखित).**

७२) *विद्वेषपूर्ण खटल्याच्या* तत्त्वाच्या आणि अनुच्छेद १४, १९ आणि २१ अन्वये देण्यात आलेल्या मूलभूत अधिकारांच्या संदर्भाने या तरतुदी वाचल्या पाहिजेत, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. प्रत्येक नागरिकाचा अधिकार आहे की त्याच्याविरुद्ध *विद्वेषपूर्ण खटला* चालवल्या जाऊ नये आणि एखाद्या निरपराध व्यक्तीला खोट्या गुन्ह्यात अडकवले जाऊ नये, याची काळजी घेणे हे कलम १५४ अन्वये प्रत्येक पोलिस अधिकाऱ्याचे कर्तव्य आहे, अशी ज्येष्ठ वकिलांची भूमिका आहे. दखलपात्र गुन्हा घडल्याबद्दल प्रथमदर्शनी पोलिस अधिकारी समाधानी नसतानाही एफ.आय.आर. दाखल करून तपास करत असेल तर नागरिकाचे स्वातंत्र्य धोक्यात येईल. त्यामुळे एफ.आय.आर. दाखल करण्यापूर्वी प्राथमिक चौकशी करावी, अशी आग्रही मागणी ज्येष्ठ वकिलांनी केली.

७३) संहितेच्या कलम १५४ मध्ये वापरण्यात आलेल्या भाषेनुसार, पोलिस ठाण्याच्या

प्रभारी अधिकाऱ्याला अन्यथा असा गुन्हा घडल्याचा संशय आल्यास अशा गुन्ह्याची माहिती (म्हणजे एफ.आय.आर) प्राप्त न होताही दखलपात्र गुन्ह्याचा तपास करणे पोलिसांचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्रत्येक दखलपात्र गुन्ह्याचा कायद्यानुसार त्वरित तपास व्हावा, हा वैधानिक हेतू अगदी स्पष्ट आहे. ही कायदेशीर स्थिती असल्याने दखलपात्र गुन्हा घडल्याची माहिती दिल्यास एफ.आय.आर. दाखल करावी किंवा नाही हे स्वातंत्र्य किंवा हा पर्याय पोलिसांकडे शिल्लक असण्याचे कारण नाही. कायद्यानुसार, प्रत्येक दखलपात्र गुन्ह्याचा त्वरित तपास केला गेला पाहिजे आणि संहितेच्या कलम १५४ अन्वये दखलपात्र गुन्हा घडल्याबद्दल प्राप्त झालेली सर्व माहिती एफ.आय.आर. म्हणून दाखल केली गेली पाहिजे जेणेकरून गुन्ह्याचा (तपास)सुरू होईल. संहितेच्या कलम १५४ ची अट एवढीच आहे की, रिपोर्ट मध्ये दखलपात्र गुन्हा घडल्याचा खुलासा होणे आवश्यक आहे आणि ते तपास यंत्रणेला पुढील कारवाई सुरु करण्यासाठी पुरेसे आहे.

७४) सुधारणेद्वारे कलम १५४ मध्ये उपकलम(३), समाविष्ट केल्याने, दखलपात्र गुन्ह्याच्या कोणत्याही माहितीकडे दुर्लक्ष केले जाऊ नये किंवा कारवाई केली जाऊ नये याची खात्री करण्याचा विधिमंडळाचा हेतू उघड होतो, ज्यामुळे कथित गुन्हेगार/आरोपीला संरक्षण मिळू शकते, जे, अन्यायकारक ठरेल.

७५) *'युनिअस इस्ट एक्सक्लूजन अल्टेरियस'* (एका गोष्टीची अभिव्यक्ती म्हणजे दुसऱ्या गोष्टीची वगळणूक) ही उक्ती संहितेच्या कलम १५४ च्या स्पष्टीकरणात लागू होते, ज्यामध्ये लिखित स्वरुपात माहिती नोंद करण्याच्या आदेशात विशेष नोंदवहीमध्ये दखलपात्र गुन्हा घडल्याची माहिती नोंदविण्याची शक्यता वगळली जाते.

७६) त्यामुळे, संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. दाखल केल्यानंतर गुन्ह्याचा तपास करणे ही "कायद्याद्वारे स्थापित केलेली प्रक्रिया" आहे आणि अशा प्रकारे ती संविधानाच्या अनुच्छेद २१ शी सुसंगत आहे. त्यानुसार, जर प्रथम एफ.आय.आर. दाखल केली गेली आणि नंतर कायद्याच्या तरतुदींनुसार तपास केला गेला तर घटनेच्या अनुच्छेद २१ अंतर्गत आरोपींच्या अधिकाराचे संरक्षण केले जाते.

७७) संहितेच्या कलम २(जी) नुसार 'चौकशी' ही संज्ञा खालीलप्रमाणे आहेः

> '**२(जी) - "चौकशी"** म्हणजे दंडाधिकारी किंवा न्यायालयाद्वारे या संहिते अंतर्गत चालवली जाणारी खटल्या खेरीजची प्रत्येक चौकशी."

त्यामुळे, हे स्पष्ट आहे की संहितेच्या अधीन राहून केलेली चौकशी न्यायालयीन कारवाईशी संबंधित आहे आणि पोलिसांनी घेतलेल्या उपाययोजनांशी संबंधित नाही, जे एकतर संहितेच्या कलम १५४ च्या टप्प्यानंतरचा तपास किंवा 'प्राथमिक चौकशी' म्हणून ओळखल्या जातात आणि ज्या एफ.आय.आर. दाखल करण्यापूर्वीच्या आहेत, जरी, सामान्य डायरी / स्टेशन डायरी/ दैनिक डायरी मध्ये कोणतीही नोंद घेतली नसली तरी.

७८) जरी संहितेच्या कलम १५९ आणि कलम २०२ आणि ३४० अंतर्गत 'प्राथमिक चौकशी' आणि 'चौकशी' या शब्दाचा संदर्भ आहे, तरी तो पोलिसांद्वारे नव्हे तर न्यायालयाने हाती घेतलेला न्यायिक कार्यपद्धतीचा आहे आणि सध्याच्या संदर्भासाठी संबंधित नाही.

७९) याशिवाय, ज्येष्ठ वकिलांनी कलम १५४ मध्ये सी.बी.आय. च्या नियमावलीत नमूद केलेल्या विशेष प्रक्रियांचा अंतर्भाव लक्षात घेण्यावरही भर दिला. "प्राथमिक चौकशी" ही संकल्पना सी.बी.आय. च्या 'गुन्हे नियमावली'च्या नवव्या प्रकरणात समाविष्ट आहे हे खरे आहे. तथापि, ही 'गुन्हे नियमावली' ही संविधी नाही आणि विधिमंडळाने ती अधिनियमित केलेली नाही. हा सी.बी.आय. अधिकाऱ्यांच्या अंतर्गत मार्गदर्शनासाठी जारी केलेल्या प्रशासकीय आदेशांचा संच आहे. तो संहितेची जागा घेऊ शकत नाही. शिवाय संहितेतच याच्या उलट कोणतेही संकेत नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या रचनेत प्राथमिक चौकशी करण्याची संकल्पना आयात करण्यासाठी सी.बी.आय.च्या 'गुन्हे नियमावली'तील तरतुदींचा आधार घेता येणार नाही. या टप्प्यावर, सी.बी.आय.ची स्थापना दिल्ली विशेष पोलीस आस्थापना कायदा, १९४६ या विशेष कायद्यांतर्गत करण्यात आली असून, या कायद्यातूनच तपास करण्याचे अधिकार सी.बी.आय.ला प्राप्त झाले आहेत, असेही म्हणणे योग्य ठरेल.

८०) हे सादर केले जाऊ शकते की संहितेचे कलम ४ (२) आणि ५, विशेष कायद्यांसाठी

विशेष कार्यपद्धतींचे अवलंब करण्याची परवानगी देतात. संहितेचा कलम ४ खाली नमूद केले आहेः

" **कलम ४. भारतीय दंड संहिता आणि इतर कायद्यांतर्गत गुन्ह्यांचा खटला.**

(१) भारतीय दंड संहिते अंतर्गत (१८६० च्या ४५) सर्व गुन्ह्यांचा तपास केला जाईल, त्यांची चौकशी केली जाईल, खटला चालवला जाईल आणि अन्यथा त्यावर यापुढे समाविष्ट असलेल्या तरतुदींनुसार कारवाई केली जाईल.

(२) इतर कोणत्याही कायद्या अंतर्गत सर्व गुन्ह्यांचा, त्याच तरतुदींनुसार तपास केला जाईल, चौकशी केली जाईल, खटला चालवला जाईल आणि अन्यथा हाताळला जाईल, परंतु अशा गुन्ह्यांचा तपास करण्याची, चौकशी करण्याची, खटला चालविण्याची किंवा अन्यथा हाताळण्याची पद्धत किंवा ठिकाण, नियंत्रित करणाऱ्या त्या वेळी पुरते अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमनाच्या अधीन राहून.”

अश्या प्रकारे हे स्पष्ट आहे की भारतीय दंड संहिते व्यतिरिक्त इतर कायद्यांतर्गत गुन्ह्यांसाठी, त्या गुन्ह्यांचा तपास, चौकशी, खटला इत्यादींचे नियमन करण्यासाठी विशेष कायद्यांतर्गत वेगवेगळ्या तरतुदी केल्या जाऊ शकतात. संहितेचे कलम ४(२) अशा विशेष तरतुदींचे संरक्षण करते.

८१) शिवाय, संहितेचा कलम ५ खालीलप्रमाणे आहे:

**"कलम ५. बचत -** या संहितेतील कोणतीही गोष्ट, याच्या विरुद्ध विशिष्ट तरतुदीच्या अभावी, त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही विशेष किंवा स्थानिक कायद्यावर किंवा त्या काळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याने विहित केलेल्या कोणत्याही विशेष अधिकारक्षेत्रावर किंवा अधिकारांवर किंवा कोणत्याही विशेष प्रकारच्या प्रक्रियेवर परिणाम करणार नाही. "

अशा प्रकारे, डी.एस.पी.ई. कायद्यातील सी.बी.आय.च्या अधिकारांशी संबंधित विशेष तरतुदी देखील संहितेच्या कलम ५ द्वारे संरक्षित आहेत.

८२) संहितेतील वरील विशिष्ट तरतुदी लक्षात घेता,डी.एस.पी.ई. कायद्यांतर्गत सी.बी.आय. च्या अधिकारांची, संहिते अंतर्गत नियमित राज्य पोलिसांच्या अधिकारांशी तुलना केली जाऊ शकत नाही.

**<u>लवकरात लवकर एफ. आय. आर. दाखल करण्याची महत्त्वाची आणि सक्तीची कारणे.</u>**

८३) एफ.आय.आर. म्हणून लवकरात लवकर माहिती नोंदवून साध्य करण्याचा उद्देश, इतर गोष्टीं बरोबरच, दुहेरी आहेः एक, गुन्हेगारी प्रसंभाविक प्रक्रिया सुरू केली जाते आणि अगदी सुरुवातीपासूनच तिचे चांगले दस्तऐवजीकरण केले जाते; आणि दुसरे, दखलपात्र गुन्ह्या संबंधित सर्वात आधी प्राप्त झालेली माहिती नोंदवली जाते, जेणेकरून नंतर त्याची वैशिष्ठे बदलली जाऊ शकत नाहीत.

८४) लोकशाही आणि स्वातंत्र्याची तत्त्वे पोलिसांच्या अधिकारांवर नियमित आणि परिणामकारक तपासणीची मागणी करतात. अश्या अधिकार असलेल्या अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचा एक मार्ग म्हणजे त्यांच्या प्रत्येक कृतीचे दस्तऐवजीकरण करणे. त्यानुसार, संहिते अंतर्गत, पोलिसांच्या कृती इत्यादी लेखी स्वरूपात असण्याची आणि दस्तऐवजीकरण करण्याची तरतूद आहे. उदाहरणार्थ, संहितेच्या कलम ४१(१) (बी) अंतर्गत अटकेच्या बाबतीत, अटक मेमो कारणांसह लेखी स्वरूपात असणे अनिवार्य आहे; संहितेच्या कलम ५५ अंतर्गत, जर एखाद्या अधिकाऱ्याला अटक करण्यासाठी प्रतिनियुक्त केले गेले असेल, तर वरिष्ठ अधिकाऱ्याला ज्या गुन्ह्यासाठी त्या व्यक्तीला अटक करायची आहे इत्यादी लिहून अभिलेखावर आणावा लागेल; संहितेच्या कलम ९१ अंतर्गत, संबंधित अधिकाऱ्याने कागदपत्रे मागण्यासाठी, लेखी आदेश काढावा; संहितेच्या कलम १६० अंतर्गत, साक्षीदाराला लेखी नोटीस जारी करावी लागेल जेणेकरून त्याला त्याचे/तिचे निवेदन नोंदवून घेण्यासाठी बोलावले जाऊ शकेल, जप्त केलेल्या प्रत्येक वस्तूसाठी जप्ती मेमो/पंचनामा काढावा लागेल, इत्यादी.

८५) पोलिसांनी, संहितेच्या कलम १७२ च्या तरतुदी प्रमाणे 'केस डायरी', पोलीस कायद्याच्या कलम ४४ च्या तरतुदी प्रमाणे 'जनरल डायरी' इत्यादींसह अनेक अभिलेख राखून ठेवणे आवश्यक आहे, ज्यामुळे गोळा केलेली प्रत्येक माहिती, घटनास्थळी दिलेली भेट आणि पोलिस अधिकाऱ्यांच्या सर्व कृतींचे दस्तऐवजीकरण करण्यात मदत होते जेणेकरून त्यांच्या प्रत्येक कार्याचे दस्तऐवजीकरण करता येईल. शिवाय, संहितेच्या कलम १५५ अंतर्गत, अदखलपात्र गुन्ह्याशी संबंधित प्राप्त झालेली प्रत्येक माहिती देखील नोंदविली गेली पाहिजे.

८६) एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य करण्याचा पाया केवळ गुन्हेगारी न्याय

वितरण प्रणालीमध्ये फक्त पारदर्शकता सुनिश्चित करण्यासाठीच नाही तर 'न्यायिक देखरेख' सुनिश्चित करण्यासाठी देखील आहे. कलम १५७(१) मध्ये 'तात्काळ' हा शब्द वापरला आहे. त्यामुळे, कलम १५४(१) अन्वये किंवा अन्य प्रकारे प्राप्त होणारी कोणतीही माहिती दंडाधिकाऱ्यांना अहवालाच्या स्वरूपात योग्यरित्या कळवावी लागते. त्यामुळे दखलपात्र गुन्हा घडल्याची नोंद केवळ तपास यंत्रणेच्याच नव्हे, तर कनिष्ठ न्यायव्यवस्थेच्याही निदर्शनास आणून दिली जाते.

८७) संहिता दोन प्रकारच्या एफ.आय.आर. विचारात घेते. कलम १५४(१) अन्वये रीतसर स्वाक्षरी केलेला एफ.आय.आर. जो माहिती देणाऱ्याद्वारे पोलीस ठाण्यातील संबंधित अधिकाऱ्याला दिला जातो. दुसऱ्या प्रकारचा एफ.आय.आर. असा असू शकतो जो पोलिसांनी स्वतः, प्राप्त झालेल्या कोणत्याही माहितीच्या आधारे किंवा माहिती देणाऱ्याच्या (कलम १५७(१)) व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारे, दाखल केलेला असेल. ही माहिती देखील रीतसर नोंदवावी लागेल आणि त्याची प्रत दंडाधिकाऱ्यांकडे लगेच पाठवावी लागेल.

८८) संहितेच्या कलम १५४ (१) अन्वये माहिती देणाऱ्याने दिलेल्या माहितीच्या आधारे किंवा संहितेच्या कलम १५७(१) अन्वये एफ.आय.आर. दाखल करणे बंधनकारक आहे. एफ. आय. आर. दाखल करण्याच्या बंधनाचे मूलभूत फायदे आहेतः

ए.) पीडित ह्याला 'न्याय मिळवीण्याच्या' दृष्टीने ही पहिली पायरी आहे.

बी.) सामान्य माणसाने दखलपात्र गुन्हा घडल्याची माहिती राज्याला दिल्यामुळे 'कायद्याचे राज्य' अबाधित ठेवल्या जाते.

सी.) यामुळे तपास जलद गतीने होणे आणि कधीकधी गुन्हेगारीला आळा घालणे देखील सुलभ होते. दोन्ही प्रकरणांमध्ये, ते केवळ कायद्याची सुव्यवस्था ठेवण्यावर परिणाम कारक ठरते.

डी.) यामुळे फौजदारी प्रकरणांमध्ये कमी हेराफेरी होते आणि पूर्वीच्या तारखेत एफ.आय.आर. दाखल करण्याच्या किंवा जाणूनबुजून एफ.आय.आर. उशिरा दाखल करण्याच्या घटना कमी होतात.

८९) **थुलिया काली** - विरुद्ध - **स्टेट ऑफ तमिळनाडू** (१९७२)३ एस.सी.सी. ३९३ या

प्रकरणात, या न्यायालयाने खालीलप्रमाणे निर्णय दिलाः-

"१२... फौजदारी खटल्यातील प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) हा खटल्यात सादर केलेल्या तोंडी पुराव्याची पुष्टी करण्याच्या उद्देशाने एक अत्यंत महत्त्वाचा आणि मौल्यवान पुरावा आहे. आरोपींच्या दृष्टिकोनातून वरील अहवालाचे असलेले महत्त्व क्वचितच कमी केले जाऊ शकते. गुन्हा घडल्याच्या संदर्भात पोलिसांकडे त्वरित अहवाल दाखल करण्याचा आग्रह धरण्याचा उद्देश म्हणजे गुन्हा कोणत्या परिस्थितीत झाला, वास्तविक गुन्हेगारांची नावे आणि त्यांनी बजावलेली भूमिका तसेच घटनेच्या ठिकाणी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शींची नावे याबद्दल लवकर माहिती मिळवणे. प्रथम खबरी अहवाल (एफ.आय.आर.) दाखल करण्यास उशीर झाल्यास बऱ्याचदा वैशिष्ठे बदलली जाऊ शकतात, जो वास्तविक पाहता नंतरचा विचार असतो. विलंब झाल्यामुळे, अहवाल केवळ उत्स्फूर्ततेचाच फायदा गमावतो असे नाही, तर विचारविनिमय आणि सल्लामसलती मुळे कल्पनारम्य घटक असलेली आवृत्ती, अतिशयोक्तीपूर्ण वृत्तांत किंवा बनावट कथेचा समावेश, ह्यांचा धोका निर्माण होतो. त्यामुळे प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास होणारा विलंब समाधानकारकपणे स्पष्ट करणे आवश्यक आहे..... "

९०) **तपन कुमार सिंग (उपरोल्लेखित)** मध्ये, ते खालीलप्रमाणे ग्राह्य धरण्यात आले होतेः-

"**२०.** प्रथम खबरी अहवाल हा विश्वकोश नाही, ज्याने दाखल केलेल्या गुन्ह्याशी संबंधित सर्व तथ्ये आणि तपशील उघड करणे आवश्यक आहे, हे सर्वस्वी निश्चित आहे. माहिती देणारा एखादा गुन्ह्या घडल्याबद्दल तक्रार नोंदवू शकतो, जरी त्याला पिडीत ह्याचे किंवा त्याच्या हल्लेखोराचे नावा बद्दल माहिती नसेल. ही घटना कशी घडली हे सुद्धा कदाचित त्याला माहीत नसेल. प्रथम माहिती देणारा हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सुद्धा असेलच असे नाही जेणेकरून केलेल्या गुन्ह्याच्या सर्व पैलूंचा तपशीलवार खुलासा करता येईल. महत्त्वाची गोष्ट अशी आहे की दिलेल्या माहितीने दखलपात्र गुन्हा घडल्याचा खुलासा होणे आवश्यक आहे आणि अशा प्रकारे दाखल केलेली माहिती पोलीस अधिकाऱ्याला दखलपात्र गुन्ह्याचा संशय घेण्यासाठी आधार प्रदान करणे आवश्यक आहे. या टप्प्यावर, दिलेल्या माहितीच्या आधारे पोलीस अधिकाऱ्याला दखलपात्र गुन्हा घडल्याचा संशय आला तरी पुरेसे आहे, आणि दखलपात्र गुन्हा झाला आहे याची त्याला खात्री किंवा समाधान झालेच पाहिजे असे नाही. जर त्याला मिळालेल्या माहितीच्या आधारे, संशय येण्याचे कारण असेल, की दखलपात्र गुन्हा घडला असावा, तर तो माहिती दाखल करण्यास आणि तपास करण्यास बांधील आहे. या टप्प्यावर त्याने माहितीच्या सत्यते बद्दल स्वतःला संतुष्ट करणे देखील आवश्यक नाही. संपूर्ण तपासानंतरच तो माहितीच्या सत्यतेबद्दल अहवाल देऊ शकेल. त्याचप्रमाणे, जरी त्या माहिती मध्ये सर्व तपशील नसले तरी त्याने तपासा दरम्यान ते तपशील शोधले पाहिजेत आणि सर्व आवश्यक पुरावे गोळा केले पाहिजेत. दखलपात्र गुन्हा उघड करणारी माहिती केवळ तपास यंत्रणेला गती देते जेणेकरून सर्व आवश्यक पुरावे गोळा करता येतील आणि त्यानंतर कायद्यानुसार कारवाई करता येईल.सादर केलेली माहिती एखादा गुन्हा घडला असावा असा संशय घेण्याचे कारण देते की नाही हे खरे परीक्षण आहे, ज्याचा तपास करण्यासाठी संबंधित पोलिस अधिकाऱ्याला, संहितेच्या कलम १५६ अंतर्गत, अधिकार आहे. तसे झाल्यास,

त्याच्याकडे माहिती नोंदवून घेणे आणि या प्रकरणाचा तपास स्वतः करणे किंवा तपास करण्यासाठी इतर कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती करणे ह्या शिवाय कोणताही पर्याय नाही. अहवाल खरा आहे की नाही, घटनेच्या पद्धती विषयी संपूर्ण तपशील उघड करतो की नाही, आरोपीचे नाव आहे की नाही आणि आरोपांचे समर्थन करण्यासाठी पुरेसा पुरावा आहे की नाही या सर्व बाबी, अहवालात दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा केला आहे की नाही या प्रश्नाच्या विचारार्थ परकीय आहेत.जरी माहिती या बाबींशी संबंधित संपूर्ण तपशील देत नसली, तरी तपास अधिकारी या प्रकरणाचा तपास करण्याच्या आणि शक्य असल्यास खरी तथ्ये शोधण्याच्या त्याच्या कर्तव्यापासून मुक्त नाही."

९१) **मधु बाला (उपरोल्लेखित) प्रकरणात,** या न्यायालयाने असे म्हटलेः

**"६.** संहितेच्या संबंधित तरतुदींकडे प्रथम येत असताना, कलम २(डी) मध्ये 'तक्रार' म्हणजे दंडाधिकाऱ्याने संहितेनुसार कारवाई करण्याच्या दृष्टीने तोंडी किंवा लेखी केलेला आरोप, की एखाद्या ज्ञात किंवा अज्ञात व्यक्तीने गुन्हा केला आहे, परंतु त्यात पोलिस अहवालाचा समावेश नाही. कलम २(सी) अंतर्गत "दखलपात्र गुन्हा" म्हणजे असा गुन्हा ज्यासाठी आणि "दखलपात्र खटला" म्हणजे असे प्रकरण ज्यामध्ये पोलिस अधिकारी पहिल्या अनुसूची (संहितेच्या) किंवा सध्या अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यानुसार, वॉरंटशिवाय अटक करू शकतो. कलम २(आर) अंतर्गत "पोलिस अहवाल" म्हणजे संहितेच्या कलम १७३च्या उपकलम(२) अंतर्गत पोलीस अधिकाऱ्याने दंडाधिकाऱ्याला पाठवलेला अहवाल. कलम १५४ ते १७६ यांचा समावेश असलेल्या संहितेच्या बाराव्या प्रकरणात पोलिसांना दिलेली माहिती आणि तपास करण्याच्या त्यांच्या अधिकारांशी संबंधित आहे. कलम १५४ मध्ये, इतर गोष्टींबरोबरच, अशी तरतूद आहे की पोलीस ठाण्याचा प्रभारी अधिकाऱ्याने त्याला तोंडी दिलेल्या दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित प्रत्येक माहिती लिहून घ्यावी आणि अशी माहिती लेखी दिल्यास ती देणाऱ्या व्यक्तीची स्वाक्षरी त्यावर घ्यावी आणि राज्य सरकारने या संदर्भात विहित केलेल्या स्वरूपात अशा अधिकाऱ्याने ठेवायचे असल्याच्या पुस्तकेत त्याचे सार नोंदणीकृत करावे. संहितेचे कलम १५६ ज्याच्याशी आपण प्रामुख्याने या अपीलांमध्ये संबंधित आहोत ते खालीलप्रमाणे आहेः......

**९.** अशा प्रकरणांची नोंद करण्याचा प्रकार आणि पद्धत भारतीय पोलीस कायदा, १८६१ अंतर्गत विविध राज्य सरकारांनी तयार केलेल्या नियमांमध्ये नमूद केली आहे. सध्याच्या प्रकरणात आपला संबंध पंजाब पोलिस नियम, १९३४ (जे पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश आणि दिल्लीला लागू आहेत) जे या कायद्यांतर्गत तयार केलेले आहेत ह्याच्याशी आहे, आता आपण त्या नियमांच्या संबंधित तरतुदींचा संदर्भ घेऊ शकतो. या नियमांच्या चोविसाव्या अध्यायात गुन्ह्याची माहिती मिळाल्यावर पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याला ज्या कार्यपद्धतीचे पालन करावे लागणार आहे ती नमूद केली आहे. या अध्यायात आढळणाऱ्या नियम २४.१ अन्वये संहितेच्या कलम १५४ अंतर्गत मिळालेली प्रत्येक माहिती प्रथम खबरी अहवाल वही मध्ये आणि त्याचे सार दैनंदिन डायरी मध्ये नोंदणीकृत करणे आवश्यक आहे. नियम २४.५ मध्ये असे म्हटले आहे की प्रथम माहिती अहवाल वही ही फॉर्म २४.५(१) प्रमाणे छापलेले पुस्तक असावे ज्यामध्ये २०० पृष्ठे असतील आणि नवीन सुरू

होण्यापूर्वी जुने पूर्णपणे भरले जाईल पुढे हे आवश्यक आहे की प्रकरणांवर प्रत्येक पोलीस ठाण्यातील प्रत्येक कॅलेंडर वर्षासाठी वार्षिक अनुक्रमांक असावा. या नियमांच्या इतर आवश्यकता तपशीलवार असण्याची गरज नाही कारण त्यांचा ह्या मुद्द्याशी कोणताही संबंध नाही.

**१०.** वरील चर्चेवरून हे स्पष्ट होते की जेव्हा जेव्हा दंडाधिकारी एखाद्या "तक्रारीच्या" चौकशीचे निर्देश देतात तेव्हा पोलिसांना त्या तक्रारीवर एफ.आय.आर. प्रमाणेच दखलपात्र गुन्हा दाखल करावा लागतो आणि वरील नियमांच्या आवश्यकतांचे पालन करावे लागते. त्यामुळे हे आमच्या समजण्या पलीकडले आहे की जर दंडाधिकाऱ्यांनी पोलिसांना "केस दाखल करण्याचे" निर्देश दिले तर कलम १५६(३) अंतर्गत तपासाचे निर्देश कायदेशीररित्या टिकू न शकणारे कसे ठरतात. खरे तर, दंडाधिकारी जरी खटला दाखल करण्याचे निर्देश देत नसले, तरीही संहितेच्या कलम १५६(१) च्या तरतुदी लक्षात घेता, ते पोलिसांना दखलपात्र 'प्रकरणाचा' तपास करण्याचे अधिकार देतात आणि भारतीय पोलिस कायदा, १८६१ अंतर्गत तयार केलेले नियम, औपचारिकपणे गुन्हा दाखल करण्यासाठी आणि नंतर त्याचा तपास करण्यासाठी (पोलिस) कर्तव्यबद्ध असतात. त्यामुळे या संहितेच्या तरतुदी दंडाधिकाऱ्यांच्या, पोलिसांना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याचे आणि नंतर त्याचा तपास करण्याचे, निर्देश देण्याच्या मार्गात कोणत्याही प्रकारे अडथळा आणत नाहीत. आमच्या मते जेव्हा संहितेच्या कलम १५६(३) अंतर्गत चौकशीचा आदेश द्यायचा असेल तेव्हा पोलिसांना योग्य निर्देश दिले जातील की "तक्रारीला प्रथम खबरी अहवाल मानून पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करावा आणि त्याचा तपास करावा".

९२) उद्दिष्टे आणि कारणांच्या विधानानुसार, गरीबांच्या हिताचे रक्षण करणे हे स्पष्टपणे संहितेच्या मुख्य उद्दिष्टांपैकी एक आहे. दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहितीची नोंदणी करणे अनिवार्य केल्याने समाजाला, विशेषतः देशातील ग्रामीण आणि दुर्गम भागातील गरिबांना मदत होईल.

९३) डॉ.जस्टिस व्ही.एस.मलीमथ यांच्या अध्यक्षतेखालील गुन्हेगारी न्याय प्रणालीतील सुधारणांवरील समिती एफ.आय.आर. दाखल न केल्यामुळे अनेक लोकांच्या होणाऱ्या दुर्दशेची दखल घेत, अशी शिफारस केली की माहिती नोंदविण्यास नकार देणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी. समितीने निरीक्षण नोंदविले ते असे.

"७.१९.१. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अनुसार, पोलीस ठाण्याच्या प्रभारीला दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित प्रत्येक माहिती तोंडी किंवा लेखी नोंदवणे बंधनकारक आहे. गुन्हा दाखल न करणे ही पोलिसांविरुद्धची गंभीर तक्रार आहे. राष्ट्रीय पोलीस आयोगाने आपल्या चौथ्या अहवालात खंत व्यक्त केली की पोलीस "जेथे पोलीस ठाण्यांमध्ये विशिष्ट

तक्रारी दाखल केल्या जातात तेथे तपास करण्यासाठी खटले दाखल करणे टाळतात". त्यात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ओपिनियन, नवी दिल्लीने "भारतातील पोलिसांची प्रतिमा" या संदर्भात केलेल्या अभ्यासाचा संदर्भ देण्यात आला आहे, ज्यामध्ये असे दिसून आले आहे की ५०% पेक्षा जास्त प्रतिसादकर्त्यांनी पोलिस ठाण्यांमध्ये तक्रारींची नोंदणी न करणे ही एक सामान्य प्रथा असल्याचे नमूद केले आहे.

७.१९.२. समितीने शिफारस केली आहे की सर्व तक्रारी त्वरित नोंदविल्या पाहिजेत आणि असे न केल्यास योग्य ती कारवाई केली जावी. त्यासाठी राजकीय कार्यकारिणी आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मानसिकतेत बदल होणे आवश्यक आहे.

७.१९.४ नोंदणीशी संबंधित आणखी दोन पैलू आहेत. पहिला म्हणजे 'कायद्याच्या योग्य कलमांचा वापर न करून' पोलिसांकडून होणारे गुन्हे कमी करणे. ही प्रवृत्ती आम्ही नापसंत करतो. गुन्ह्यांचे गांभीर्य लक्षात न घेता प्रत्येक प्रकरणात कायद्याच्या योग्य कलमांचा वापर केला पाहिजे. दुसरा मुद्दा लेखी तक्रारींच्या नोंदणीशी संबंधित आहे. तोंडी तक्रारी देण्यासाठी येणाऱ्या माहिती देणाऱ्यांना, लेखी तक्रारी आणण्याचा सल्ला देण्याची प्रवृत्ती पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांमध्ये वाढत आहे. हे चुकीचे आहे. नोंदणीस विलंब झाल्यामुळे तपास सुरू करण्यात आणि गुन्हेगारांना अटक करण्यात मोलाचा वेळ वाया जातो. याव्यतिरिक्त, तक्रारदाराला त्याचे मित्र, नातेवाईक आणि कधीकधी वकिलांशीही सल्लामसलत करण्याची संधी मिळते आणि अनेकदा तो गुन्ह्याची अतिशयोक्ती करतो आणि निर्दोष व्यक्तींना अडकवतो. याचा अखेरीस खटल्यावर प्रतिकूल परिणाम होतो. तोंडी माहिती मिळाल्यास एस.एच.ओ.(SHO) ने ती माहिती लेखी स्वरूपात नोंदवून घ्यावी जेणेकरून कथित गुन्ह्याची पहिली आवृत्ती नोंदविली जाईल.

७.२०.११. हे समितीच्या निदर्शनास आले आहे की दखलपात्र प्रकरणांमध्येही अनेकदा पोलीस अधिकारी तक्रारीची दखल घेत नाहीत आणि गुन्हा दखलपात्र नाही असे सांगून तक्रारदाराला परत पाठवतात. राजकीय किंवा इतर दबाव किंवा भ्रष्टाचारामुळे जरी हे प्रकरण दखलपात्र नसले तरी काहीवेळा पोलीस हे प्रकरण दखलपात्र श्रेणीत आणण्यासाठी तथ्यांचा विपर्यास करतात. पोलीस अधिकाऱ्याला त्याला मिळालेल्या प्रत्येक तक्रारीची नोंद करणे बंधनकारक करून हा धोका थांबवता येऊ शकतो. पोलीस अधिकाऱ्याकडून दिलेल्या अधिकाराचा गैरवापर रोखण्यासाठी व कर्तव्याचे उल्लंघन केल्यास कायद्यांतर्गत दंडनीय गुन्हा ठरला पाहिजे."

९४) याचा अर्थ असा की दाखल न झालेल्या एफ.आय.आर. ची संख्या ही प्रत्यक्षात दाखल झालेल्या एफ.आय.आर.च्या संख्ये इतकीच आहे. एन.सी.आर.बी. ची आकडेवारी लक्षात घेता, २०१२ या वर्षात भारतात सुमारे ६० लाख दखलपात्र गुन्हे नोंदविले गेले होते जे दर्शवते की दरवर्षी सुमारे ६० लाखांच्या श्रेणीत गुन्ह्यांना दडविण्यात आले असू शकते. अशा

प्रकारे, असे दिसून येते की दरवर्षी इतक्या मोठ्या संख्येने एफ.आय.आर. दाखल केले जात नाहीत, जे म्हणजे इतक्या मोठ्या संख्येने झालेल्या गुन्ह्यांच्या पीडितांच्या हक्कांचे स्पष्ट उल्लंघन आहे.

९५) गुन्हेगारीला दडविल्याने अल्पावधीतच कायद्याचे राज्य कमकुवत होते आणि लोक कायद्याच्या राजवटीचा आदर करणे बंद करत असल्याने दीर्घकाळात कायद्याच्या राजवटीवर देखील त्याचा खूप नकारात्मक परिणाम होतो. अशा प्रकारे, इतक्या मोठ्या संख्येने एफ.आय.आर. दाखल न केल्याने समाजात निश्चितपणे अराजकता निर्माण होते.

९६) त्यामुळे कलम १५४ चे इतर कोणत्याही स्वरूपात निर्वाचन/अवलोकन करणे हे केवळ संहितेच्या योजनेसाठीच नव्हे तर संपूर्ण समाजासाठीही हानिकारक ठरेल. अशा प्रकारे असे दिसून येते की या न्यायालयाने विविध निर्णीत प्रकरणांमध्ये वारंवार असे म्हटले आहे की जर संहितेच्या कलम १५४ अंतर्गत पोलिसांना दिलेली माहिती एखादा दखलपात्र गुन्हा घडल्याबाबतची असेल तर एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य आहे.

<u>तरतुदीचा गैरवापर होण्याची शक्यता आहे का?</u>

९७) प्राथमिक चौकशीच्या समर्थनार्थ आणखी एक उत्तेजक युक्तिवाद केला गेला आहे की एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य केल्यास ते मनमानी अटकेस कारणीभूत ठरेल, जे संविधानाच्या अनुच्छेद २१ चे थेट उल्लंघन असेल.

९८) एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य असले तरी, एफ.आय.आर. दाखल केल्यानंतर आरोपीला ताबडतोब अटक करणे अजिबात अनिवार्य नाही. खरे तर, एफ.आय.आर. दाखल करणे आणि आरोपी व्यक्तीला अटक करणे या कायद्यांतर्गत दोन पूर्णपणे भिन्न संकल्पना आहेत आणि अटकेविरुद्ध अनेक सुरक्षा उपाय उपलब्ध आहेत. शिवाय, त्यात नमूद केलेल्या अटी पूर्ण झाल्यास आरोपी व्यक्तीला संहितेच्या कलम ४३८ च्या तरतुदीनुसार "अटकपूर्व जामिनासाठी" अर्ज करण्याचा देखील अधिकार आहे हे नमूद करणे योग्य ठरेल. अशा प्रकारे,

योग्य प्रकरणांमध्ये, तो न्यायालयाकडून आदेश मिळवून त्या तरतुदीनुसार अटक टाळू शकतो.

९९) हे लक्षात घेणे देखील प्रासंगिक आहे की **जोगिंदर कुमार** - विरुद्ध - **स्टेट ऑफ यू.पी. आणि इतर** (१९९४)४ एस.सी.सी.२६०, मध्ये या न्यायालयाने असे म्हटले आहे की पोलिस नित्यक्रमाप्रमाणे कुणाला अटक करू शकत नाहीत. काही महत्त्वाची निरीक्षणे खालीलप्रमाणे पुनरुत्पादित केली गेली आहेत:-

"२०... एखाद्या व्यक्तीविरुद्ध केलेल्या गुन्ह्याच्या केवळ आरोपावर नियमित पद्धतीने अटक केली जाऊ शकत नाही. अटक करताना, पोलीस अधिकाऱ्यासाठी हे समंजसपणाचे ठरेल की तक्रारीचा थोडयाफार प्रमाणात तपास केल्यानंतर तक्रारीच्या सत्यतेबद्दल आणि खरेपणाबद्दल आणि त्यातील व्यक्तीच्या सहभागाबद्दल आणि अटक करण्याची गरज या दोन्हींबद्दल त्याचे वाजवी समाधान होईल जेणेकरून नागरिकांच्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी आणि कदाचित त्यांच्या स्वतःच्या हितासाठी ते योग्य ठरेल. एखाद्या व्यक्तीला त्याचे स्वातंत्र्य नाकारणे ही एक गंभीर बाब आहे. पोलीस आयोगाच्या शिफारशी केवळ वैयक्तिक स्वातंत्र्य आणि स्वातंत्र्याच्या मूलभूत अधिकाराचे घटनात्मक सहसंबंध प्रतिबिंबित करतात. केवळ गुन्ह्यात सहभाग असल्याच्या संशयावरून एखाद्या व्यक्तीला अटक केली जाऊ शकत नाही. अशा प्रकारची अटक आवश्यक आणि न्याय्य आहे असे अटक करणाऱ्या अधिकाऱ्याच्या मताचे काहीतरी वाजवी समर्थन असले पाहिजे. गंभीर गुन्हे वगळता, जर एखादा पोलीस अधिकारी कुठल्या व्यक्तीला स्टेशन हाऊसमध्ये उपस्थित राहण्याची नोटीस बजावत असेल आणि परवानगीशिवाय स्टेशनमधून बाहेर न पडण्याची सूचना देत असेल तर अटक टाळली पाहिजे."

१००) संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. दाखल करणे आणि कलम ४१ अंतर्गत आरोपी व्यक्तीला अटक करणे या दोन पूर्णपणे भिन्न गोष्टी आहेत. केवळ एफ.आय.आर. दाखल केला गेला आहे म्हणून आरोपी व्यक्तीला ताबडतोब अटक केली जाऊ शकते असे म्हणणे योग्य नाही. ही काल्पनिक भीती आहे की "केवळ एफ.आय.आर. दाखल केला गेला आहे म्हणून आरोपीला अटक करणे आवश्यक आहे आणि त्यामुळे त्याची प्रतिष्ठा कमी होईल" आणि काही व्यक्तींची अशी गैरसोय टाळण्यासाठी एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य नाही असे मानण्याची परवानगी या न्यायालयाने देऊ नये. पोलिसांनी केलेल्या मनमानी अटकेविरुद्ध उपलब्ध असलेल्या सुरक्षेची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे आणि जेव्हा माहिती एखादा दखलपात्र गुन्हा घडल्याचे उघड करते तेव्हा पोलिसांना एफ.आय.आर. अनिवार्य पणे दाखल करणे टाळण्याची परवानगी न देणे हा उपाय आहे.

१०१) हे यावरूनही लक्षात येते की संहितेच्या कलम १५१ नुसार एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला एखाद्या व्यक्तीला दखलपात्र गुन्हा करण्यापूर्वीच अटक करण्याची मुभा देण्यात आली आहे, जेणेकरून अन्यथा रोखता येत नसलेला गुन्हा घडण्यापासून थांबवता यावा. अशी प्रतिबंधात्मक अटक २४ तासांसाठी वैध असू शकते. तसे असतानाही, कलम १५१ मधील महाराष्ट्र राज्य सुधारणा अशा प्रकारचा गुन्हा घडण्यापासून रोखण्यासाठी, दखलपात्र गुन्हा करण्यापूर्वी ३० दिवसांच्या कालावधीपर्यंत(न्यायिक दंडाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार) त्या राज्यातील एखाद्या व्यक्तीला ताब्यात घेण्याची परवानगी देते. अशा प्रकारे, एखाद्या व्यक्तीला अटक करणे आणि एफ.आय.आर. दाखल करणे हे थेट आणि/किंवा अपरिवर्तनीयरित्या जोडलेले नाहीत आणि त्या पूर्णपणे भिन्न मापदंडांखाली कार्यरत असलेल्या पूर्णपणे भिन्न संकल्पना आहेत. दुसरीकडे, जर एखादा पोलीस अधिकारी त्याच्या अटक करण्याच्या अधिकाराचा गैरवापर करत असेल तर त्याच्यावर कलम १६६ अंतर्गत खटला चालवला जाऊ शकतो आणि त्याला शिक्षा होऊ शकते.

१०२) याव्यतिरिक्त, संहिता, पोलिसांना, दोन्ही, तपासापूर्वी आणि नंतर प्रकरण बंद करण्याचा अधिकार देते. तपास करण्यासाठी पुरेसा आधार नसल्याचे दिसल्यास पोलीस अधिकारी संहितेच्या कलम १५७ अंतर्गत तपास करण्यापूर्वी एफ.आय.आर. रद्द करू शकतो. या कलमातच असे म्हटले आहे की, एखाद्या पोलिस अधिकाऱ्याला 'गुन्हा घडल्याचा संशय घेण्याचे कारण' असेल तर तो तपास सुरू करू शकतो. त्यामुळे, संहितेच्या कलम १५७ अंतर्गत, तपास सुरू करण्याची आवश्यकता संहितेच्या कलम १५४ अंतर्गत तपास सुरू करण्याच्या आवश्यकतेपेक्षा जास्त आहे. एखाद्या प्रकरणात पोलीस अधिकारी, त्या प्रकरणाचा तपास करू शकतो आणि नंतर हे प्रकरण बंद करण्यासाठी संहितेच्या कलम १७३ अंतर्गत अंतिम अहवाल दाखल करू शकतो. त्यामुळे, दखलपात्र गुन्ह्याशी संबंधित माहिती मिळाल्यावर अनिवार्यपणे दाखल केलेल्या प्रत्येक एफ.आय.आर. मध्ये तपास सुरू करण्यास पोलीस जबाबदार नाहीत.

१०३) त्याचप्रमाणे, त्याचप्रमाणे, तपास बंद करण्याचे पोलिसांना अधिकार देणेविषयी संहितेचे कलम १५७ हे पोलिस दखलपात्र गुन्ह्यांचा तपास करण्याचे त्यांचे कार्य करत आहे

हे निश्चित करण्यासाठी पोलिसांवर नियंत्रण म्हणून सुद्धा कार्य करते. फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ बाबत भारतीय विधी आयोगाच्या ४१व्या अहवालात याची नोंद खालीलप्रमाणे करण्यात आली आहे -

"१४.१........जर गुन्हा गंभीर दिसत नसेल आणि तपास सुरू करण्यासाठी पुरेसा आधार नाही असे स्टेशन-हाऊस अधिकाऱ्याला वाटत असेल, तर त्याला तपास करण्याची गरज नाही, परंतु पुन्हा येथे, त्याला दंडाधिकाऱ्यांकडे अहवाल पाठवावा लागेल, जे पोलिसांना तपास करण्याचे निर्देश देऊ शकतात किंवा दंडाधिकाऱ्यांना योग्य वाटत असेल तर स्वतः चौकशी करू शकतात"

""१४.२......वर नमूद केल्याप्रमाणे या योजनेचे एक लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे पोलीस तपासाच्या सर्व टप्प्यांवर,दंडाधिकाऱ्यांना चित्रात ठेवले जाते, परंतु प्रत्यक्ष तपासात हस्तक्षेप करण्याचा किंवा तो तपास कसा करावा हे पोलिसांना निर्देशित करण्याचा त्यांना अधिकार नाही."

त्यामुळे, पोलिसांचा वेळ केवळ खोट्या आणि क्षुल्लक माहितीवर वाया जाऊ नये, तर पोलिसांनी दखलपात्र गुन्ह्यांचा तपास करण्याचे कर्तव्य जाणीवपूर्वक टाळू नये, हे देखील संहितेच्या योजनेने सुनिश्चित केले आहे. परिणामी, एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य करण्याच्या तरतुदीचा गैरवापर होण्याची भिती निराधार आणि काल्पनिक स्वरूपाची आहे.

१०४) महाराष्ट्र राज्या करिताचे ज्येष्ठ विद्वान अधिवक्ता श्री.नाफडे यांची ही भूमिका आहे की, जेव्हा एखाद्या निष्पाप व्यक्तीला फसवले जाते, तेव्हा त्याला केवळ प्रतिष्ठाच गमवावी लागत नाही तर मानसिक तणाव देखील होतो आणि त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्यावर गंभीर आघात होतो. एखाद्या व्यक्तीला त्याच्या वैयक्तिक स्वातंत्र्यापासून वंचित ठेवणारा कायदा मूळ आणि प्रक्रियात्मक अशा दोन्ही दृष्टिकोनातून वाजवी असला पाहिजे, असा प्रस्ताव मांडणाऱ्या **मनेका गांधी (उपरोल्लेखित)** प्रकरणाचा त्यांनी आधार घेतला, जो आता आपल्या घटनात्मक कायद्यात दृढपणे स्थापित झाला आहे. त्यामुळे, त्यांनी संहितेच्या कलम १५४ वर नव्याने विचार करण्याची विनंती केली, जे अनुच्छेद २१ च्या महादेशानुसार संहितेच्या कलम १५४ चा अर्थ लावेल.

१०५) हे खरे आहे की समाजाचे हित आणि व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रक्षण यांच्यात एक

नाजूक संतुलन राखले पाहिजे. वर आधीच चर्चा केल्याप्रमाणे, कायद्यात आधीच पुरेशा सुरक्षा उपाययोजना दिल्या आहेत ज्या खोट्या एफ.आय.आर. दाखल झाल्यास व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे योग्य प्रकारे संरक्षण करतात. त्याच वेळी, पिडीत व्यक्ती आणि समाजाचे हित लक्षात घेऊन कलम १५४ चा मसुदा तयार करण्यात आला. त्यामुळे, संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य करणे हे विविध वकिलांनी भासवील्याप्रमाणे संविधानाच्या अनुच्छेद २१ चे उल्लंघन करणार नाही, असे आमचे ठाम मत आहे.

**अपवादः**

१०६) जरी, निःसंशयपणे, आम्ही असे मानतो की संहितेच्या कलम १५४ मध्ये सर्व दखलपात्र गुन्हे घडल्यावर एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य आहे, तरीही, अशी उदाहरणे असू शकतात जिथे, काळानुसार गुन्ह्यांची उत्पत्ती आणि नाविन्यपूर्णतेमध्ये बदल झाल्यामुळे प्राथमिक चौकशीची, आवश्यकता असू शकते. असेच एक उदाहरण डॉक्टरांच्या वैद्यकीय निष्काळजीपणाशी संबंधित आरोपांच्या प्रकरणात आहे. केवळ तक्रारीतील आरोपांच्या आधारे वैद्यकीय व्यावसायिकांवर खटला चालवणे अन्यायकारक आणि असमानतेचे ठरेल.

१०७) वैद्यकीय निष्काळजीपणाच्या प्रकरणांच्या संदर्भात, **जेकब मॅथ्यू (उपरोल्लेखित)** मध्ये, या न्यायालयाने असे म्हटले होतेः

"**५१.** ज्या गुन्ह्यात अविचारीपणा किंवा निष्काळजीपणा हा अत्यावश्यक घटक आहे अशा गुन्ह्यासाठी डॉक्टरांवर कधीही कारवाई केली जाऊ शकत नाही, असे आमचे मत आहे, असे समजले जाऊ नये. आम्ही जे काही करत आहोत ते केवळ समाजाच्या हितासाठी काळजी आणि सावधगिरीच्या गरजेवर जोर देण्यासाठी आहे; कारण, वैद्यकीय व्यवसाय मानवांना जी सेवा देतो ती कदाचित सर्वात उदात्त आहे आणि म्हणूनच क्षुल्लक किंवा अन्यायकारक खटल्यांपासून डॉक्टरांचे संरक्षण करण्याची गरज आहे. अनेक तक्रारदार वैद्यकीय व्यावसायिकांवर अनावश्यक किंवा अन्यायकारक नुकसानभरपाई मिळविण्यासाठी दबाव आणण्याचे साधन म्हणून फौजदारी प्रक्रियेचा अवलंब करणे पसंत करतात. अशा दुर्भावनापूर्ण कारवाईपासून बचाव केला पाहिजे.

**५२.** भारतीय वैद्यकीय परिषदेशी सल्लामसलत करून भारत सरकार आणि/किंवा राज्य सरकारांनी काही मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश असलेले वैधानिक नियम किंवा कार्यकारी सूचना तयार करणे आणि जारी करणे आवश्यक आहे. जोपर्यंत ते केले जात नाही, तोपर्यंत आम्ही भविष्यासाठी काही मार्गदर्शक तत्त्वे ठरवण्याचा प्रस्ताव मांडतो, ज्यात गुन्हेगारी

हलगर्जीपणा किंवा गुन्हेगारी निष्काळजीपणा आहे हे घटक असलेल्या गुन्ह्यांसाठी डॉक्टरांवर चालवल्या जाणाऱ्या खटल्यांचे नियमन व्हावे. आरोपी डॉक्टरच्या हलगर्जीपणाच्या किंवा निष्काळजीपणाच्या आरोपाचे समर्थन करण्यासाठी तक्रारदाराने दुसऱ्या सक्षम डॉक्टरांनी दिलेल्या विश्वासार्ह मताच्या स्वरूपात न्यायालयासमोर प्रथमदर्शनी पुरावा सादर केल्याशिवाय खाजगी तक्रारीची दखल घेतली जाऊ नये. तपास अधिकाऱ्याने, घाईगडबडीत किंवा निष्काळजीपणाचे कृत्य किंवा चूक केल्याचा आरोप असलेल्या डॉक्टरांविरुद्ध कारवाई करण्यापूर्वी, वैद्यकीय प्रॅक्टीसच्या त्या शाखेत पात्र असलेल्या अधिमानतः सरकारी सेवेतील डॉक्टरांकडून स्वतंत्र आणि सक्षम वैद्यकीय मत मिळवावे, ज्यांच्याकडून सामान्यतः तपासात गोळा केलेल्या तथ्यांना बोलम ९ चाचणी लागू करून निःपक्षपाती आणि पूर्वग्ररहित मत देण्याची अपेक्षा केली जाऊ शकते.घाई किंवा निष्काळजीपणाचा आरोप असलेल्या डॉक्टरला नित्यक्रमाप्रमाणे अटक केली जाऊ शकत नाही (फक्त त्याच्यावर आरोप ठेवण्यात आला आहे म्हणून). तपास पुढे नेण्यासाठी किंवा पुरावे गोळा करण्यासाठी किंवा जर तपास अधिकाऱ्याला असे समाधान पूर्वक वाटत असेल की ज्या डॉक्टरांवर कारवाई होत आहे ते अटक झाल्याशिवाय खटल्याला सामोरे जाण्यासाठी स्वत: उपलब्ध होणार नाही तरच अटक आवश्यक आहे अन्यथा अटक रोखली जाऊ शकते."

१०८) भ्रष्टाचाराशी संबंधित गुन्ह्यांच्या संदर्भात, या न्यायालयाने **पी.सिराजुद्दीन (उपरोल्लेखित)** प्रकरणात सरकारी कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्यापूर्वी प्राथमिक चौकशीची गरज व्यक्त केली.

१०९) त्याचप्रमाणे, **तपन कुमार सिंग (उपरोल्लेखित)** प्रकरणात, या न्यायालयाने एफ.आय.आर. दाखल करण्यापूर्वी प्राथमिक चौकशीला केवळ या आधारावर मान्यता दिली आहे की जेव्हा पहिली खबर प्राप्त होते, तेव्हा ती दखलपात्र गुन्हा उघड करत नाही.

११०) त्यामुळे, दाखल करणे किंवा दाखल न करण्याबाबतचे विविध दावे - प्रतिदावे लक्षात घेता, केवळ पोलिसांना दिलेल्या माहितीने दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करणे आवश्यक आहे. अशा स्थितिमध्ये एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य आहे. तथापि, दिलेल्या माहितीमध्ये जर कोणताही दखलपात्र गुन्हा आढळला नसेल, तर त्वरित एफ.आय.आर. दाखल करण्याची गरज नाही आणि कदाचित पोलीस दखलपात्र गुन्हा झाला आहे की नाही हे निश्चित करण्याच्या मर्यादित हेतूसाठी एक प्रकारची प्राथमिक पडताळणी किंवा चौकशी करू शकतात. परंतु, जर दिलेल्या माहितीमध्ये दखलपात्र गुन्ह्याचा स्पष्टपणे उल्लेख असेल, तर त्वरित एफ.आय.आर. दाखल करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. एफ.आय.आर. दाखल

करण्याच्या टप्प्यावर इतर बाबींचा संबंध नाही, उदाहरणार्थ, माहिती खोटी दिली गेली आहे की नाही, माहिती खरी आहे की नाही, माहिती विश्वासार्ह आहे की नाही इत्यादी. एफ.आय.आर. च्या तपासादरम्यान या मुद्द्यांची पडताळणी करावी लागते. एफ.आय.आर. दाखल करण्याच्या टप्प्यावर, केवळ दिलेली माहिती एखाद्या दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करते की नाही हे पाहण्यासारखे आहे. तपासानंतर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळून आल्यास तक्रारदारावर चुकीचा एफ.आय.आर. दाखल केल्याबद्दल खटला चालवण्याचा पर्याय नेहमीच असतो.

<u>**निष्कर्ष/निर्देशः**</u>

१११) उपरोक्त चर्चा लक्षात घेता, आम्ही असे ग्राह्य मानतोः

(i) जर माहितीमध्ये दखलपात्र गुन्ह्याची माहिती उघड झाली असेल आणि अशा परिस्थितीत कोणतीही प्राथमिक चौकशी करण्यास परवानगी नसेल, तर संहितेच्या कलम १५४ अंतर्गत एफ.आय.आर. दाखल करणे अनिवार्य आहे.

(ii) जर प्राप्त माहिती एखाद्या दखलपात्र गुन्ह्याचा खुलासा करत नसेल, परंतु चौकशीची आवश्यकता दर्शवत असेल, तर केवळ दखलपात्र गुन्हा उघड झाला आहे की नाही हे शोधण्यासाठी प्राथमिक चौकशी केली जाऊ शकते.

(iii) जर चौकशीत दखलपात्र गुन्हा घडल्याचा खुलासा झाला तर एफ.आय.आर. दाखल केला जाणे आवश्यक आहे. ज्या प्रकरणांमध्ये प्राथमिक चौकशीचौकशीत असे आढळून येते की तक्रार बंद करणेच योग्य आहे तेंव्हा अशा प्रकारच्या क्लोजरच्या नोंदीची प्रत प्रथम माहिती देणाऱ्यास ताबडतोब किंवा एका आठवड्याच्या आत पुरवली जाणे आवश्यक आहे. त्यामध्ये तक्रार बंद करण्याची आणि पुढे न जाण्याची कारणे थोडक्यात उघड केली पाहिजेत.

(iv) दखलपात्र गुन्हा उघड झाल्यास पोलीस अधिकारी गुन्हा दाखल करण्याचे त्याचे कर्तव्य टाळू शकत नाही. त्याला मिळालेली माहिती दखलपात्र गुन्हा घडल्याचे उघड करीत असेल तर एफ.आय.आर. न दाखल करणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई केली जावी.

(v) प्राथमिक चौकशीची व्याप्ती, प्राप्त झालेल्या माहितीची सत्यता किंवा अन्यथा

पडताळणी करणे पर्यंत नाही तर केवळ माहिती कोणत्याही दखलपात्र गुन्हा घडल्याचे उघड करते की नाही हे शोधणे आहे.

(vi) कोणत्या प्रकारची आणि कोणत्या प्रकरणांमध्ये प्राथमिक चौकशी करायची हे प्रत्येक प्रकरणाच्या तथ्यांवर आणि परिस्थितीवर अवलंबून असेल.ज्या प्रकरणांमध्ये प्राथमिक चौकशी केली जाऊ शकते त्यांची श्रेणी खालीलप्रमाणे आहेः

( ए.) वैवाहिक वाद/कौटुंबिक वाद.

(बी.) व्यावसायिक गुन्हे.

(सी.) वैद्यकीय निष्काळजीपणाची प्रकरणे.

(डी.) भ्रष्टाचाराची प्रकरणे.

(ई.) फौजदारी खटला सुरू करण्यात असामान्य विलंब/विलंब होत असल्यास प्रकरणे, उदाहरणार्थ, विलंब होण्याचे कारण समाधानकारकपणे स्पष्ट न करता प्रकरणाचा अहवाल देण्यास ३ महिन्यांहून अधिक विलंब.

वर नमूद केलेली केवळ उदाहरणे आहेत आणि प्राथमिक चौकशीची हमी देणाऱ्या अटींची परिपूर्ण यादी नाही.

(vii) आरोपी व तक्रारदार यांच्या हक्कांची खात्री व संरक्षण करताना, प्राथमिक चौकशी कालबद्ध पद्धतीने केली जावी आणि कोणत्याही परिस्थितीत ती ७ दिवसांपेक्षा जास्त नसावी.अशा विलंबाची वस्तुस्थिती आणि त्याची कारणे सर्वसाधारण दिनदर्शिकेतील(General Diary) नोंदीत प्रतिबिंबित झाली पाहिजेत.

(viii) सामान्य दिनदर्शिका(General Diary)/स्टेशन डायरी/दैनिक दिनदर्शिका(Daily Diary) ही पोलिस ठाण्यात प्राप्त झालेल्या सर्व माहितीची नोंद असल्याने, आम्ही निर्देश देतो की एफ.आय.आर. दाखल करण्यामध्ये परिणती असो किंवा चौकशीला कारणीभूत असो, दखलपात्र गुन्ह्यांशी संबंधित सर्व माहिती अनिवार्यपणे आणि काटेकोरपणे उक्त दिनदर्शिकेत प्रतिबिंबित केली गेली पाहिजे आणि वर नमूद केल्याप्रमाणे प्राथमिक चौकशी करण्याचा निर्णय देखील प्रतिबिंबित केला गेला पाहिजे.

११२) वरील निर्देशांसह, आम्हाला दिलेला रेफरन्स आम्ही निकाली काढतो. गुणवत्तेनुसार

निकाली काढण्यासाठी योग्य न्यायपीठासमोर सर्व प्रकरणे लावण्यात यावी.

..............................भारताचे सरन्यायाधिश.
**(पी. सथासिवम )**
................................ न्यायमूर्ति
(**डॉ. बी. एस. चौहान**)
................................. न्यायमूर्ति
**(रंजना प्रकाश देसाई)**
................................ न्यायमूर्ति
**(रंजन गोगोई)**
................................ न्यायमूर्ति
**(एस. ए. बोबडे)**

**नवी दिल्ली;**
**१२ नोव्हेंबर २०१३**

**अस्वीकरण**

"या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याचा/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरिता वापर करता येणार. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणीकरिता वैध मानला जाईल".